**<u>सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव</u>**

**पृ.शी.**: राज्यात वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे त्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना

**मु.शी.**: राज्यात वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे त्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अनिल परब, प्रकाश शेंडगे, अरविंद सावंत यांचा प्रस्ताव.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात व विशेषतः मुंबई, ठाणे सारख्या शहरात वाहनांची संख्या बेसुमार वाढल्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे, तथापि सी.एन.जी. वापरासाठीची सक्ती अद्यापही करण्यात न आल्यामुळे प्रदूषण होऊन पर्यावरणाचा समतोल बिघडणे, बोगस नंबर प्लेट, बोगस लायसन्स, बोगस बॅच वापरुन गाड्यांची वाहतूक सुरु असणे, ड्रायव्हिंग लायसन्ससाठी स्मार्ट कार्ड योजनेखाली भ्रष्टाचार सुरु असणे, जुने परमिट जमा करुन घेऊन त्याच्या माध्यमातून मेरु, गोल्ड कॅब यांना संरक्षण देण्यात येणे, वाहतूक अधिकाऱ्यांच्या एकाधिकारशाहीमुळे काही अधिकाऱ्यांच्या बदल्या त्वरीत होणे तर काही अधिकारी एकाच जागी वर्षानुवर्षे कायम राहणे, वाहतूक पोलिसांची कमतरता सतत जाणवणे, टॅक्सी-रिक्षा यांची तपासणी करताना लाच घेण्याचे वाढते प्रकार, त्यामुळे संपूर्ण वाहतूक यंत्रणेत होणारा प्रचंड भ्रष्टाचार, गाड्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी मेट्रो रेल्वेसारखे प्रकल्प सुरु करणे, परंतु ते प्रकल्पही रेंगाळणे, त्याचबरोबर परप्रांतियांची वाढती लोकसंख्या रोखण्यासाठी कोणतीही उपाययोजना नसणे, त्यामुळे या सर्व बाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

महोदय, राज्यातील प्रामुख्याने मुंबईतील वाहतुकीवरील समस्यांच्या बाबतीत सर्वंकष असा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आला आहे. आपण राज्यातील विशेषतः मुंबईतील वाहतुकीचा विचार केला तर वाहतूक हा महाराष्ट्राचा आर्थिक कणा आहे. वाहतुकीमुळे जसे अनेक प्रकारचे उत्पन्न राज्याला मिळते, त्यात दुसऱ्या बाजूचा विचार केला तर त्यावर अंकुश लागला आहे तो म्हणजे वाढत्या लोकसंख्येचा. मुंबईवर लोक येऊन आदळतात त्यामुळे जसतशी लोकसंख्या वाढत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

जाईल, मग त्यात परप्रांतियांचे लोंढे असोत अथवा राज्यातील वाढणारी लोकसंख्या असो या सर्व गोष्टींचा परिणाम या वाहतुकीच्या कोंडीवर होत आहे. मुंबईवरील भार कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने एक नवीन मुंबई निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण हा प्रयत्न फारच थोड्या प्रमाणात यशस्वी झाला असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कारण हे सर्व करुनही मुंबईचा ताण कायमच राहिला. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीचा प्रश्न जसा वाढला आहे तशा अनुषंगिक समस्याही वाढलेल्या आहेत. सन 1973 मध्ये रिजनल रोड ट्रान्सपोर्ट प्लॅन तयार झाला, त्यानंतर जी लोकसंख्या वाढली त्यामुळे या समस्येत अधिकच भर पडली. कारण दररोज 1500 लोक मुंबईत येत आहेत त्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चर आहे तेवढेच असल्यामुळे ते कमी पडू लागले आहे. याचा परिणाम म्हणून सर्वात जास्त सफर कोण झाले तर ते म्हणजे मुंबईची वाहतूक. आज दहिसरवरुन चर्चगेटला रोडने यायचे म्हटले तर जवळपास अडीच ते तीन तास लागतात. मी दररोज सांताक्रुझ ावरुन सकाळी 8.30 पूर्वी विधानभवन येथे येण्यासाठी निघालो तर मला येण्यासाठी 1 तास 40 मिनिटे लागतात. परंतु त्यानंतर अर्ध्या तासाच्या अंतराने निघालो तर एवढ्याच अंतरासाठी 2.30 तास लागतात. कारण या वेळेत वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी झालेली असते. येथून मुंबई उपनगरात जाण्यासाठी सायंकाळी 4.30 वाजता जायला निघालो तरी बराच वेळ लागतो, त्यानंतर निघालो तर आणखी जास्त वेळ लागतो. दक्षिण मुंबईकडून पश्चिम मुंबई आणि उत्तर मुंबईकडे येणारी वाहतूक जी आहे त्यामुळे ह्या समस्या प्रकर्षाने जाणवत आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

आपले रस्ते पूर्वी जेवढे होते त्यामध्ये कसल्याही प्रकारची वाढ झालेली नाही. मुंबईच्या रस्त्यांची लांबी 1900 कि.मी. एवढी आहे. मुंबईतील रस्त्यांमध्ये केवळ 5 टक्कयांने वाढ झालेली आहे. रस्त्यांच्या संदर्भात मुंबईची जी परिस्थिती आहे तशीच परिस्थिती राज्यात सुध्दा आहे. रस्ते तयार करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषदेची आहे. राज्यातील रस्त्यांची लांबी 2.34 लक्ष कि.मी. एवढी आहे. त्यातील 50 टक्के रस्ते हे सिमेंट कॉंक्रीटचे आहेत व 50 टक्के रस्ते अर्धवट स्थितीत आहेत. राज्यातील रस्त्यांचा विचार केला तर बारमाही रस्ते केवळ 16 टक्के जोडलेले आहेत. रस्त्यांच्या संदर्भात महाराष्ट्रापेक्षा उत्तर प्रदेश अग्रेसर आहे हे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. 1971 मध्ये मुंबईत मोटर सायकलची संख्या 24 हजार होती आता ती 3.43 लक्ष एवढी झालेली आहे. आता नवनवीन मोटर सायकल येत असल्यामुळे मोटरसायकलच्या संख्येत रोजच्या रोज मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या मोटर सायकलच्या संख्येमुळे परिवहन व्यवस्थेवर ताण येत आहे. मोटर सायकल चालविणारे, आपल्या मोटर सायकली वाहनांमध्ये आडव्या तिडव्या घालतात त्यामुळे अपघाताचे प्रमाण सुध्दा मोठया प्रमाणात वाढलेले आहे. मुंबईमध्ये मोटरसायकलच्या रेसींगचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढलेले आहे. मुंबईमध्ये मोटरसायकलच्या रेसींगच्या बेटींग लावल्या जातात. ब्रीच कॅंडी ते माहीम कॉजवे या अंतरामध्ये मोटरसायकलच्या रेसींग लावल्या जातात त्यामुळे अपघात होऊन मृत्यूंच्या संख्येत तसेच जखमींच्या संख्येत फार मोठी वाढ झाली आहे. मुंबईमध्ये बेटींगच्या मोठया प्रमाणात टोळया आहेत. कार आणि जीपची संख्या 1971 मध्ये 83 हजार एवढी होती परंतु आता ही संख्या 2,91,500 वर गेलेली आहे. 1971 मध्ये टॅक्सीची संख्या 1600 होती ती आता 40-45 हजाराच्या पुढे गेलेली आहे. 1991 मध्ये आरटीओकडे खाजगी वाहनांचे रजिस्ट्रेशन 5,90,351 एवढे झाले होते. भविष्यातील अंदाजाप्रमाणे वाहनांच्या ग्रोथमध्ये अडीच टक्के वाढ होणार आहे. 2011 मध्ये खाजगी वाहनाची संख्या 9.43 लक्ष होईल तसेच ही संख्या 17.23 लक्ष पर्यंत जाऊ शकेल असाही अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. 1993 पर्यंत पब्लिक ट्रान्सपोर्टचा उपयोग 88 लोक करीत होते, 60 टक्के लोक खाजगी वाहनांचा वापर करतात व 5 टक्के लोक टॅक्सीचा वापर करतात परंतु

....2

डॉ. दीपक सावंत ....

सन 2011 मध्ये 85 टक्के लोक पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर करतील, 9 टक्के लोक खाजगी वाहनाचा वापर करतील, आणि 6 टक्के लोक टॅक्सीचा वापर करतील असा एमयुटीपीने अंदाज वर्तवला आहे. टाटा कंपनी एक लक्ष रुपयामध्ये नॅनो कार उपलब्ध करुन देणार आहे त्यामुळे नॅनो कार रस्त्यावर आली तर काय परिस्थिती निर्माण होईल याचा कोणीही विचार केलेला नाही. रस्त्यांची लांबी आपण वाढवू शकलो नाही परंतु वाहनांच्या संख्येत 54 टक्क्याने वाढ झालेली आहे. मुंबई हे बेट असल्यामुळे या ठिकाणी रस्त्यांची लांबी पूर्व-पश्चिम वाढू शकत नाही परंतु उत्तर-दक्षिण दिशेमध्ये आपण रस्त्यांची लांबी वाढवू शकतो. मुंबईमध्ये समुद्र आहे तसेच मिठी नदीच्या क्रॉसींगमुळे अडथळे निर्माण होतात. पब्लिक ट्रान्सपोर्ट हे सगळयात महत्वाचे वाहतुकीचे साधन आहे. पायी चालणा-यांच्या संख्येत घट झाल्यामुळे वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी झालेली आहे. मुंबईतील दुचाकी वाहनांची संख्या 6.47 लक्ष एवढी आहे, कारची संख्या 3.82 लक्ष आहे, रिक्षांची संख्या 1.4 लक्ष आहे एवढी आहे तर टॅक्सीची संख्या 55 हजार एवढी आहे. पायी चालणा-यांच्या संख्येत फार मोठी घट आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 9.40

डॉ.दीपक सावंत ....

सभापती महोदय, या संदर्भात जर आपण विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की, गाडयांचे रजिस्ट्रेशन करणे आणि लायसन्स देणे ही कामे आर.टी.ओ.च्या माध्यमातून केली जातात. मुंबईमध्ये ताडदेव, अंधेरी आणि वडाळा या तीन ठिकाणी आर.टी.ओ.ची कार्यालये आहेत त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. वाहतूक खात्यामध्ये कोणत्या ठिकाणापासून भ्रष्टाचार होतो हे जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, नो पार्कींग झोनमध्ये गाडी उभी केल्यास किंवा सिग्नल तोडल्यास सबंधित ड्रायव्हरचे लायसन्स जप्त केले जात नाही तर 50 किंवा 100 रुपये घेऊन तोडपाणी केली जाते. अशा प्रकारे नो पार्कींग झोनमध्ये गाडी उभी करण्यापासून किंवा सिग्नल तोडण्यापासून ते स्मार्ट कार्ड देण्यापर्यंत अनेक ठिकाणी मोठया प्रमाणावर आज भ्रष्टाचार सुरु आहे.त्याचप्रमाणे ड्रायव्हींगचे लायसन्स देत असतांना किंवा गाडयांचे रजिस्ट्रेशन करीत असतांना देखील भ्रष्टाचार होत असतो.

सभापती महोदय, ताडदेव येथील कार्यालयातून दररोज 350 लायसेन्सेस दिली जातात आणि 100 ते 130 गाडयांचे रजिस्ट्रेशन्स केले जाते. त्यावरुन किती महसूल मिळतो हे आपल्या लक्षात येईल. जेवढा महसूल अधिक मिळतो तेवढे भ्रष्टाचाराचे प्रमाण देखील अधिक असते. अंधेरीच्या आर.टी.ओ.च्या कार्यालयातून दररोज 650 लर्निग लायसेन्सेस दिली जातात आणि 400 पक्की लायसेन्सेस दिली जातात तसेच 250 गाडयांचे रजिस्ट्रेशन्स केले जाते त्याचप्रमाणे् वडाळा येथील आर.टी.ओ.च्या कार्यालयातून दररोज 600 ते 650 लर्निग लायसेन्सेस दिली जातात आणि 350 ते 400 पक्की लायसेन्सेस दिली जातात आणि 250 नवीन गाडयांचे रजिस्ट्रेशन केले जाते..

सभापती महोदय, या कार्यालयातून लायन्सेस कशा प्रकारे दिली जातात याचे एक उदाहरण मी या ठिकाणी देऊ इच्छितो. 1978 साली मी ड्रायव्हीग लायसन्स काढले होते परंतु ते हरविले असल्यामुळे दोन आठवडयापूर्वी मी आर.टी.ओ.कार्यालयात गेलो होतो . मधल्या काळात माझ्याकडे लायसन्स नसल्यामुळे मी गाडी चालवित नव्हतो. मला लायसन्स काढावयाचे असल्यामुळे मी त्या कार्यालयात जाऊन थम्ब इम्प्रेशन तसेच फोटोसुध्दा दिले होते.. त्यानंतर मला स्मार्ट कार्डच्या माध्यमातून दिनांक 5.7.2008 रोजी लायसन्स इश्यू करण्यात आले होते. 50 वर्षापेक्षा जास्त जर वय असेल तर त्या व्यक्तिला पाच वर्षाचे लायसन्स दिले पाहिजे असा नियम आहे परंतु मला जे लायसन्स दिले होते त्या लायसन्सवर असे म्हटलेले आहे की, हे लायसन्स दिनांक ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

25.5.2009 पर्यत व्हॅलीड राहील. माननीय मंत्री महोदयांकडे मी हे लायसन्स पाठवतो. लायसन्स देण्यासाठी देखील या कार्यालयात भ्रष्टाचार सुरु असतो. आपल्याला किती तारखे पर्यतचे लायसन्स दिलेले आहे हे सर्व सामान्य माणसांना कसे कळणार ? 8-10 महिन्याच्या कालावधीसाठी लायसन्स दिले जात असेल आणि माझ्याकडून जर पूर्ण कालावधीची फी वसूल केली जात आसेल तर यामध्ये कोणाचा दोष आहे ? पूर्ण रकमेची फी वसूल करुन काही कालावधीसाठी लायसन्स देण्याचा प्रकार तेथे सुरु असून अशा प्रकारे तेथे गैरव्यवहार केला जातो.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरे एक उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. एखाद्या व्यक्तिला जर ड्रायव्हींग लायसन्स मिळावयाचे असेल तर त्या कार्यालयाच्या बाहेर अनेक एजंटसचा सुळसुळाट असतो. त्यांना जर 500 किंवा 600 रुपये दिले तर ड्रायव्हीग टेस्ट न घेतासुध्दा लायसन्स दिले जाते , गाडयाचे रजिस्ट्रेशन केले जाते. टॅक्सीचे बॅजेस दिले जातात , परमिटस दिली जातात. माझ्या सारख्या लोकप्रतिनिधींच्या बाबतीत जर असा प्रकार घडत असेल तर बाकीच्या सर्व सामान्य लोकांच्या बाबतीत काय घडत असेल ?

सभापती महोदय, या आर.टी.ओ.कडून लायसन्स दिले जाते त्यासाठी स्मार्ट कार्ड योजना राबविण्यात आली आहे. त्याची एजन्सी कोणाकडे आहे ? यासबंधी चौकशी करण्यात आली पाहिजे असे मला वाटते.स्मार्ट कार्ड योजना राबवत असताना त्यासाठी टेन्डर काढण्यात आले होते काय, किती कंपन्यांनी हे टेन्डर भरले होते , स्मार्ट कार्ड देण्याची योजना कोणाच्या अखत्यारित आहे, कोणाच्या फॅमिली मेंबरमधील व्यक्ती स्मार्ट कार्ड ईश्यू करते ? इत्यादी बाबी शोधून काढल्या पाहिजेत असे मला या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी आणखी एक नागपूरचे उदाहरण देऊ इच्छितो. नागपूर मधील आमच्या एका कार्यकर्त्याने गाडी .खरेदी केली होती त्यावेळी गाडीच्या रजिस्ट्रेशनचे कार्ड त्याला देण्यात आले होते त्यामध्ये स्पेलिग मिस्टेक्स होत्या, त्याचप्रमाणे गाडीचा नंबर देखील चुकीचा लिहिला गेला होता. या संदर्भात मी संबंधित कार्यालयाला पत्र दिले होते त्यानंतर नागपूरच्या आर.टी.ओ. कार्यालयाने त्यामध्ये सुधारणा केली होती . मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की गाडयाचे रजिस्ट्रेशन केल्याचे स्मार्ट कार्ड आपण घेतल्यानंतर ज्या वेळी गाडी विकतो त्यावेळी आपल्या निदर्शनास येते की यामध्ये चुका आहेत. अशा प्रकारची फॉल्टी

3..

डॉ.दीपक सावंत ....

सिस्टीम त्या कार्यालयामध्ये सुरु आहे . आज आपण मॉर्डनायझेशनकडे जात असतांना फॉल्टी सिस्टीम सुरु राहणे योग्य नाही म्हणून ही स्मार्ट कार्ड योजना कोणाची आहे, त्या योजनेतून कोणाला पैसे मिळतात, त्यांना ही एजन्सी कशी दिली गेली ? यासबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

नतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

साधारणपणे त्यावेळी सरासरी 4 हजार लायसन्स दिले गेले तर त्याची किंमत किती होते? एक कार्ड बनविण्यासाठी किती खर्च येतो ते आपण सांगा?

सभापती महोदय, त्याचप्रमाणे मराठीमध्ये नंबर प्लेट लावण्याबाबतचा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. गाडयांवर मराठीमध्ये नंबर प्लेट असावी की नसावी हा एक वादाचा मुद्दा झाला आहे. महाराष्ट्र राज्यातील गाडयांवर मराठीमध्ये नंबर प्लेट कां नसावी? याबाबत केंद्र सरकारने कायदा केला आहे असे आपण आम्हाला सांगाल. जी भाषा सर्वांना समजते त्या भाषेमध्ये नंबर प्लेट असावी अशाप्रकारची तरतूद केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये आहे असे आम्हाला सांगून आपण केंद्र सरकारकडे बोट दाखविणार. मोटार वाहन कायद्यामध्ये तशी तरतूद आहे असे आपण आम्हाला सांगाल. माझा सांगण्याचा उद्देश असा आहे की, आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे सर्वत्र मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे म्हणून मराठीचा पुरस्कार करतात. मात्र मराठी भाषेमध्ये नंबर प्लेट लावल्याबद्दल 2 हजार वाहनांवर कारवाई करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेमध्ये नंबर प्लेट लावणे हा गुन्हा असेल आणि त्यासाठी 2 लाख रुपये दंड वसूल करणार असाल तर ते चुकीचे आहे. गुजरात, तामिळनाडू, चेन्नई या राज्यामध्ये असलेल्या वाहनांवर कोणत्या भाषेंमध्ये नंबर प्लेट लावल्या जातात हे आपण आम्हाला सांगावे. आपण मराठी भाषेमध्ये नंबर प्लेट लावून खाली इंग्रजी भाषेमध्ये नंबर लिहिण्यास मुभा दिली पाहिजे. परंतु मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेवर प्रत्येक कायदे लादले जातात. शिक्षणाच्या बाबतीत सुध्दा सी.ई.टी., सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. चे अभ्यासक्रम मुंबईवर लादले जातात. किंवा केंद्र सरकारचा कोणताही कायदा असो तो मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेवर लादून प्रत्येक बाबतीत मराठी माणसाची गळचेपी करण्याचे धोरण या राज्य सरकारने अवलंबिले आहे. आणि प्रत्येक वेळी आपण केंद्र सरकारकडे नाही तर न्यायालयाच्या निर्णयाकडे बोट दाखवून मोकळे होता. महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी या बाबतीत संवेदनशील होऊन मराठीचा वापर सक्तीने केला पाहिजे. आपण मराठी भाषेतील नंबर प्लेटचा पुरस्कार कां करीत नाही? ठाणे जिल्हयामध्ये 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2007 पर्यंत 1940 वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्या वाहनांनी मराठी भाषेमध्ये नंबर प्लेट लावल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

सभापती महोदय, वाहन चालकांनी हेल्मेटचा वापर करावा यासंबंधी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. राज्यसभेचे खासदार माननीय श्री. प्रकाश जावडेकर यांनी यासंबंधी अनेक वेळा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत...

चर्चा उपस्थित केली होती. परंतु हेल्मेटचा वापर करण्याच्या बाबतीत राज्य सरकारला अपयश आले आहे असे मला दुर्दैवाने सांगावे लागत आहे. हेल्मेट न वापरल्याबद्दल मोटार सायकलस्वारावर 100 रुपये दंड लावला जात होता तो आता 400 रुपये करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु मोटार सायकलवरुन पोलीस, मार्शल फिरत असतात ते तरी हेल्मेट वापरतात काय? जर अतिरेकी हेल्मेट घालून आले तर त्यांना आपण कसे ओळखणार? त्यांचा चेहरा कसा पहाणार? याबाबतीत सन 2005 मध्ये 1 लाख 61 हजार गुन्हयांची नोंद करण्यात आली आणि सन 2008 मध्ये 1 लाख 14 हजार गुन्हयांची नोंद करण्यात आली. याचा अर्थ लोकांनी हेल्मेटचा वापर केल्यामुळे कमी गुन्हें दाखल झाले. तेव्हा याबाबतीत आपण कोणती उपाय योजना करणार आहात हे स्पष्ट केले पाहिजे. आपण 400 रुपये दंडाची रक्कम प्रस्तावित केली आहे त्याबाबतीत आपली नेमकी भूमिका काय रहाणार आहे ते स्पष्ट केले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईच्या रस्त्यावर दुसऱ्या नंबरचे मोठया प्रमाणावर चालणारे वाहन म्हणजे टॅक्सी. त्या वाहनाची परिस्थिती आज अत्यंत दयनीय झाली आहे. 1971, 1972 ते 1978, 1980 पर्यंत टॅक्सी म्हटली की सरदारजी नाहीतर मराठी माणूस असे समीकरण झाले होते. परंतु आज सर्वत्र उत्तर भारतीय टॅक्सी चालवीत असल्याचे दिसते. सरदारजी आज जवळ जवळ दिसतच नाही. मुंबईच्या सायन, ॲटॉप हिल नाहीतर अंधेरीच्या भागामध्ये ते दिसतात. बाकी सर्वत्र उत्तर भारतीयांनी मुंबईतील टॅक्सीचे क्षेत्र व्यापून टाकले आहे. सभापती महोदय, टॅक्सी पासिंग करणे हे एक मोठे प्रकरण आहे. टॅक्सीमध्ये काय काय आहे? टॅक्सीमधील आसने कशी आहेत? दरवाजे कसे आहेत?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 09:50

डॉ.दीपक सावंत . . . .

टॅक्सीच्या दरवाजाला कधीच हॅण्डल नसते, खिडकीच्या ग्लास कधीच बंद होत नाहीत. अशा वेळी ड्रायव्हरजवळ एक हॅण्डल असते आणि ते अनेक कामासाठी उपयोगी पडते. मग ड्रायव्हर तेच हॅण्डल आपल्या हातामध्ये देतो आणि ग्लास वर-खाली करा असे सांगतो. हा कॉमन प्रॉब्लेम आहे. जेव्हा टॅक्सींचे परमिट रिन्यू केले जाते किंवा टॅक्सी बॅज दिला जातो, तेव्हा टॅक्सींची तपासणी केली जात नाही काय ? अशा प्रकारे जे अधिकारी पाहाणी न करता, याबाबतीत कार्यवाही न करता परमिट रिन्यू करीत असतील तर आतापर्यंत अशा किती अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे ? तसेच किती टॅक्सींवर कारवाई झालेली आहे ? टॅक्सीचे एक स्टॅण्डर्ड मेन्टेन करावयास पाहिजे. नेहमी आपण टुरिझमच्या गोष्टी करीत असतो. महाराष्ट्रामध्ये टुरिझम वाढले पाहिजे, टुरिस्ट यावयास पाहिजेत असे सांगत असतो. पण त्यादृष्टीने कार्यवाही होत नाही. आजकाल टॅक्सी ड्रायव्हर आणि रिक्षा ड्रायव्हर यांनी भाडे नाकारणे ही सर्वसाधारण गोष्ट झालेली आहे. आजही मराठी माणूस टॅक्सीच्या व्यवसायात काही प्रमाणात टिकून राहिलेला आहे.परंतु त्याला देखील हद्दपार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यासाठी काही आर.टी.ओ.अधिकाऱ्यांच्या डोक्यातून एक सुपीक कल्पना आली. काही परमिटस् लॅप्स झाली होती आणि त्यामुळे लोकांनी आपल्या टॅक्सी विकल्या होत्या. मात्र ही परमिट पुनर्जिवित करण्यासाठी एक कायदा करण्यात आला. त्या नुसार आपण दंडाची ठराविक रक्कम भरुन ही परमिट पुनर्जिवित करु शकतो. यासाठी काही खाजगी एजन्सींना हाताशी धरण्यात आले. श्री.अरुण सबनीस या गृहस्थाने एक योजना आणली. "फ्लोरा फाऊंडेशन","गोल्ड कॅब" इ. योजना आणल्या आणि याला माननीय मुख्यमंत्री महोदयांचा आशीर्वाद होता. मी हे वाक्य जबाबदारीपूर्वक बोलत आहे, कारण माननीय मुख्यमंत्री महोदय याच्या उद्‌घाटनासाठी गेले होते. त्यावेळी त्यांचे असे मत होते की, सिंगापूर येथे जशी टॅक्सी वाहतूक आहे, त्या धर्तीवर मुंबईमध्ये देखील टॅक्सी वाहतूक सुरु करावी. याकरता सिंगापूर येथे टॅक्सी वाहतूक कशा प्रकारे चालते हे दाखविण्यासाठी मुंबईतील काही युनियनच्या लोकांना सिंगापूरला देखील घेऊन गेले होते. पण सिंगापूरमध्ये टॅक्सी चालकांच्या बाबतीत कायदा अतिशय कडक आहे, तसा आपल्या राज्यामध्ये कडक कायदा नाही.याठिकाणी तुम्ही काहीच करु शकत नाही. कारण आपण जर आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली तरी टॅक्सी चालक हवालदाराला 200 रुपये, 500 रुपये देऊन आरामात सुटू शकतो. परंतु जर तुम्ही सिंगापूरमध्ये ..

. . . .ई-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

टॅक्सी ड्रायव्हरला सांगितले की, I will complaint to Police, you are charging me more rent किंवा तू मला फिरवत आहेस, असे जर सांगितले तर तो घाबरतो. तो तुमच्याकडून पैसे न घेताच सांगतो की, बाबा, तुम्ही जा, पण माझी तक्रार करु नका. आपल्याकडे इतका कडक कायदा अस्तित्वात नाही. कारण कायद्यामध्ये तशा प्रोव्हीजन्स्च केलेल्या नाहीत. मग काय केले ? तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाने "मेरु" आणि "गोल्ड कॅब" च्या एस्टीम गाडया सध्या मुंबई शहरामध्ये दिसत आहेत, त्यांना प्रायव्हेट टॅक्सीमध्ये समाविष्ट करण्यात आले आणि त्याचे परमिट पुनर्जिवित करण्यात आले. मोटर वाहन कायद्यामध्ये काय सांगितले आहे, तर अशा प्रकारे परमिट पुनर्जिवित करणे चुकीचे आहे आणि ते इन्-व्हॅलिड आहे. यामध्ये अनेक आर.टी.ओ.अधिकारी गुंतलेले आहेत. माझ्याकडे एक न्यूज पेपर आहे. मी तो सर्व माननीय मंत्र्यांना वाचावयास देणार आहे. "ह्यूमन राईटस ऑफ बॉम्बे" असे या न्यूज पेपरचे नाव आहे. या न्यूज पेपर मध्ये एक बातमी आली आहे. सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने ती बातमी वाचून दाखवितो. त्यामध्ये म्हटलेले आहे की,"राज्य परिवहन प्राधिकरण पर बंटी और बबली की सत्ता. फिलिट टॅक्सी योजना, 2006 में घोटाला. मुख्यमंत्री के नाम पर या मुख्यमंत्री के संरक्षण में बंटी और बबली की जोड़ी ने राज्य परिवहन प्राधिकरण की एक शर्त को पूरा करके तीन-तीन फिलिट आपरेटर लाईसेंस हासिल किए हैं. क्या सरकार इस मामले की समयबध्द जांच करेगी ?" या न्यूज पेपरमध्ये टॅक्सीच्या व्यवसायाच्या संबंधात पूर्णपणे प्रकाश टाकलेला आहे. मी हा पेपर माननीय मंत्री महोदयांना देऊ इच्छितो. त्यांनी तो पेपर वाचावा अशी मी विनंती करतो. माननीय मंत्री महोदयांनी नुकताच या विभागाचा चार्ज घेतलेला असल्याने याबाबतीत मी आपल्याला दोष देणार नाही. पण आपण याबाबतीत काही करु शकलात तर ते योग्य होईल. कारण आपल्याकडे ते पोटेन्शिअल आहे असे मी मानतो. ही परमिट कशा प्रकारे देण्यात आली ? ती इश्यू करीत असताना एका टॅक्सी युनियनने त्यांना रोखले.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

म्हणून आता नवीन परमिट काढावयाचे नाही पण जुने परमिट पुन्हा पुनरुज्जीवित करावयाचे असे केले. रिक्षांच्या बाबतीत सांगावयाचे तर 1 लाख 50 हजार रिक्षा आहेत. या रिक्षांच्या बाबतीत सुध्दा अशीच गोष्ट आहे. त्यांचे परमिट सुध्दा काही वर्षानंतर बंद होते. त्या रिक्षा दुसऱ्या जागी नेऊन विकल्या जातात. मुंबई प्राधिकरण क्षेत्राच्या बाहेर जाऊन विकल्या जातात, ठाण्यामध्ये रिक्षा विकल्या जातात. एका परमिटवर तीन तीन रिक्षा चालविल्या जातात. त्यामुळे रिक्षांची संख्या मुंबईमध्ये जास्त आहे. रिक्षा चालविण्याच्या संदर्भात मराठी माणूस बाहेर फेकला जात आहे. या रिक्षा व्यवसायामध्ये उत्तर भारतीय येत आहेत हे देखील आमचे दु:ख आहे. मराठी माणसाने हा व्यवसाय करावा आणि पैसे कमवावेत अशी भूमिका होती. आपण महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईमध्ये सगळीकडे सुलभ शौचालये बांधली. त्यामुळे या रिक्षावाल्यांचे फावले आहे. ते सुलभ शौचालयाच्या बाहेर रिक्षा उभी करतात आणि सकाळचे प्रातर्विधी आटोपून आणि आंधोळ वगैरे करुन आपल्या व्यवसायाला सुरुवात करतात. आपले ओले कपडे रिक्षाच्या पाठीमागे सुकत घालतात. अशा प्रकारे आपण संरक्षण देतो त्यामुळे मुंबईतील लोंढे कमी होत नाहीत. मुंबई सगळ्यांना सांगते की, या, राहा परंतु या मुंबईवर प्रेम करा. या मुंबईतील रिक्षांची काय परिस्थिती आहे ? मुंबईच्या रस्त्यावर धावणाऱ्या रिक्षातून आपण प्रवास केला तर निश्चितपणे आपलयाला स्लिप डिस्कचा त्रास होईल. या रिक्षांच्या बाबतीत मंत्रिमहोदयांनी एक ड्राईव्ह घ्यावा. या रिक्षांच्या परमिटची चौकशी करावी. या रिक्षा व्यवसायामध्ये किती बांगलादेशीय नागरिकांनी रेशन कार्ड काढून, रिक्षा बॅच काढून शिरकाव केलेला आहे हे बघावे. आज ते या स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून, महाराष्ट्राचे नागरिक म्हणून उजळ माथ्याने वावरत आहेत. त्यामध्ये किती बांगलादेशीय लोक आहेत याबाबतीत मंत्रिमहोदयांनी रिक्षांचा ड्राईव्ह घ्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी जर्मनमध्ये कंजेशन टॅक्स आहे. ज्या भागात सगळ्यात जास्त ट्राफीक आहे त्या भागामध्ये जर गाडी घेऊन जावयाचे असेल तर विशिष्ट टॅक्स भरावा लागतो. अशा प्रकारची योजना मुंबईच्या काही तज्ज्ञांनी मांडली. त्याचा कोठे तरी विचार शासन करणार काय ? कारण प्रत्येकाकडे किती गाड्या असाव्यात अशा प्रकारचे बंधन चीनप्रमाणे आपण घालू शकत नाही. सगळ्यांना बाजूला ठेऊन आपण चीनची मेट्रोरेल घेत आहोत..

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत .....

मेट्रोरेलचे कॉन्ट्रॅक्ट चीनला दिलेले आहे. चीनकडून 55 मेट्रोरेल येत आहेत. चीनमध्ये एका कुटुंबाकडे एक गाडी असा नियम आहे. तेथे काही राज्यामध्ये असे आहे की, कोणत्या दिवशी सम क्रमांकाच्या गाड्या आणि कोणत्या दिवशी विषम क्रमांकाच्या गाड्या चालवावयाच्या असे ठरविले जाते. मुंबई आता वाढू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारचे काही तरी आपल्याला करावे लागेल. आपण सागरी महामार्ग सुरु करणार होतो, त्याचे काय झाले ? माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख आज या ठिकाणी उपस्थित नाहीत. आम्ही पाहणी करण्यासाठी त्यांच्याबरोबर गेलो होतो. डिसेंबर, 2008 मध्ये आमदारांना त्या ठिकाणी घेऊन गेले होते. या सागरी महामार्गाचे बजेट आज किती वाढले आहे ? या सागरी महामार्गाचे बजेट 1300 कोटी रुपये होते. त्यामध्ये 600 कोटी रुपये आणखी वाढले आहेत. ते का वाढले हे सांगावे. दुसरी बाब अशी की, ॲट्रिया मॉलच्या ठिकाणी आठ लेनमधून चार लेनमध्ये आणि चार लेनमधून दोन लेनमध्ये ज्या ठिकाणी येणार तेथे ट्राफीक कंजेशन होते. आजही माहीम कॉजवे येथील ट्राफीकचा प्रश्न अजून सुटलेला नाही. आपण याकडे लक्ष द्यावे. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन ट्राफीक कंजेशनच्या बाबतीत उपाययोजना करणे आवश्यक आहे. आज रस्त्यावर अपघात खूप वाढलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

अपघात झाल्यावर अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. म्हणून परिवहन खात्यातर्फे ट्रोमा केअर ॲम्ब्युलन्सची योजना तयार करावी अशी माझी अशी विनंती आहे. त्या ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून अपघातग्रस्त व्यक्तिंना हॉस्पिटलमध्ये वेळेवर पोहोचविता येईल. आपल्याकडील ग्रामीण रुग्णालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तातडीची कोणतीच व्यवस्था नसते, त्यामुळे अपघातग्रस्तांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये घेऊन जावे लागते. त्यानंतर अपघातग्रस्तांवर उपचार होतात.

सभापती महोदय, मद्य पिऊन वाहन चालविणा-या चालकांवर वाहतूक खात्यातर्फे त्यांचे लायसन्स निलंबित करण्याची कार्यवाही केली जाते. पण त्यांचे केवळ लायसन्स निलंबित करुन न थांबता त्यांच्या गाडया सुध्दा निलंबित करण्याची आवश्यकता आहे. मला अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत, पण वेळेअभावी मी ते मांडू शकत नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे स्मार्ट कार्ड योजनेबाबत, आरटीओमध्ये चालू असलेल्या भ्रष्टाचाराबाबत आणि बदल्यांमध्ये जे राजकारण चालते त्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ते मंत्रिमहोदयांनी उत्तरादाखल सांगावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये प्रामुख्याने 7 बाबी अंर्तभूत आहेत. यातील पहिली बाब वाहतुकीच्या वाढलेल्या संख्येबाबत आहे, दुसरी वाहतुकीच्या कोंडीबाबत आहे, तिसरी सीएनजीची सक्ती केली जात नाही याबाबत आहे, चौथी बिघडलेल्या प्रदूषण व समतोलाबाबत आहे, पाचवी स्मार्ट कार्डामधील भ्रष्टाचाराबाबत आहे, सहावी टॅक्सी-रिक्षा तपासणीमध्ये लाच घेण्याच्या वाढलेल्या प्रकाराबाबत आणि सातवी बाब मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरु होण्यामध्ये होत असलेल्या विलंबाबाबतची आहे. हा प्रस्ताव जर पाहिला तर त्यामध्ये विधायक बाबी जास्त आहेत असे आपल्या लक्षात येईल. मुंबईमध्ये वाहनांची संख्या उदंड होत आहे ही वस्तुस्थिती आहे. वर्ष सहा महिन्यानंतर एक लाख रुपये किंमतीची नॅनो कार रस्त्यावर येणार आहे. आणखी एका कंपनीने नॅनोपेक्षा पाच-दहा हजार रुपयांचा फरक असलेल्या गाडीचे उत्पादन सुरु करणार असल्याचे घोषित केले आहे. या छोट्या छोट्या गाडया काही दिवसांनी रस्त्यावर आल्यातर मुंबईच्या वाहतुकीचे काय होईल याचा गांभीर्याने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मला वाटते की, भविष्यात कार उत्पादक कंपन्या स्वस्तात गाडया तयार करतील, अशा गाडया मुंबईतील रस्त्यावर आल्यावर त्या चालणार की नाही अशी परिस्थिती निर्माण होईल. म्हणून दरवर्षी किती गाडया रस्त्यावर येणार आहेत याबाबतचा 2020 पर्यंतचा एक आराखडा शासनाला तयार करावा लागेल. The Traffic Management and Transport Management has become the first and second priority of Mumbai city.

नंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी ....

आणि रस्त्यांची लांबी किती असणार आहे, रस्ते वाढणार आहेत की नाही ? दहाव्या पंचवार्षिक योजनेत वाहनांची वाढ 54 टक्के झाली तर रस्त्यांची वाढ केवळ 5 टक्के झाली. म्हणजे 54 टक्क्यांनी वाहनांची संख्या वाढते आणि केवळ 5 टक्क्यांनी रस्त्यांची लांबी वाढते आहे. तेव्हा रस्त्यांची लांबी कशी वाढविता येईल किंवा पूर्व-पश्चिम उपनगरे कशी जोडता येतील हा भाग यामध्ये अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे रस्त्यांच्या बाबतीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे आणि ही जबाबदारी मुंबई शहरामध्ये एमएमआरडीए, एमयूटीपी, एमयूआयपी यांच्यावर आहे आणि यासाठी त्यांच्याकडे करोडो रूपयांचा फंड देखील उपलब्ध आहे. त्यामुळे वाहनांच्या संख्येवर आपण किती नियंत्रण आणू शकू, त्याची गरज आहे काय ? जर्मनी व अन्य काही देशांप्रमाणे सम तारखांना सम आकडे असणारी म्हणजे 2, 4, 6 क्रमांकाच्या गाड्या बाहेर पडतील आणि विषम तारखांना विषम क्रमांकाच्या म्हणजे 1, 3, 5 क्रमांकाच्या गाड्या बाहेर पडतील अशी काही व्यवस्था वाहतुकीच्याबाबतीत करता येईल. आता आपण उड्डाण पूल बांधले आहेत आणि त्यांचा उपयोग या संदर्भात निश्चितपणे होऊ शकतो. सीएसटीवरून जेजे रूग्णालयापर्यंत तेथील उड्डाण पुलामुळे दोन मिनिटांमध्ये माणूस जातो. परंतु हे तितकेच सीमित आहे. तो माणूस पुढे खाली लालबाग, परळ पर्यंत गेला की, परत 25 मिनिटे त्याला थांबून, खोळंबून रहावे लागते. मुंबईची 'बेस्ट' सेवा एका तासामध्ये 12 कि.मी.सरासरी चालते. इतर देशांशी तुलना केली तर हा वेग आपल्याला कमी वाटतो. म्हणून याचे संपूर्ण नियोजन करण्याची आवश्यकता मला येथे वाटते. आज आपल्याकडे इतक्या गाड्या वाढत आहेत त्यामुळे रस्त्यांवरील पार्किंगचा प्रश्न देखील वाढतो आहे. रस्त्यांची रूंदी कमी होत आहे. त्यामुळे पार्किंगच्या प्रश्नाला अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. हल्ली तर काही नव्याने होणाऱ्या इमारतींमध्ये खाली पार्किंग असते, शिवाय इमारतीमध्ये दुमजली पार्किंगची व्यवस्था अधिकची केलेली मी पाहिली आहे. उंच टॉवरची इमारत बांधताना तर त्यातील पहिले पाच मजले पार्किंगसाठी असतात. तेव्हा पार्किंगच्या प्रश्नाचे महत्त्व देखील या निमित्ताने आपल्याला जमेस धरले पाहिजे. त्यासाठी आपल्याला भूमिगत पार्किंग करता येईल काय याचाही विचार करावा लागेल. या विधान भवनाच्या समोरच्या बाजूला जी एक थिएटरची इमारत आहे तेथे 3-4 मजले पार्किंगसाठी आहेत. अशा प्रकारे पार्किंगसाठी काही वेगळी व्यवस्था आपल्याला करावी लागणार आहे.

...... एच 2 ...

श्री. गुजराथी ....

सभापती महोदय, ज्यावेळेस आपण या वाहनांचा विचार करतो तेव्हा प्रदूषणाच्या बाबतीत देखील विचार करण्याची गरज आहे. वाहतूक जेव्हा कमी वेगाने चालते तेव्हा प्रदूषण वाढते आणि त्यामुळेच सीएनजीची आवश्यकता अत्यंत महत्त्वाची आहे. 10 वर्षापूर्वी दिल्लीमध्ये होणारे प्रदूषण आणि मध्यंतरी तेथे सक्तीचे करण्यात आलेला सीएनजीचा वापर यामुळे आज तेथे असलेले प्रदूषण यामध्ये फारच फरक पडलेला आपल्याला दिसून येतो. तेव्हा आपल्याला देखील मुंबईसारख्या शहरांमध्ये सीएनजीचा वापर सक्तीचा करावा लागणार आहे आणि त्यासाठी अगोदर आपल्याला पायाभूत सुविधा, इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अमुक वर्षापासून, अमुक तारखेपासून सीएनजीचा वापर सुरू करू असे म्हणून केवळ चालणार नाही, तर त्यासाठी आवश्यक असलेल्या इतर बाबीदेखील आपल्याला तपासाव्या लागतील. परंतु आजच्या या प्रस्तावाच्या बाबतीत या सभागृहाचे मत असे दिसते आहे की, मुंबईमध्ये सीएनजीचा वापर सक्तीचा करण्याबाबत सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे. ज्या योगे प्रदूषणाचा प्रश्न सुटू शकेल. आज मुंबईमध्ये होणारे प्रदूषण हे उद्योगांच्या माध्यमातून होत नाही तर वाहनांच्या माध्यमातूनच होत आहे. कारण आज मुंबईत उद्योग राहिलेलेच नाहीत, लालबाग, परळ भागामध्ये गिरण्याच सुरू नाहीत. ....

( यानंतर श्री. मा.शिगम ....आय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. ओटवणेकर 10:10

(श्री. अरुण गुजराथी...)

मुंबईतील गिरण्यांची संख्या कमी झाली. केवळ 10-12 गिरण्या सुरु आहेत. त्यामध्ये 12-15 हजार कामगारांपेक्षा जास्त कामगार नाहीत. एक काळ असा होता की, 70-75 गिरण्यांमध्ये लाखो कामगार काम करीत होते. आज मुंबई सिटी ही मॅन्युफॅक्चरिंग सिटी राहिली आहे की नाही अशी शंका येते. ती सर्व्हिस सिटी होईल असे वाटते.

तालिका सभापती महोदय, वाहनांच्या संदर्भात प्रदूषणाचा प्रश्न जोडायचा झाला तर वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी होण्यासाठी जो सीएनजीचा विचार या ठिकाणी मांडला गेला त्याला बहुतेक सर्व सन्माननीय सदस्य पाठिंबा देतील. सीएनजी सिटी म्हणून मुंबईचा नावलौकिक संपूर्ण जगामध्ये निर्माण करण्याचा विचार हा मला अत्यंत महत्वाचा वाटतो. बेस्टमध्ये 60 टक्के प्रवाशांची सोय होत असताना रस्तावर फक्त 4 टक्के जागा बेस्ट घेते. त्यांची तीन-साडेतीन हजाराची फ्लीट आहे. रिक्षामार्फत 35 टक्के प्रवाशांची सोय होते आणि त्या रस्त्यावरील 26 टक्के जागा व्यापतात, खाजगी गाडया रस्त्यावरील 65 टक्के जागा व्यापतात. वाहतुकीची कोंडी सोडवायची असेल तर आपल्याला पब्लिक ट्रान्सपोर्ट सिस्टिमवर जादा भर द्यावा लागेल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्या प्रमाणे कोणी किती गाड्या घ्यायच्या यावर बंधन घालता येणार नाही. परंतु सम-विषम क्रमांकानुसार कोणत्या क्रमांकाच्या गाड्या रस्त्यावर आणायच्या यावर बंधन टाकता येईल आणि आज ना उद्या मुंबई आणि ठाणे शहरामध्ये यासंदर्भात शासनाला विचार करावा लागेल. पब्लिक ट्रान्स्पोर्ट सिस्टिम स्ट्रेंग्थन करणे हा यातील जास्त महत्वाचा भाग आहे. आपण इंग्रजीमध्ये ज्याला "One school of thought" असे म्हणतो तसे एक्सपर्ट लोकांचा असा विचार आहे की, डिझेलमध्ये दिली जाणारी सबसिडी ही फक्त पब्लिक ट्रान्स्पोर्ट सिस्टिमला दिली जावी, खाजगी वाहनांना ती दिली जाऊ नये. डिझेल महाग व्हायला लागले की वाहनांचा वापर कमी होईल. या मुद्याला दोन बाजू आहेत. डिझेलमध्ये सबसिडी दिली नाही म्हणून वाहनांचा वापर कमी होईलच असेही नाही. इंधनाची किंमत वाढली, ड्रायव्हरचा पगार वाढला, ट्राफिक जॅम वाढले तरी वाहनांची संख्या कमी होत नाही. फ्लाय ओव्हर बांधून, रस्ते बांधून वाहनांची संख्या कमी होईल अशातला भाग नाही. बांद्रा-वरळी सिलिंक रोडचा उल्लेख येथे करण्यात आला. हा समुद्रमार्गी रस्ता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

5-6 महिन्यामध्ये वापरता येईल. वरळी ते नरीमन पॉईण्ट असा रस्ता करण्याचा देखील विचार आहे. समुद्राच्या खालून रस्ता काढता येईल का या दृष्टीने देखील विचार केला पाहिजे असे माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते. या मुंबई शहरामध्ये भूमिगत रस्ते करण्याच्या संदर्भातील विचार आपण केला पाहिजे. रस्त्यांची लांबी वाढविण्याच्या दृष्टीने एक-दोन पंचवार्षिक योजनांमध्ये अधिकाधिक भर देण्याची आवश्यकता आहे. त्याच बरोबर सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितल्या प्रमाणे रेल्वे लाईनचे पूर्व व पश्चिम भाग जोडणारे पूल प्रत्येक शहर आणि उपनगरामध्ये होणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे पुष्कळचा वेळ आणि प्रवास वाचेल. मुंबईतील रस्त्यांची लांबी साधारणत: 1100 कि.मी. आहे. वाहनांची संख्या 12 लाख 94 हजार इतकी आहे. दुचाकी वाहने 6 लाख 47 हजार, रिक्षा 1 लाख 40 हजार, टॅक्सीज 55 हजार आहेत. इतके असूनही टॅक्सी किंवा रिक्षा मिळत नाही. महागाई वाढत आहे. तरी देखील कम्प्लशन म्हणून टॅक्सी किंवा रिक्षाचा वापर करावा लागतो. मघाशी सांगितल्याप्रमाणे एमयूटीपी, एमआयटीपी आणि एमएमआरडीओ यांची यासंदर्भात जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिका आणि शासनाची देखील ही जबाबदारी आहे. एमएमआरडीओ, एमआयटीपी आणि एमयूटीपी यांच्या माध्यमातून संपूर्ण ट्रान्स्पोर्ट सिस्टिम कशी जास्त सुलभ करता येईल या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. एमयूटीपीच्या माध्यमातून लोकलची संख्या वाढविणे, दोन लोकल मधील अंतर कमी करणे, डब्यांची संख्या वाढविणे, प्लॅटफॉर्मची लांबी वाढविणे यासारख्या अनेक बाबी होत असल्या तरी .....

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:15

श्री. अरुण गुजराथी.....

रस्त्यावरील गर्दी कमी करण्यासंदर्भात शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. एक काळ असाही येईल की, रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी जेथे जेथे फ्लॉय ओव्हर्स आहेत त्यावर अजून दुस-या माळयाचे फ्लॉय ओव्हर्स बांधावे लागतील. या मुंबई शहरातील रस्त्यांची लांबी आणि रुंदी वाढविण्याची फारच आवश्यकता आहे असे मला वाटते. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावात ठाणे शहराचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. ठाणे येथील घोडबंदर रोड दहावर्षापूर्वी अतिशय लहान व खराब होता. पूर्वी त्या रस्त्यावर काहीही सुविधा नव्हती. घोडबंदर रोडला सर्व्हीस रोड तयार करणे, ठाणे रेल्वे स्टेशनजवळील कोपरी येथे येणारा ब्रीज तयार करणे, माजीवडे येथे फ्लॉय ओव्हर्स तयार करणे अशी कामे ठाणे शहरात केली गेली आहेत. मुंबई आणि ठाणे शहर यात फार मोठे अंतर आहे असे मला वाटत नाही. मी मघाशी उल्लेख केला की, मुंबई शहरातील वाहतुकीच्या संदर्भातील दहा वर्षाचा प्लॅन आपण तयार करु. तो प्लॅन तयार करीत असताना ठाणे शहरातील वाहतुकीच्या संदर्भातील प्लॅन करणे मला गरजेचे वाटते. या प्रस्तावात वाहतूक पोलिसांची कमतरता आहे असाही उल्लेख केला गेला आहे ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे लोकसंख्या भरमसाठ आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, परदेशातील रस्त्यांवर वाहतूक पोलीस कधीही दिसून येत नाहीत. एखाद्या व्यक्तीस रस्ता क्रॉस करावयाचा असेल तर ती व्यक्ती रस्त्याच्या सिग्नलच्या ठिकाणचे बटन दाबते. बटन दाबल्यानंतर रस्त्यावरील दोन्ही बाजुंची वाहतूक बंद होते, त्यानंतर ती व्यक्ती रस्ता क्रास करुन निघून जाते. तद्नंतर रस्त्यावरील दोन्ही बाजुची वाहतूक पूर्ववत सुरु होते. म्हणून रोड डिसिल्पीन ठेवणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे. वाहन चालकाने रस्त्यावरील सिंग्नल जंप केला असेल, रस्त्यावरील लेन बदलली असेल तर वाहतूक पोलिसाने न्यायाधीशाची भूमिका बजावून त्या वाहन चालकास त्या ठिकाणी थांबवून त्याचेवर लागलींच दंडात्मक कारवाई केली पाहिजे, अशा पध्दतीने रोड डिसिप्लीन ठेवण्याची आवश्यकता आहे. रोड डिसिप्लीनच्या संदर्भात शासनाने अतिशय गांभीर्याने लक्ष घालणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पर्यावरणाच्या संदर्भात "inefficient control over the emission levels from the vehicles " हा मुद्दा देखील महत्वाचा आहे. ज्या वाहनांचे आयुष्य सात

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

वर्षापेक्षा जास्त झाले असेल अशी वाहने वापरु द्यावयाची नाहीत. ही अट बसेस आणि व्यवसाय करणा-या वाहनांसाठी लागू आहे. परंतु आता खाजगी कारसाठी देखील ही अट घालण्याची आवश्यकता आहे. जुन्या वाहनांमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे. पर्यायाने पर्यावरणावर त्याचा परिणाम होत आहे. जुनी वाहने कमी करण्यासंदर्भात व पर्यावरण साभांळण्याचा संदर्भातील विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे. मुंबई शहरात मेट्रो रेल्वेची खूप गरज आहे, म्हणून मेट्रो रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्याच्या संदर्भातील विचार शासनाने केला पाहिजे. वर्सोवा, घाटकोपर, कुलाबा, माहिम, चारकोप, मानखूर्द, या उपनगराच्या ठिकाणी मेट्रो प्रकल्पाची कामे हाती घेतलेली आहेत. ती कामे पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त व सत्वर निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, रस्त्यावर होणारे अपघात यासंदर्भात मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. वाहन चालकांकडे वाहन चालविण्याचा परवाना नसतो, परंतु ते वाहन चालक वाहने चालवितात. वाहन चालविण्याचा परवाना न घेता चालक वाहने चालवित असतो. हा भारत देश आहे, या ठिकाणी सर्व काही चालते अशी साधारणत: अनेक वाहन चालकांची भावना झालेली आहे. याबाबतीत शासनाने कठोर भूमिका घेतली पाहिजे. ज्यांच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही, ते वाहन चालविणार नाहीत यासंबंधीची दखल घेतली गेली पाहिजे. ड्रिकींग आणि ड्रायव्हींग डू नॉट मिक्स म्हणून आपण नेहमी सांगतो.परंतु तरी तसे प्रकार होतात. काही लोक रात्रीच्या वेळी पंचतारांकित हॉटेलमधून निघतात आणि मद्यधुंद अवस्थेत फुटपाथवर गाडी घालतात व फुटपाथवरील लोकांना चेंगरुन टाकतात. मुंबई शहरात पार्ला येथे नुकतीच एक घटना घडली. एका डॉक्टरकडे वाहन चालविण्याचा परवाना नव्हता, ते डॉक्टर रात्रीच्या वेळी वाहन चालवित होते व त्यांनी आपल्या वाहनाखाली सव्वा वर्षाचा मुलगा चेंगरुन टाकला. जर डॉक्टर सारख्या व्यक्ती अशा पध्दतीने वागत असतील तर आपण यासंदर्भात कितीही कायदे केले तरी त्याचा काही उपयोग नाही असे मला वाटते. या बाबीकडे शासनाने गांभार्याने पाहिले पाहिजे. मुंबई ही देशाची राजधानी आहे. मुंबई शहरास सर्वात उत्तम असे इकॉनॉमिक हब, फायनान्शियल हब म्हणून ओळखतो अशा या शहरातील ट्रॉफिक मॅनेजमेंटच्या संदर्भात आजचा हा प्रस्ताव आणलेला आहे.या प्रस्तावावर मला विचार मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. ---- यानंतर श्री.कानडे...

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला मंत्रीमहोदयांना विनंती करावयाची आहे की, आजची ही चर्चा वांझोटी चर्चा न होता result oriented झाली पाहिजे. म.वि.प.नियम 260 अन्वये दिलेला हा प्रस्ताव केवळ भाषणांची हौस भागविण्यासाठी म्हणून दिलेला नाही. या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी साहेब सुध्दा बोलले आहेत. याठिकाणी परिवहन खात्यातील भ्रष्टाचारासंसबंधी आणि अन्य महत्वाच्या बाबीसंबंधी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत बोलले आहेत. परंतु ज्यांचे मन गेंडयाच्या कातडीसारखे आहे आणि निर्लज्ज आहे ते सदनात कितीही चर्चा झाली तरी बेशरमपणाने भ्रष्टाचार करुन मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेची वाट लावल्याशिवाय राहणार नाहीत . दादर स्टेशनच्याबाहेर पूर्वी लोक गुपचूप पैसे काढून द्यायचे लायसन कार्ड दिले की त्यामध्ये गुपचूप पैसे घालून तो द्यायचा आणि आता सरळसरळ समोरच ट्रॅफीक पोलीस पैसे घेतो आणि 50 रुपया नही चलेगा असे म्हणतो. दंडाची पावती फाडली तर 200 रुपये लागतील म्हणून 100 रुपये तरी दे असे तो सांगतो. याबाबतीत गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे. लोकांनी शासन करण्यासाठी संधी दिली आहे परंतु कायद्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे टाटाच्या कंपनीच्या येऊ घातलेल्या नव्या कारबाबत बोलले. लोकसत्तामध्ये एक आर्टीकल आले होते. एका मुंगीचे महाभारत या नावाने ते आर्टिकल आले होते. टाटाची स्वस्त कार येणार आहे. प्रत्येकाला कार घेण्याचा अधिकार आहे. परंतु एखाद्याचे स्वप्न साकार करण्याची गोष्ट दुसऱ्याच्या दुःखाची सुरुवात होता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. राज्य भावनेवर चालत नाही. भावना आणि व्यवहार याच्यामध्ये नियमावली ठरलेली आहे नियम आणि कायदा असतो त्याची काटेकोरपणाने अंमलबजावणी केली पाहिजे. 1 लाख रुपयांमध्ये टाटाची नॅनो कार मिळणार आहे. या मुंबई शहरामध्ये 15 लाख नोंदणीकृत वाहने आहेत. 4-5 लाख वाहने पाहुण्यांची येतात आणि जातात. सर्वसाधारणपणे मुंबईत दररोज 20 लाख वाहने येत असतात. आज मुंबईमध्ये 1 कि.मी.अंतरामध्ये 400-500 वाहने धावतात. यावर नियंत्रण घातले नाही जतर 2020 मध्ये 1 कि.मी.अंतरामध्ये 2 ते 3 हजार वाहने असतील. माणसे चालत जाणे सोईचे समजतील. टाटाची कार 1 लाख रुपयात मिळणार आहे.मुंबई शहर हे बेट आहे. You cannot increase one inch of land in Mumbai city. मुंबई बेटाची एक इंच जमीन सुध्दा वाढवू शकत नाही. या शहराचा भौगोलिकदृष्टया विचार केला तर 60-65 लाख लोकच राहू शकतात.

श्री. मधुकर चव्हाण ....

परंतु आज मुंबई शहरात प्रत्यक्षात 1 कोटी 35 लाख लोक रहात आहेत. शरद रावांनी युनियन चालविल्या. श्रमजिवी लोकांसाठी संघटितपणे, त्यांच्यावर होणारे अन्याय आणि अत्याचार दूर करण्यासाठी युनियन चालविली पाहिजे हे मी समजू शकतो आणि ती चालविली पाहिजे. भारतीय मजदूर संघ सुध्दा युनियन चालविते. परंतु ही युनियन कामगार, देशहित आणि समाजहित याला बॅलन्स करुन युनियन चालविते. काही युनियन चालक आपली मोनोपली चालवितात. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिला की 15-20 वर्षावरील वाहने असतील तर त्यांची नोंदणी रद्द करावी. शरद राव यांनी मुंबई, ठाणे शहरात काय सांगितले तर प्रदुषण व्हायचे असेल तर होऊ दे त्यांचे ते बघतील. सोशो इकॉनॉमिक प्रॉब्लेम आहे. आता रशियन रिव्हॉल्यूशन संपले आहे. सामाजिक आर्थिक हे व्याकरणातील शब्द मोठे आहेत. व्याकरणातील शब्दापलिकडे त्यांना काही अर्थ नाही. व्यवहार आपण पूर्णतः लक्षात ठेवला पाहिजे. मुंबई शहरामध्ये पायाभूत सुविधा वाढविल्या आहेत काय ? तर वाढविल्या नाहीत. रस्त्यावर फेरीवाले बसतात, फूटपाथवर फेरीवाले बसतात, गाडया रस्त्यावर आहेत अशा परिस्थितीत पादचाऱ्यांनी चालावयाचे कुठे व कसे ?

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ MMP/ KGS/ 10:25

श्री.मधुकर चव्हाण............

म्हणजे तुम्ही काळजी घेत असताना समाजातील सगळ्या घटकांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. आज मुंबई शहरामध्ये एक लाख रुपयाची कार आणणार आहात. त्यावर बंधन आणण्याचे ठरविले नाही तर काय होणार आहे? आज मुंबई शहरात 7 ते 8 लाख दुचाकी वाहने आहेत. अनेक विद्यार्थी आपल्या पालकांना सांगतात, मला मोटारसायकल घेऊन द्या. कुटुंबवत्सल पालक आपल्या मुलांचा हट्ट पुरविण्यासाठी शक्य असेल तर मोटारसायकल घेऊन देतात. आज अनेक कुटुंबांमध्ये एकच मूल असते, उद्या त्याने अभ्यास केला नाही तर काय करायचे? त्यापेक्षा त्याचा हट्ट पुरवितात. हे भावनात्मक प्रश्न सोडले तरी आज मुंबईमध्ये 8 लाख दुचाकी वाहने आहेत आणि 1 लाख रुपयाची गाडी रस्त्यावर आली तर त्यातील निम्मे लोक 1 लाख रुपयाची गाडी घेणार. परवा वृत्तपत्रात बातमी आली होती. हवेवर चालणारी गाडी येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितले की, स्पर्धा सुरु होणार आहे. तू 1 लाख रुपयाची गाडी दिली, मी 80 हजारात देणार; दुसरा म्हणेल, मी 60 हजारात देणार. शेवटी त्यांना व्यवसाय करायचा आहे. टाटा कंपनीची 1 लाख रुपयाची गाडी या मुंबई शहराच्या हद्दीत येता कामा नये असा अतिशय कठोरपणे नियम केला पाहिजे. सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने शांघाय शहराचे महापौर स्वत: ठरवित असतात, रविवारी रस्त्यावर खाजगी वाहन येणार नाही. आठवड्यातील एक दिवस रस्त्यावर वाहने येत नाहीत. त्यामुळे प्रदुषण कमी होईल. चांगल्याप्रकारे तो दिवस उपभोगता येईल. दुचाकी वाहनांचा वापर चीनमध्ये अधिक मोठ्या प्रमाणात केला जातो. बँकॉक शहराचे महापौर सार्वजनिक वाहतुकीच्या उद्देशाने असलेल्या बसमधून प्रवास करीत असतात. हे आपण करणार नाही. एखाद्या शहरातील मंत्री, प्रमुख कार्यकर्ता जाहिरातबाजीसाठी कॅमेरा घेऊन, इलेक्ट्रॉनिक मिडिया सोबत घेऊन लोकल ट्रेनमधून प्रवास करतात. मी कशाप्रकारे लोकांच्या अडचणी समजून घेत आहे हे दर्शविण्यासाठी लोकल ट्रेनच्या डब्यामध्ये बसतात. हे सगळे प्रसिध्दीपराङ्‌मुख राहून राजकारण करणारे असतात. परंतु त्यांनी धोरण ठरविले पाहिजे. Charity begins at home. रविवारी खाजगी वाहनातून प्रवास करता कामा नये. सार्वजनिक बसमधून प्रवास केला पाहिजे. एस.टी.बाबत सांगण्यात आले. मुंबई शहरामध्ये एस.टी. नाही. परंतु मुंबई शहरातील टॅक्सींची अवस्था काय आहे? आज एखाद्याने वाहतुकीचा नियम तोडला तर त्याचा परवाना पोलीस काढून घेतात. त्याच्याजवळ परवान्याची झेरॉक्स कॉपी असते. त्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण............

कॉपीच्या आधारे इतर चारजण वाहन चालवित असतात. दुसऱ्या वेळी पुन्हा त्याने नियम तोडला तर तो म्हणतो, मी 15 दिवसापूर्वी गुन्हा केला होता, त्यावेळी माझा परवाना जमा केला आहे, म्हणून माझ्या परवान्याची ही झेरॉक्स प्रत घ्या. अनेक टॅक्सीची अवस्था अशी आहे की, त्यामध्ये व्यवस्थित बसता देखील येत नाही. अनेक ठिकाणी पत्रा फाटलेला असतो. कालबाह्य टॅक्सी रस्त्यावरुन बाहेर काढल्या पाहिजेत. त्यांना पर्याय देता कामा नये. शासनाच्या अधिकाऱ्यांनी 9 जूनला एक पत्र पाठविले. डीसी रुल्स 33 (19) मध्ये बदल करण्यात येणार आहे. क्षितिजाला समांतर मुंबई वाढू शकत नाही. ज्याप्रमाणे गृहनिर्माण धोरणामध्ये डीसी रुल्सच्या कलम 33(9) मध्ये बदल करणार आहात, त्यानुसार एफएसआयचा नियम करणार आहात, तो नियम बिल्डर्सना डोळ्यासमोर ठेवून करु नये. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जनतेला स्वस्त घरे मिळतील अशा दृष्टीने नियम केला पाहिजे. डीसी रुल्सच्या कलम 33(19) मध्ये बदल केल्यानंतर एखाद्या माणसाकडे रिक्त भूखंड असेल आणि त्याला तो विकसित करावयाचा असेल तर त्याला ठरवून एफएसआय अधिक द्यावा आणि इमारतीचे पहिले तीन-चार मजले पार्किंग स्लॉटसाठी ठरवून द्यावेत. अधिक एफएसआय वाढवून दिल्यानंतर तो त्या वसाहतीमध्ये, त्या संकुलामध्ये पार्किंग स्लॉटसाठी वापरला पाहिजे. वरच्या दिशेने जेवढे व्हर्टिकल आकाशाकडे जाता येईल तेवढे तो जाऊ शकतो. यामुळे पार्किंगची व्यवस्था होऊ शकेल. आज डीसी रुल्समध्ये एखाद्याला 4 एफएसआय, अडीच एफएसआय दिल्यानंतर त्याबाबत अजिबात अट घातली जात नाही. मुंबई शहरामध्ये ऊंच ऊंच इमारती होत आहेत.

(नंतर श्री.भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ SBT/ MMP/ MMP/ श्री.भोगले... 10:30

श्री.मधुकर चव्हाण.....

मुंबई शहरामध्ये 22 माळ्यांच्या, 60 माळ्यांच्या, 70 माळ्यांच्या इमारती होत आहेत. आज मोठमोठ्या इमारती बांधण्यासंबंधी बिल्डर्समध्ये स्पर्धा लागली आहे. परंतु, त्यांना सांगितले पाहिजे की, 22 माळ्यांच्या इमारतीमधील प्रत्येक फ्लॅटमध्ये मुलाची, बायकोची, नवऱ्याची गाडी असते. त्या व्यतिरिक्त आणखी एक जादा गाडी मुलांना शाळेमध्ये नेण्यासाठी असते. 22 माळ्यांच्या इमारतीमध्ये 100-200 फ्लॅट होणार असतील तर निदान प्रत्येक फ्लॅटमागे एका गाडीची पार्किंग व्यवस्था बिल्डरने त्याच्या परिसरात केली पाहिजे, इमारतीमध्ये राहण्यासाठी येणाऱ्या लोकांची गाडी इमारत संकुलाबाहेर उभी करता येणार नाही असे आपण बिल्डरला सांगितले पाहिजे. पण असे आपण करू शकणार नाहीत. देशातील कोणत्याही नागरिकाला देशात कुठेही जाण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. त्यानुसार मुंबई शहरामध्ये अनेकजण येतात. पण मुंबईतील टॅक्सीधारकांना परमिट देताना आपण एक नियम करावा. ज्याचे आई वडिल महाराष्ट्रामध्ये जन्माला आले असतील अशांना टॅक्सीचे लायसेन्स मिळेल. दुसऱ्याला मिळणार नाही. मुंबई शहरामध्ये असे अनेक लोक आहेत की, जे राहतात बंगळुरूला, हैद्राबादला. त्यांच्याकडे असलेल्या पैशातून 10 ते 15 टॅक्सीज विकत घेऊन भाड्याने धंद्यासाठी लावलेल्या आहेत. बसेस भाड्याने लावलेल्या आहेत. तेव्हा अशा अनेक प्रश्नांसंबंधी शासन कठोरपणाने अंमलबजावणी करणार आहे की नाही ? यासंबंधी कठोर अंमलबजावणी करण्यासाठी आपल्याला कडक नियम करावे लागतील. मी माझे शेवटचे दोन मुद्दे सांगून भाषण पूर्ण करणार आहे. आज अपघातामध्ये किती माणसे मारली जात आहेत ? मुंबई शहरामध्ये अपघातात किती माणसे मृत्यू पावतात ? आज रस्त्याचे जाळे वाढलेले नाही. सन 2004 या वर्षामध्ये 4 लाख 60 हजार अपघात झाले. त्यात 1 लाख 5749 लोक मृत्यूमुखी पडलेत. मन्युषबळ हे फार मोलाचे आहे. ते केवळ राष्ट्रासाठी, समाजासाठी महत्त्वाचे नाही. ज्या घरातील माणूस मुत्यूमुखी पडतो त्यावेळी ते घर उद्ध्वस्त होते. आताच येथे सांगण्यात आले की, काल दोन मुलांनी आपल्या आईवडिलांना सांगितले की, आम्ही श्री सिद्धीविनायकाच्या दर्शनाला जात आहोत. मग हाजीअली येथे जमलेल्या चार मुलांनी हाजीअली पासून शर्यत लावली. त्यात दोन मुले जागच्या जागी ठार झालीत. तेव्हा रात्रीच्या वेळी तेथे पोलिसांचे पेट्रालिंग आहे की





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

नाही? मंत्रिमहोदय यासाठी आपण कधी तरी वेशांतर करून जावे. आपल्या एका गृह राज्यमंत्र्यांनी अतिशय चांगले काम केले. 22 वर्षे दादर टी टी येथे वाहतुकीची कोंडी होत होती. सदर वाहतूक कोंडी फोडण्यासाठी त्यांनी अतिशय कठोरपणाने अंमलबजावणी केली. गेली चार वर्षे दादर परिसरातील माणसे त्यांना दुवा देत आहेत. चांगल्या गोष्टीचा आम्ही येथे जरूर उल्लेख करतो. परदेशामध्ये रात्री दोन वाजता देखील लाल सिग्नल असताना गाडी थांबते. मग त्यावेळी रस्ता क्रॉस करण्यासाठी पाचदारी असो किंवा नसो. लाल सिग्नल दिसला की तेथे गाडी थांबवली जाते. परंतु, आपल्याकडे त्याची दखल घेतली जात नाही. आपल्या येथे दिवसा-ढवळ्या वाहतूक पोलीस कोपऱ्यामध्ये उभा असतो. तो फक्त पैसे घेण्यासाठी कोपऱ्यामध्ये उभा असतो. कोण चुकतो आणि आपण फुर्र करून शिट्टी वाजवतो. यासाठी वाहतूक पोलीस कोपऱ्यामध्ये उभा असतो. वाहतूक पोलीस नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाला बाजूला घेतात आणि पैसे खिशात टाकतात. तेव्हा वाहतूक पोलिसांना चौकात उभे राहण्यास सांगावे अशी मी सूचना करीत आहे. निदान कायदा चौकात उभा आहे म्हणून वाहन चालक नियमांचे उल्लंघन करणार नाही. वाहतूक पोलीस चौकात उभा नसल्याने त्याला माहिती असते की, येथे कोणीही उभा नाही. वाहतूक पोलीस असे म्हणतात की, 15 ते 20 टक्के बेस्टचे चालक वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वाहतूक पोलीस चौकामध्ये उभा न राहता कोपऱ्यामध्ये उभा राहतो असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. यामध्ये त्या वाहतूक पोलिसाचा दोष नाही. कारण अमूक एवढे नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालक पकड असे त्याला टार्गेट दिलेले असते. ते टार्गेट पूर्ण केले नाही तर तो वाहतूक पोलीस काम करीत नाही असे होते. तो चौकात उभा राहिला तर त्याला आपले टार्गेट पूर्ण करता येत नाही. म्हणून तो झाडाखाली लांब उभा राहतो. वाहतूक पोलीस लांब झाडाखाली उभा राहिल्यामुळे पाच उद्यान येथे राजा शिवाजी विद्यालयमधील पाच मुले ट्रक खाली चिरडून ठार झाली होती. त्यावेळी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. तरी देखील आज पण टार्गेटचा नियम सुरू आहे. हा नियम बंद केला तर माननीय श्री.चव्हाण साहेबांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याचा पोलिसांवर परिणाम न होता तो पोलीस वाहतूक नियंत्रणाचे काम प्रभावीपणे करू शकेल. ...3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मला पाठिंबा देत आहेत. वाहतूक पोलिसांनी टार्गेट पूर्ण केले नाही तर वरिष्ठ अधिकारी त्यांना गेट वर उभे करतात. त्यामुळे टार्गेटचा नियम हा शासनाने बंद केला पाहिजे.

यानंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

दुसरे म्हणजे इलेक्ट्रॉनिक मीटर्स रिक्षांना सक्तीचे करण्याबाबत आपण थांबलात ते कशासाठी ? याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. ज्याप्रमाणे टॅक्सीजना आपण इलेक्ट्रॉनिक मीटर्स लावले त्याप्रमाणे रिक्षांनाही कंपल्सरी करण्यात यावेत, हे करीत असताना रिक्षाचालकांच्या अडचणी अगोदर समजावून घेणे आवश्यक आहे. तसेच रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर्स वेळेवर व चांगल्या प्रकारची उपलब्ध करुन देणे आणि त्यांच्या दुरुस्तीची व्यवस्था होईल यादृष्टीनेही विचार करण्याची गरज आहे. श्री. शरद राव सांगतात म्हणून हे बंद करण्यात आले असेल तर ते योग्य नाही. कारण शासनाने रिक्षांसाठी जर इलेक्ट्रॉनिक मीटर सक्तीचे केले तर टॅक्सीज व रिक्षा बंद करु अशा प्रकारे जनतेला वेठीस धरुन युनियन चालविणार असाल तर समाजाचे हित त्यांच्या लीडरशीपपेक्षा महत्वाचे आहे हे शासनाने कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करुन दाखवून दिले पाहिजे. त्याचबरोबर मुंबईत येणाऱ्या लोंढ्यांचाही यात महत्वाचा संबंध आहे. कारण दादर ते चर्चगेट एवढे अंतर लोकलने आलो तर फक्त 20 मिनिटे लागतात परंतु रोडने गाडी घेऊन आलो तर तेवढ्याच अंतरासाठी 1.30 तास एवढा वेळ लागतो. तसेच दादरहून अंधेरीला जाण्यासाठी हीच परिस्थिती होती परंतु भारतीय जनता पक्ष व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी विशेषत: त्यात सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब आणि त्या भागातील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक यांनी यासाठी दबाव आणून एक पदरी पूल सुरु करण्यास भाग पाडले. म्हणून मुंबईच्या वाहतुकीचा प्रश्न आतापर्यंत लाईटली घेऊ नये. कारण अतिशय भयानक स्थिती आज वाहतुकीच्या बाबतीत झालेली आहे. हे अधिवेशन आपण केवळ दहा-बारा दिवसात संपवित आहोत, असे असताना महत्वाचा विषय सुरु असतो त्यावेळेस पीठासीन अधिकाऱ्यांकडून बेल वाजविली जाते. परंतु काही विषय महत्वाचे असताना तसेच जनतेच्या सुख-दु:खासंबंधी असतात त्यावर खरे तर तासन्तास चर्चा केली पाहिजे. संध्याकाळी चर्चा संपवून उठल्यानंतर झालेल्या चर्चेच्या संदर्भात रिझल्ट ओरिएन्टेड असा निर्णय शासनाने दिला असे चित्र मध्यमवर्गीयांना दिसू द्यावे. मी चार वर्षांपासून या सभागृहात सदस्य म्हणून आहे. या काळात वाहतुकीचा प्रश्न असो अथवा पाण्याचा प्रश्न असो अशा महत्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत आणि नागरिकरणाच्या प्रश्नांबाबत विरोधी पक्षाकडून चर्चा उपस्थित केली जाते परंतु त्याला थातुरमातूर उत्तर देऊन शासनाकडून तो दिवस ढकलला जातो. यासाठी हे सभागृह

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

नाही तर जनतेचे सुख-दु:ख लोकप्रतिनिधींच्या तोंडातून बाहेर पडते त्यावेळी त्याचे पडसाद राज्यकर्त्यांच्या मनात उमटले पाहिजेत आणि त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे आश्वासन शासनाने दिले पाहिजे, तरच या चर्चेला अर्थ राहील आणि केवळ आश्वासन देऊन चालणार नाही तर रिझल्ट ओरिएन्टेड अशा प्रकारचा निर्णय देखील सरकारने जाहीर करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले): महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी वाहतुकीच्या संदर्भातील नियोजनाबाबत आपल्या भाषणातून महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यानुसार शासनाने सन 1970 मध्ये नवी मुंबईची निर्मिती केली आणि हे करीत असताना सांगितले गेले होते की, मुंबईतील वाहतूक दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे त्या दृष्टीनेही ही नवी मुंबईची निर्मिती केली आहे. अशी निर्मिती झाल्यानंतर वाहतुकीचा बोजा कमी न होता तो वाढलेला आहे याचा अर्थ हे नियोजन बरोबर झालेले नाही. सन 2020 सालापर्यंत आपण यासंबंधीचे नियोजन करण्याचा विचार करीत आहात. परंतु अजुन 10 नव्या मुंबई निर्माण केल्या तरी शासनाकडे नियोजनाचा अभाव असल्यामुळे मुंबईच्या वाहतुकीचा प्रश्न संपणार नाही. नव्या मुंबईची निर्मिती करता असेही म्हटले होते की, मुंबईतील सर्व शासकीय कार्यालये तेथे हलविणार आहोत, परंतु त्याची अंमलबजावणी मात्र झालेली नाही. कारण 10 टक्के कार्यालये सुध्दा नवी मुंबईत शासनाने नेली नाहीत. म्हणून हे नियोजन शासनाने सरकारी पातळीवर सुरु करीत असताना सरकारी व निमसरकारी अधिकाऱ्यांना जी वाहने दिली जातात त्या वाहनांचा वापर स्वत:साठी म्हणजेच एवट्यासाठीच न करता विशेषत: कॉलोनी ज्या ज्या ठिकाणी असतील, मग ती वांद्रे येथील कॉलोनी असो अथवा वरळी येथील कॉलोनी असो या ठिकाणी राहणाऱ्या अधिकाऱ्यांना एकाच गाडीतून प्रवास करण्याची सक्ती करण्यात यावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

त्यांना ए.सी. कार दिल्या जातात. परंतु एकाच दर्जाचे अधिकारी एकत्र गेले तर पेट्रोलची बचत होईल तसेच वाहतुकीचा खोळंबाही होणार नाही परंतु याचा कधीही विचार केला जात नाही. अशा प्रकारचा विचार केला तर वाहतुकीमध्ये चांगल्या प्रकारे नियोजन होऊ शकेल.

सभापती महोदय, मी गेल्या 20 वर्षापासून मार्केटींग फेडरेशचा संचालक म्हणून काम करीत आहे. मार्केटींग फेडरेशनमध्ये आयएएस दर्जाचा अधिकारी एमडी म्हणून येत असतात. या ठिकाणच्या एका अधिका-याच्या नावावर चार वाहने होती. एक वाहन स्वत:साठी, दुसरे वाहन पत्नीसाठी, तिसरे वाहन मुलासाठी व चवथे वाहन हे कुत्र्यासाठी वापरले जात होते. यासंदर्भात लॉकबूकवर सुध्दा नोंद आहे. या विषयाच्या संदर्भात मी माझ्या शैलीने बैठकीत समाचार घेतला होता व त्यावेळेस ही बैठक जवळ जवळ 2-3 तास चालली होती.

( अडथळा )

कुत्र्यासाठी स्वतंत्र कार वापरली जात असल्यामुळे या गोष्टीची गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी वाहनाच्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे ती खरी आहे. त्यांनी ही माहिती विस्तृत न दिल्यामुळे ती माहिती येथे द्यावी असे मला वाटते. पाश्चिमात्य देशात, प्रगतशील देशात वाहतुकीच्या संदर्भात कडक कायदे करण्यात आलेले आहेत. आपले अधिकारी परदेश दौ-यावर जात असतात, त्या ठिकाणी कशा प्रकारे वाहतूक केली जाते, कशा प्रकारे वाहतुकीचे नियोजन केले जाते त्याचा काही सुध्दा विचार ते करीत नाहीत.

सभापती महोदय, मी व्यवसायानिमित्ताने 15 दिवसातून एकदा दुबईला जात असतो. त्या ठिकाणी एका कुटुंबासाठी एकच कार वापरली जाते. त्या ठिकाणी रेशनकार्ड असले तरच वाहनाचे परमिट दिले जाते. त्या ठिकाणी एका फॅमिलीला दोन कार वापरण्यास बंदी आहे. तसेच सिंगापूर, दुबई,जर्मनीतील फ्रँकफर्ट अशा काही ठिकाणी वाहने शहरात आणण्यासाठी दिवस ठरवून दिलेला आहे. ठराविक दिवशीच वाहनांचा वापर केला जातो. परदेशामध्ये वाहतुकीच्या संदर्भात ज्या प्रकारचे नियोजन केले जाते त्या प्रकारचे नियोजन आपल्याकडे होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, आपल्याकडचे अनेक अधिकारी, कमिशनर, बेस्टचे कमिशनर परदेश दौ-यावर जात असतात. परदेशात ज्या प्रकारे वाहतुकीचे नियोजन केले जाते त्या प्रकारचे नियोजन आपल्या येथे करण्यासंदर्भात मात्र ते काही विचार करीत नाही ही दुःखाची बाब आहे.

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये मोठे-मोठे प्रकल्प आहेत. या मोठ मोठया प्रकल्पामुळे वाहतुकीचा प्रश्न बिकट होत चालला आहे. आरसीएफचा प्रकल्प चेंबुर येथे आहे. या ठिकाणी 300 ते 400 एकर जमीन आरसीएफ कडे आहे. या प्रकल्पामध्ये 700 ते 800 कर्मचारी काम करतात. अलिबाग येथे सुध्दा आरसीएफची 500 एकर जमीन पडून आहे. त्यामुळे आरसीएफने चेंबुरचा प्रकल्प अलिबाग येथे सुरु केला तर वाहतुकीच्या समस्येमध्ये घट होईल तसेच मुंबईतील प्रदूषणाचे प्रमाण सुध्दा कमी होईल. मुंबईमध्ये जे मोठ मोठे प्रकल्प आहेत ते तातडीने मुंबईच्या बाहेर नेण्याची गरज आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथमश्री.जुन्नरे 10.45

श्री.जयंत प्र.पाटील..

सभापती महोदय, मुंबईमध्ये ट्रेलर, कन्टेनर आणि 40 टनापेक्षा मोठया वजनाच्या गाडया येत असतात. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे बोलले होते की जल वाहतूकीची व्यवस्था केली पाहिजे. मुंबई शहरात जी मोठी वाहने येतात त्यावर बंदी घातली पाहिजे आणि जल वाहतूक सुरु केली पाहिजे असे मला वाटते.. मध्यंतरी मी चीनला गेलो होतो त्या ठिकाणी शहरात मोठे ट्रक्स आणण्यास बंदी घालण्यात आली असून तेथे मोठया प्रमाणावर जल वाहतूक केली जात असल्याचे मला आढळून आले होते. सभापती महोदय, आपल्या कडे देखील जे.एन.पी.टी.ची निर्मिती केली होती त्याची क्षमता अधिक वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आला पाहिजे. मुंबईमध्ये ट्रक आणण्यावर बंदी घालण्यात आली पाहिजे. मुंबईच्या किनारपट्टीवर लहान लहान बंदरे बांधून त्या बंदरातून परदेशातून जो काही माल आपल्याकडे येईल त्याची बार्जेसच्या माध्यमातून जल वाहतूक करण्यात आली पाहिजे. मुंबई शहरात ट्रक्स आणण्यास जर बंदी घातली तर शहरातील मोठया ट्रक्सची वाहतूक बंद होऊ शकेल . व जल वाहतूक सुरु होईल .त्याकरिता मुंबईच्या बाहेर दहा बारा ठिकाणी असे पॉईन्टस निर्माण केले पाहिजे असे मला सुचवावयाचे आहे तसे केले तर मुंबई शहरात येणारे कंटेनर्स आणि मोठया ट्रक्समधील वाहतूक बंद होईल आणि जल वाहतूक रत्नागिरी पर्यत देखील सुरु होईल असे मला वाटते.आज रत्नागिरी आणि चिपळूण मधील रेती मुंबईला येऊ शकते हे आपल्यालासुध्दा माहीत आहे . तेव्हा इतकया लांबून जर रेती येंथे येऊ शकत असेल तर मुंबई शहरातून कन्टेनर जाऊ शकणार नाही काय ? तेव्हा जल वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. आज मुंबई शहरामध्ये ज्या टॅक्सीज आहेत त्याची काय अवस्था आहे , त्याचा दर्जा कशा प्रकारचा आहे याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे. टॅक्सीमध्ये बसल्यानंतर टॅक्सीतून धूर येतो, बाहेरचा चिखल आतमध्ये येतो तसेच अनेक टॅक्सीमध्ये कारपेट नसते अशा बाबी आपल्या निदर्शनास येतात. तेव्हा अशा टॅक्सीजचे रजिस्ट्रेशन ज्या अधिका-याने केलेले आहे त्या अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे किंवा नाही.? त्याचबरोबर या टॅक्सीजची वयोमर्यादा देखील निश्चित करावयास पाहिजे सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी याबाबतीत मघाशी उल्लेख



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

केला होता की पाच वर्षे झाल्यानंतर त्या टॅक्सीजचे परमिट रद्द करावयास पाहिजे. परंतु आज तसे न घडता 15-20 वर्षानंतर सुध्दा मुंबई शहरात टॅक्सीज चालविल्या जातात . त्याचप्रमाणे या टॅक्सीजचे मालक हे रेशन कार्डातील नोंदीप्रमाणेच व घर नंबरप्रमाणे असले पाहिजेत. एका घरात किती व्यक्तीनी रहावे याची देखील मर्यादा रेशन कार्ड काढतांना ठरवावी लागेल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण या ठिकाणी नेहमीच नियोजनाच्या बाबतीत पोटतिडकीने बोलतात त्यांनी मांडलेल्या विचाराशी मी देखील सहमत आहे. तेव्हा त्या बाबतीत देखील शासनाने निर्णय घेतला पाहिजे असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या चर्चेच्या निमित्ताने माननीय मत्रिमहोदयांनी ठोस उत्तर दिले तरच काही तरी चांगले व ठोस निर्णय घेऊन आम्ही आलो आहोत असे मतदारसंघात गेल्यानंतर तेथील लोकांना सांगता येईल. सन्माननीय मंत्रिमहोदयांना या प्रस्तावावर उत्तर देण्याची नव्याने संधी मिळालेली आहे ते सभागृहात नेहमीच प्रभावीपणे बोलत असतात कोणताही प्रश्न धसास लावण्याची मंत्री महोदयांची परंपरा आहे. तेव्हा आजच्या पहिल्याच चर्चेला उत्तर देण्याची त्यांना नव्याने संधी मिळालेली असल्यामुळे त्यांनी या प्रस्तावाला उत्तर देत असतांना चांगले निर्णय घेऊन उत्तर द्यावे अशी मी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

------

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : यानंतर सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी भाषण सुरु करावे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, राज्य की वाहतुक समस्या के संबंध में विधान परिषद के नियम 260 के अन्तर्गत यहां पर प्रस्ताव लाया गया है. इस प्रस्ताव पर अब तक जो चर्चा हुई है, वह मुंबई पर ज्यादा केन्द्रित रही है. लेकिन जो प्रश्न इस प्रस्ताव में उपस्थित किए गए हैं, वे गाड़ियों की बढ़ती हुई संख्या, ट्रैफिक कंजेशन, प्रदूषण, इस क्षेत्र में प्रचंड भ्रष्टाचार, बदलियों में अनियमितता, अधिकारियों और कर्मचारियों की कमी, ये सारे प्रश्न आज पूरे राज्य में दिखाई दे रहे हैं. खास तौर से जब हम राज्य में किसी भी रास्ते या किसी भी हाइवे पर जाते हैं तो वहां पर ट्रैफिक कंजेशन नजर आता है. इस चर्चा से ऐसा दिखाई देता है कि कार की बढ़ती हुई संख्या हमारी मुख्य समस्या है. बढ़ती हुई लोकसंख्या को मैं इस मामले में समस्या नहीं मानूँगी. आज के स्टेंडर्ड के हिसाब से अपने देश में प्रति व्यक्ति कार की संख्या बहुत कम है, लेकिन लंडन और न्यूयार्क जैसे शहर में प्रति व्यक्ति कार की संख्या बहुत ज्यादा हैं. कार की डेन्सिटी ज्यादा होने के बावजूद वहां पर प्रदूषण नहीं है, वहां की हवा साफ है. ऐसा हमारे देश में क्यों नहीं है, यह हमारा मुख्य प्रश्न है. नेनो कार के आने का डर हमें सता रहा है, क्योंकि कार रखने की क्षमता लोगों में बढ़ जाएगी. ज्यादा फोसिल फ्यूल यूज होगा और ट्रैफिक कंजेशन अधिक बढ़ जाएगा, ऐसा मुद्दा यहां पर उपस्थित किया गया है. लोग सोच रहे हैं कि यह कम क्षमता वाली छोटी गाड़ी है और नेनो कार के आने के बाद ट्रैफिक कंजेशन इतना बढ़ जाएगा कि इस बारे में ईश्वर ही मालिक है. इन लोगों को डरावने सपने दिखाई दे रहे हैं. लेकिन मुझे लगता है कि जागतिक प्रगति के साथ साथ चलना गलत नहीं हो सकता और गाड़ियों की संख्या तो बढ़ने वाली है. नई और सोफिस्टिकेटेड गाड़ियां तो रोड पर आने वाली हैं. क्या हम गाड़ियों की संख्या को विलेन कहेंगे, क्या हम नेनो को विलेन मानेंगे, क्या हम बढ़ती हुई लोकसंख्या को दोषी मानेंगे या फिर जैसा कि यहां पर कहा गया कि टैक्सी कौन चला रहा है, मराठी माणुस चला रहा है या सरदार जी चला रहा है या फिर नंबर प्लेट कौन सी भाषा में है, क्या हम इन बातों को दोषी मानेंगे ? सच बात तो यह है कि यह समस्या हमारे सामने नहीं है. हमारे सामने मुख्य समस्या यह है कि सरकार की पॉलिसी और सरकार की प्लानिंग में जो व्यापक दृष्टिकोण होना चाहिए, उसकी कमी है. ऐसा मेरा सोचना है. हमारी सरकार की आज की पॉलिसी प्रदूषण, कंजेशन और अडल्ट्रेशन को सब्सिडाइज कर रही हैं, ऐसा मेरा सोचना है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . .Q 2

. . . . श्रीमती फौजिया खान

आज हमारी समस्या प्रदूषण की है, बॅड इम्लीमेंटेशन ऑफ पॉलिसी है, प्रचंड भ्रष्टाचार की है और दीर्घकालीन नियोजन के अभाव की है. इन समस्याओं पर अगर हम अपना ध्यान केन्द्रित करेंगे तो ट्रैफिक समस्या को कुछ हद तक आसान कर सकेंगे.

सभापति महोदय, जब हम कार खरीदने जाते हैं तो सिक्स परसेंट से लेकर जीरो परसेंट फायनेंस पर कार मिलती है, लेकिन किसान को बड़ी मुश्किल से कम इन्ट्रेस्ट पर कर्ज देने की बात यहां पर उपस्थित हुई और उस पर कुछ हद तक अमल शुरु हुआ है, लेकिन कार को जिस तरह से सब्सिडाइज्ड किया जाता है, वह सोचने की बात है.

. . . . भाषण जारी (आर- 1)

असंशोधित प्रत / प्रकाशनार्थ नहीं

. . . श्रीमती फौजिया खान जारी

सभापति महोदय, यहां पर पार्किंग का मुद्दा उपस्थित किया गया. मुझे लगता है कि जब हम सब्सिडी की बात कर रहे हैं तो पार्किंग हमारे यहां पर 100 प्रतिशत फ्री है. टोकियो में अगर आप कोई व्हीकल खरीदते हैं तो अगर आपके पास प्राईवेट पार्किंग है, तभी आपको व्हीकल खरीदने का अधिकर है. इस प्रकार से जिनके पास में पर्किंग की जगह है, वही लोग गाड़ी खरीद सकते हैं. इस प्रकार से वहां पर कम व्हीकल्स का इस्तेमाल होता है, जिससे कंजेशन और प्रदूषण कम होता है.

सभापति महोदय, दूसरी बात रोड्स के बारे में है. रोड्स और फ्लाईओवर्स बनाने के लिए करोड़ो रुपए लगते हैं, लेकिन रोड्स का इस्तेमाल पूरी तरह से फ्री है. हमारे देश में गरीब और अमीर दोनों रोड्स का इस्तेमाल फ्री करते हैं. इसी प्रकार से ट्रॅफिक सिग्नल और ट्रॅफिक पुलिस के ऊपर बहुत पैसा खर्च होता है, लेकिन यह सुविधा भी फ्री प्रोवाइड की जाती है. यह इनविजिबल सब्सिडी अमीर लोगों को भी दी जाती है. इस मामले में सरकार को सोचने की आवश्यकता है.

सभापति महोदय, मेरा ऐसा मत है कि शहरों में व्हीकल्स पर एनुअल टॅक्स लगाना चाहिए. आज हम उनसे वन टाइम टॅक्स लेते हैं. यह टॅक्स हमें एनुअली लेना चाहिए. मेरा ऐसा मानना है कि सोशल इमेज बढ़ाने वाली कार पर हमें ज्यादा टॅक्स लेना चाहिए. इस प्रकार से हम कॉन्सटेंट रेवेन्यू जनरेट करने का काम कर सकते हैं और इस रेवेन्यू से हम रोड्स और पब्लिक ट्रान्सपोर्ट को बढ़ाने का काम कर सकते हैं. इस तरह से हम प्राइवेट ट्रान्सपोर्ट को पब्लिक ट्रान्सपोर्ट के लिए फायनेन्स का सोर्स बना सकते हैं.

सभापति महोदय, ट्रैफिक कंजेशन को कम करने के लिए हमें अंडरग्राउण्ड रेलवे, मेट्रो रेलवे के साथ साथ डबलडॅकर, ट्रिपलडॅकर फ्लाईओवर्स बनाने की आवश्यकता है. इसके लिए रेवेन्यू जनरेट करने के बारे में शासन को विचार करना चाहिए. मुझे ऐसा लगता है कि व्हीकल की सोशल कॉस्ट के हिसाब से उसकी एक्साइज ड्यूटी होनी चाहिए. हमारे मा. सदस्य श्री. जयंत पाटील ने बताया कि कुत्ते के लिए अलग से गाड़ी रहती है. ऐसी गाड़ी से आपको ज्यादा टॅक्स वसूल करना चाहिए.

सभापति महोदय, डीजल और पेट्रोल की कीमत में हमारे देश में बहुत तफावत है.

. . . R 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान

डीजल पेट्रोल से सस्ता है, जबकि दूसरे देशों में डीजल पेट्रोल से मंहगा है. अमेरिका में डीजल मंहगा है. हमारे देश में डीजल सस्ता होने की वजह से डीजल कार का उत्पादन ज्यादा हो रहा है. इसका मतलब यह है कि डीजल से जो पार्टीकल्स एमिट होते है, वे हाईली टॉक्सिक होते हैं और उससे ज्यादा प्रदूषण होता है. यह अधिक प्रदूषण हम अपनी पॉलिसी की वजह से कर रहे हैं. इसलिए डीजल कार के ऊपर अधिक टॅक्स, अधिक सेस लगाने का काम होना चाहिए. हम प्राईवेट व्हीकल के लिए अलग नियम और पब्लिक ट्रान्सपोर्ट के लिए अलग नियम बना सकते हैं. सरकार की पॉलिसी अडल्ट्रेशन को प्रोत्साहन दे रही है. गरीबों को अपनी नजर के सामने रखकर सरकार ने रॉकेल पर सब्सिडी दी है और इसलिए इसकी कीमत कम है. लेकिन आज हम देखते हैं कि रॉकेल के एक तिहाई भाग का इस्तेमाल व्हीकल्स के लिए इस्तेमाल होने वाले डीजल और पेट्रोल में मिलावट करने के लिए किया जाता है. इससे बहुत प्रदूषण फैल रहा है. रॉकेल का कालाबाजार हो रहा है और इस पर सब्सिडी देने से सरकार नुकसान उठा रही है. इससे 2 लाख 50 हजार करोड़ रुपए का नुकसान क्रुड ऑयल कंपनीज को हो रहा है. इतना नुकसान सरकार उठा रही है. यह नुकसान सर्व शिक्षा अभियान और ई.जी.एस. पर खर्च होने वाली राशि से अधिक है. सब्सिडी का फायदा गरीबों तक नहीं पहुंचता है, इसलिए इसके बारे में सोचने की आवश्यता है.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापति महोदय, सब्सिडी खत्म करने के लिए सब से पहले हमें पार्किंग स्पेस के लिए चार्ज करने की शुरुआत करनी चाहिए. टोकियो में 15 डॉलर और वाशिंगटन में 30 डॉलर पार्किंग के लिए लिए जाते हैं तो हम अपने देश में 10 रुपए प्रतिदिन क्यों नहीं ले सकते. आज हमारे देश में पार्किंग स्पेस की कीमत लाखों रुपए में है, फिर भी पार्किंग स्पेस के लिए कोई चार्ज नहीं है, वह फ्री है. आज पार्किंग स्पेस ग्रीन स्पेस को खा रही है. इसलिए इस बारे में बहुत गंभीरता से प्लानिंग करनी चाहिए, ऐसा मुझे लगता है. मेरा कहना यह है कि अगर आपको रेवेन्यू जनरेट करके इन्फ्रास्ट्रक्चर को डिवलप करना है तो अमीर लोगों से अधिक पैसा लेना चाहिए. शासन की नीतियां गरीब लोगों के लिए बनती है, लेकिन उसका लाभ अमीर लोग उठाते हैं. इसलिए मेरा कहना यह है कि प्लानिंग करते समय गरीब, मध्यम वर्ग और अमीर

. . R 3



APR/ MMP/ KGS/ 10:55

. . . श्रीमती फौजिया खान

सबको एक लाइन में रखकर काम नहीं चलेगा. मैं आपके सामने एक शेर पेश करती हूॅं :

"एक ही सफ में खड़े हो गए महमूद व अयास,

ना कोई बंदा रहा, ना कोई बंदे नवाज."

सभापति महोदय, गुलाम और राजा को एक ही लाइन में खड़ा नहीं कर सकते. एलाइट क्लास से सही मात्रा में टॅक्स वसूल किया गया तो हमारी सड़कें चौड़ी होंगी, जगह जगह फ्लाईओवर्स होंगे, ट्रॅफिक जाम नहीं होगा और प्रदूषण भी नहीं होगा. इतना कहते हुए मैं अपना भाषण खत्म करती हूॅं.

. . . . . .. . .

भाषण पूर्ण. नंतर श्री.अरविंद सावंत यांचे मराठी भाषण बरवड कडे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी प्रस्ताव मांडलेला आहे आणि त्या प्रस्तावावरील चर्चा सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सुरु केलेली आहे.

मी दोन विषयांना या ठिकाणी स्पर्श करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी मघाशी या ठिकाणी उल्लेख केला. वाहनांची संख्या बेसुमार वाढणे, त्यातून निर्माण होणारे प्रदुषण, मेट्रो रेल्वेचा प्रकल्प सुरु न होणे आणि वाढती लोकसंख्या एवढ्याच दोन तीन मुद्यांना मी स्पर्श करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी आता सभागृहात उपस्थित झालेले आहेत. मी त्यांच्याच मुद्यांना आणखी थोडा स्पर्श करण्याचा प्रयत्न करणार आहे. 1962 साली अमेरिकन ट्रान्सपोर्ट कंसल्टंट यांना एक प्रस्ताव दिला होता की, आपण यासंदर्भात एक डिटेल अहवाल सादर करावा. विल्बर आणि स्मिथ या लोकांनी मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्था या विषयावर 1962 साली अहवाल सादर केला. यासंदर्भात जे जे केले त्यामध्ये असलेला नियोजनाचा अभाव किंवा नियोजनाची अंबलबजावणी याबाबत मी सांगणार आहे. 1967 साली मास ट्रान्स्पोर्टेशन इन मुंबई मेट्रोपोलिटन रिजन यासंदर्भातील एक अहवाल शासनाने पुन्हा एक कमिटी बसवून घेतला. त्यामध्ये सरफेस ट्रान्स्पोर्टेशन म्हणजे रस्त्यावरील वाहतूक, यामध्ये आणखी काही लिंक जोडता येतील काय तसेच न्यू रॅपिड ट्रान्झीट सिस्टीम काय करता येईल असे तीन विषय डोळ्यासमोर ठेवले. 1973 साली पुन्हा एक कमिटी बसवली आणि त्यांना आंतरदेशीय आणि आंतरराज्यीय अशा प्रकारच्या वाहतुकीसंदर्भातील विषय दिला. त्याच दरम्यान बॅक बे रिक्लमेशन झाले आणि दक्षिण मुंबईत प्रचंड प्रमाणात लोक येणे आणि वाहने येणे यासंदर्भातील विचार करण्याचा विषय आला. 1978 साली सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिटट्यूट यांना कॉम्प्रीहेन्सीव म्हणजे अतिशय सुक्ष्म पातळीवर जाऊन याचा अहवाल सादर करावा अशी सूचना करण्यात आली. त्यामध्ये सुध्दा रोड डेव्हलपमेंट प्लॅन, ट्राफीक मॅनेजमेंट स्ट्रॅटीजी, लॅंड यूज प्लॅनिंग हे विषय होते. त्यामध्ये लॅंड यूज प्लॅनिंग म्हणजे जमिनीचा योग्य वापर कसा करावा हा सगळ्यात महत्वाचा विषय होता. अशा प्रकारचे विषय त्यांना प्रस्तावामध्ये दिले गेले. यामध्ये काही फ्री वे सांगितले होते. यानंतर 1988 साली परांजपे कमिटी बसविण्यात आली. अशा प्रकारे एकूण पाच कमिट्या झाल्या. 1967,

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

1973, 1977, 1983 आणि 1988 मध्ये या समित्या बसविण्यात आल्या होत्या. आतापर्यंत जे केले त्याचा रिव्ह्यू परांजपे कमिटीला घेण्यास सांगितला. त्यातून मग एमयूटीपी वगैरे आले. यासंदर्भात मला एकच सांगावयाचे आहे की, या सगळ्या योजनांचा विचार करीत असताना दरम्यान ज्यावेळी एमएमआरडीए आणि एमयुटीपीचा प्रकल्प राबविण्याचा विषय आला तेव्हा, आपण सगळेजण वाहनांच्या बाबतीत लक्ष घालता पण जल वाहतूक, रेल्वे वाहतूक आणि रस्त्यावरील वाहतूक यामध्ये रेल्वेच्या वाहतुकीच्या संदर्भातील विषय जेव्हा आला तेव्हा रेल्वेच्या रुळालगत असलेल्या झोपडपट्ट्यांची संख्या किती होती ? श्री. चंद्रशेखर यांनी एक लेख लिहिला त्यामध्ये त्यांनी सांगितले की, 20 हजार कुटुंबे त्या ठिकाणी राहात होती. त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनावर आली. रेल्वेचा खर्च करीत असताना आपल्या राज्य शासनाने 50 टक्के खर्च करु असे सांगितले. यात हार्बर मार्गावरील 7831, मध्य रेल्वेवरील 2879 आणि पश्चिम रेल्वेवरील 622 कुटुंबांचा समावेश आहे.

यानतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

हया सर्व रेल्वेच्या दुतर्फा असलेल्या झोपडया आहेत. शेवटचा महत्वाचा विषय म्हणजे मुंबईत वाढणारा लोंढा हा आहे. त्यांचा पुन्हा दबाव येणार आहे. रेल्वेच्या जागेवरील झोपडया हटविल्यावर त्या जागेवर पुन्हा झोपडया उभ्या राहणार नाहीत याची दक्षता घेतली जात आहे काय, याकडे निश्चित लक्ष द्यावे. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे मी जाहीरपणे अभिनंदन करीन. याचे कारण असे की, मुंबई महानगरपालिकेने केलेल्या कारवाईला कोर्टाच्या निर्णयाचा आधार आहे. सभापती महोदय, आपण बी.पी.टी.च्या रस्त्यावरुन गेलात तर आपल्या निदर्शनास येईल की, रे रोडपासून शिवडीपर्यंत झोपडया होत्या. त्या रे रोडच्या पुलावर सर्व बांगलादेशी रहात होते. कोर्टाने आदेश दिले म्हणून एकाच वेळी त्या झोपडया पाडण्यात आल्या. अन्यथा त्या झोपडयांच्या बाजूने सर्वच पक्षाचे राज्यकर्ते उभे राहिले असते. मनोरा आमदार निवासाच्या मागे समुद्र किनारी लगत असलेल्या झोपडयांची प्रचंड संख्या वाढली आहे. तो वेगळा विषय असल्यामुळे त्याबाबत मी बोलणार नाही.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये रेल्वे ओव्हर ब्रिजेस हा एक विषय आहे. शासनाने रेल्वे ओव्हर ब्रिज पूर्ण केले आहेत ? याची संख्या पाहिली तर आपल्या लक्षात येईल की, आजही विक्रोळी रेल्वे स्टेशनचा पूल झालेला नाही, शिवडीचा पूल होत नाही, कुर्ला रेल्वे स्टेशनसाठी डबल पूल करण्याचे ठरले होते तोही झालेला नाही. अंधेरी, जोगेश्वरचे ओव्हर ब्रिजेस झालेले नाहीत. हे सर्व एमयूटीपी अंतर्गत आहे. ज्या योजना आखल्या होत्या त्यांचा कालावधी 2008 पर्यंत होता. श्री.चंद्रशेखर यांच्या लेखामध्येच त्याचा उल्लेख आहे. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, "प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन जून, 2000 पर्यंत करु, पुनर्वसनाचे संपूर्ण काम 2005 पर्यंत करु आणि उर्वरित सर्व कामे 2008 पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी आहे." मी स्पेसिपिक 4-5 मुद्दे मांडले आहेत. सभापती महोदय, ठाणे शहरातील वाहतुकीचा आपण देखील अनेक वेळा उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, जल वाहतुकीसंबंधी खास करुन सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुद्दा मांडला आहे. या संदर्भात Transportation : a strategic perspective, असा अहवाल दिला आहे. त्यात त्यांनी नवी मुंबईकडे जाणा-या जल वाहतुकीसंबंधी उल्लेख केला आहे,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

त्यात असे म्हटले आहे की, "Colaba and Navi Mumbai and North- South route on the east coast of Mumbai. However, the group had opined that conventional North-South ferry services along west coast may not be feasible due to inadequate draft and inclement weather." परंतु मुंबईमधील वाहतुकीसंबंधी माझी शासनाला विनंती आहे. वडाळा येथे वाहन तळ निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा शहरातील वाहतुकीची कोंडी वाढलेली आहे. म्हणून माझी अशी सूचना आहे की, मुंबई-कोकण रस्ता किंवा उरण येथील जेएनपीटीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूला प्रचंड जागा आहे. पनवेल येथे ट्रक टर्मिनल केले आणि तेथे रात्रीच्या वेळी ट्रक येऊ दिले तर मुंबईमध्ये येणारी ट्रकची वाहतूक कमी होईल. त्याचप्रमाणे बेस्टने मुंबईतील काही कार्यालयांना फ्रेंचाईज केले पाहिजे. असे तर बेस्टला अधिक उत्पन्न मिळेल. याचे कारण असे आहे की. सध्या प्रत्येकजण वेगवेगळी गाडी वापरतो. एकाच इमारतीमध्ये एकच कॉर्पोरेट ऑफिस असेल तर त्यांच्यासाठी बसची व्यवस्था करावी. पुण्यामध्ये एका रिक्षामध्ये 15-20 शाळकरी मुलांची ने-आण केली जाते. तेथेही वाहनांचा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. पुणे महानगरपालिकेने मला पत्र पाठवून कबूल केलेल्या गल्ल्यांमध्ये आजही पार्किंग केले जात आहे. पार्किंगचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आपण केवळ इमारतींबाबत बोलत आहोत, पण मल्टी लेव्हल कार पार्किंग पुणे येथे सुरु केले आहे तसे मुंबईतही सुरु केले पाहिजे.

सभापती महोदय, सीएनजीचा विषय देखील महत्वाचा आहे. आज अनेक गाडयांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केला जातो. अशा वापरावर ताबडतोब प्रतिबंध घातला पाहिजे आणि सीएनजी सेंटर्सची संख्या वाढविली पाहिजे. सध्या अनेक रिक्षा व टॅक्सीजना सीएनजीसाठी 2-3 तास रांगेत उभे रहावे लागते. मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्यावर शासनाने कार्यवाही करावी अशी सूचना करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्यासंबंधात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी जे अनेक विषय अन्य सदस्यांकडून कव्हर झालेले आहेत त्यावर मी अधिक बोलणार नाही. माझा मुद्दा क्रमांक 1 सीएनजी संबंधात आहे. एका बाजूला आपण म्हणतो की, सीएनजी सक्तीचे झाले पाहिजे. परंतु आमच्या ठाणे जिल्ह्यात रिक्शांना सीएनजी मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेले आहे परंतु सीएनजी भरण्याची सेंटर्स कमी असल्याने असलेल्या सेंटरवर लांबच लांब रागा लागतात आणि नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण येथून रिक्शा सीएनजी भरण्यासाठी येत असतात व त्या रांगांमध्ये त्यांना 4-4 तास उभे रहावे लागते. गेले अनेक महिने हा प्रकार सुरू आहे. त्यामुळे माझी या निमित्ताने तातडीची मागणी आहे की, ही सीएनजी भरणा केंद्रे नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण, भिवंडी आणि ठाण्यामध्ये देखील वाढली पाहिजेत. कारण सध्या सीएनजी वरील वाहनांची संख्या वाढते आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्हा हा वाहतूक कोंडीग्रस्त जिल्हा आहे असे म्हणायला हरकत नाही इतकी वाहतूक कोंडी या जिल्ह्यामध्ये सर्वत्र सातत्याने होत असते. कारण चारही बाजुनी वाहतूक येत असते. जेएनपीटीची क्षमता वाढविण्यात आलेली आहे त्यामुळे ट्रक्स, ट्रेलरसी संख्या आजच्यापेक्षा दसपटीने वाढणार आहे. परिणामत: जिल्ह्यातील सर्व रस्ते ट्रक्स व ट्रेलरस्च्या मुळे कोंडीत असतात. त्यामुळे भविष्यात हा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. म्हणून एका बाजूला तुम्ही क्षमता वाढवित असताना ही वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीनेही विचार केला पाहिजे. कारण दिवस-रात्र हे ट्रेलर्स जात असतात त्यामुळे वाहतकीची प्रचंड कोंडी होते. या ठिकाणी हायवेवर वाहने उभी केली जातात. ठाण्यातील घोडबंदर रोड, मुरबाड रोड, शीळफाटा तसेच जुना मुंबई-पुणे रस्ता या सगळ्या मोठ्या रस्त्यांवर, हायवेवर सगळी वाहने उभी असतात तसेच रेती वाहून आणणारी वाहने देखील त्याच्या जोडीला असतात. त्यामुळे या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते आणि त्यामुळे या रस्त्यांमध्ये मोठमोठ्ठे खड्डे पडलेले आहेत. म्हणून या बाबतीत काही कठोरपणे निर्णय घेतले गेले पाहिजेत अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. या रस्त्यांच्या स्थिती बद्दल, विशेषत: मुंब्रा बायपास रस्ता आताच चांगला करण्यात आला, नव्याने बांधण्यात आलाआहे, तो रस्ता किमान तीन वर्षे तरी टिकायला पाहिजे होता. पण त्यावर आता एक वर्ष देखील झाले नाही पण त्यात मोठमोठ्ठे खड्डे पडले आहेत, त्यामुळे त्या रस्त्यावर अपघात व्हायला लागले आहेत. तेव्हा या रस्त्यांच्या स्थितीबद्दल देखील या सगळ्याच बाबतीत मास्टरप्लॅन

...... यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर .....

तयार केला पाहिजे. टोलनाके देखील या वाहतूक कोंडीला कारणीभूत आहेत. या टोल नाक्यांचे आधुनिकीकरण करणार म्हणून येथे आम्हाला सांगण्यात आले होते पण त्यादृष्टीने अजून कोणतीही हालचाल शासनाकडून वा संबंधित विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे आज देखील तेथे दिवस दिवस वाहने उभी असतात. सभापती महोदय, या ठिकाणी महत्त्वाचा विषय असा आहे की, एमएमआरडीएच्या भागामध्ये रिक्शा, टॅक्सी वाहतूक मोकळी करण्यात आलेली आहे असा जीआर शासनाने काढला आहे मात्र अजूनपर्यंत त्यांच्या युनियनमुळे त्याची अमलबजावणी होऊ शकलेली नाही. आपण घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी आपण करू शकत नसाल तर तो जी.आर. तरी आपण मागे घ्यावा आणि तो निर्णय रद्द करावा. परंतु एकदा निर्णय झाल्यानंतर तो कठोरपणे अमलात आला पाहिजे. तेव्हा तेथील हद्द किती दिवसात मोकळी करणार आहात याबाबत आपण निश्चित जाहीर करावे. खरे तर त्याबद्दल जीआर आपण काढलाच आहे तेव्हा त्याची कठोरतेने अमलबजावणी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सध्या आरटीओ कार्यालयांमध्ये जनतेची जेवढी फसवणूक केली जाते तेवढी अन्यत्र कोठेही होत नाही. तेथे असलेले एजंटस् वगैरेमुळे सामान्य माणसापुढे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे त्यासंबंधात देखील आपण निश्चित असा निर्णय करण्याची गरज आहे. या ठिकाणी हे जे सगळे प्रश्न आहेत, ते दैनंदिन आपल्याला पहावयास मिळतात. जेथे वाहतूक कोंडी होत असते तेथे आपला पोलीस केव्हाही दिसत नाही मात्र चढणीवरील रस्त्यांवर आपले वाहतूक पोलीस उभे असतात आणि ते वाहनचालकांकडून पैसे गोळा करीत असतात. ...

( यानंतर श्री. मा.शिगम ....व्ही 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...)

एका बाजूला वाहतूक पोलीस हे चांगले काम करीत असले तरी ठराविक कलेक्शनचे त्यांना टारगेट दिलेले असल्यामुळे ते वाहन चालकांना नाहक त्रास देत असतात. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी ठोस अशा कार्यक्रमाची अंमलबजावणी माननीय मंत्री महोदय करणार आहेत की नाहीत, रस्त्याच्या संदर्भात मास्टर प्लॅन करणार आहेत की नाहीत हे त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे, एवढे बोलून आणि उपसभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी थोडा अधिक वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : उपसभापती महोदय, मुंबई आणि ठाणे शहरात होणारी वाहतुकीची कोंडी या विषयावर नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

मुंबई आणि ठाणे शहरामध्ये होणा-या वाहतुकीच्या कोंडीसंबंधी अनेक सन्मानीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले असले तरी या विषयाच्या संदर्भात काही प्रश्नांकडे वेगळया अंगाने पाहाण्याची गरज आहे. 1995मध्ये सत्तांतर झाल्यानंतर मुंबई आणि ठाणे शहरांमध्ये बेसुमार इमारती उभ्या राहिल्या. मोठ-मोठ्या मल्टी स्टोरीज बिल्डिंग उभ्या राहिल्या. ह्या इमारती उभ्या होत असताना त्यासाठी लागणा-या अन्य पायाभूत सुविधा निर्माण करायला पाहिजे होत्या त्या मात्र केल्या गेल्या नाहीत. दुसरे असे की, मुंबई शहरातील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जागेवर मोठ मोठ्या इमारती उभ्या रहायला लागल्या आहेत. ह्या इमारती किती उंचीच्या असाव्यात, किती मजल्यांच्या असाव्यात याबाबत कोणतेही नियोजन आणि नियंत्रण नाही. यातूनच वाहतुकीचे प्रश्न उभे राहिलेले आहेत असे माझे स्वत:चे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी एमयूटीपी, एमआयटीपी आणि एमएमआरडीएच्या संदर्भात येथे सांगितले. आज प्रत्येक पक्षातील नेत्यांच्या युनियनमुळे प्रशासन हतबल झालेले दिसते. एका पक्षातील नेता रिक्षा युनियनचे काम करतो तर दुस-या पक्षातील नेता आणखी काही काम करीत असतो. श्री. शरद राव सारखा रिक्षाचालकांची युनियन चालविणारा नेता असे सांगतो की, रिक्षांना इलेक्ट्रानिक्स मीटर बसवू देणार नाही, त्या जुन्याच मीटर प्रमाणे चालतील. अशा प्रकारची एक अहमहमिका लागलेली आहे. परिणामी प्रायव्हेट ट्रान्सपोर्टेशन वाढले आणि एस.टी.आणि बसेसना बाजूला व्हावे लागले. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, बेस्टमधून 60 टक्के प्रवाशांची सोय होत असताना रस्त्यावरील फक्त 4 टक्के जागा बेस्ट व्यापते. इतर वाहने मात्र अधिक जागा व्यापतात. बेस्टप्रमाणेच एस.टी.चाही फार चांगल्या प्रकारे उपयोग होत असताना देखील एस.टी.ची आजची अवस्था काय आहे याचा विचार केला जात नाही. परिणामी मुंबई आणि ठाणे या दोन्ही शहरांमध्ये खाजगी गाड्यामुळे वाहतुकीची कोंडी वाढलेली आहे.

तालिका सभापती महोदय, कोणी किती गाड्या घ्याव्यात हा विषय वेगळा आहे. या ठिकाणी भाषण करणारी आपण मंडळी पाच-सहा गाडयांचे मालक कधी होऊन जातो ते आपल्याला देखील

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती अलका देसाई.....)

कळत नाही. माझा जन्म मुंबईमध्ये झाला, मी लहान होते त्यावेळी मुंबईमध्ये ट्राम चालायच्या, आता त्या बंद झालेल्या आहेत. या शहरामध्ये आपण कसे परमिट देणार याचा विचार होणे गरजेचे आहे. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर असून राज्याची आणि देशाची ती आर्थिक राजधानी समजली जाते. या मुंबई शहराचा नियोजनबध्द विकास होणार नसेल तर आपण कुठे तरी अपयशी ठरत आहोत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. तेव्हा या मुंबई शहराचा नियोजनबध्द विकास करण्याच्या दृष्टीकोनातून या सभागृहामध्ये सर्वंकष अशी चर्चा घडवून आणावी अशी मी या निमित्ताने मागणी करते आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल उपसभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपविते.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या सभागृहात मुंबई आणि ठाणे शहरातील वाहतुकीची समस्यांबाबत प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आज मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 20 लाख एवढी आहे. पुढच्या दहा वर्षाचा विचार केला तर या शहराची लोकसंख्या 2 कोटीच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.टाटा कंपनी नॅनो गाडीची निर्मिती करीत आहे. आजच वाहतुकीची अवस्था हाताबाहेर गेलेली आहे. नॅनो सारख्या छोटया छोटया गाडयांची निर्मिती दुस-या कंपनीनी केली तर वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण पडेल. मला चार चाकी वाहनात बसण्याची संधी कधी मिळेल म्हणून मध्यमवर्गीय कुटुंबे नॅनो गाडीची वाट पहात आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, नॅनो सारख्या गाडया निर्मितीवर बंदी घातली पाहिजे. या गाडयांच्या निर्मितीवर बंदी घालण्यापेक्षा रस्त्यांचे नियोजन शासनाने व्यवस्थितपणे केले तर वाहतुकीची अडचण निर्माण होणार नाही. चार चाकी स्वत:च्या वाहनामध्ये बसण्याचे मध्यमवर्गीय कुटुंबियांचे स्वप्न सुनियोजित पध्दतीने पूर्ण केले तर मध्यमवर्गीय कुटुंबे शासनाला धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाहीत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, प्रवासी बसला जागा कमी लागते आणि त्या बसमधून मोठया प्रमाणात प्रवाशांची वाहतूक केली जात आहे. कारच्या माध्यमातून 5 टक्के प्रवासी वाहतूक होते, परंतु कारमुळे 65 टक्के जागा व्यापली जाते. खाजगी वाहनांवर खरोखरच बंदी आणू शकतो काय ? याचा शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "एक कुटुंब एक कार" असा कन्सेप्ट आपण राबवू शकतो काय ? याचा शासनाने विचार करावा. जगातील नावाजलेल्या मोठया शहरांमध्ये वाहनांवर निर्बंध लादलेले आहेत. तशा प्रकारचे निर्बंध आपल्याला लादता येतील काय ? याचा देखील शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुंबई शहरातील डॉक्टर्स, वकील आपल्या स्वत:च्या मालकीच्या गाडीने आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी येतो. या व्यक्ती स्वत:च्या वाहनाने कर्तव्याच्या ठिकाणी का येतात? या गोष्टीचा देखील शासनाने विचार करण्याची गरज आहे. उपनगरातून वकीलास हायकोर्टात कामासाठी यावयाचे असेल आणि तो प्रवासी बसने प्रवास करीत असेल तर त्यास हायकोर्टात पोहोचण्यासाठी बराच वेळ लागतो. डॉक्टर्स, वकील अशा प्रोपेशनल व्यक्ती प्रवासी बसमधून येऊ शकतात काय ? रेल्वेने प्रवास करु शकतात काय ? या बाबींचा विचार करणे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

आवश्यक आहे. सुखकर प्रवास करण्यासाठी बसेस उपलब्ध करुन देणे, रेल्वेस चांगल्या प्रकारचे कोच लावणे या गोष्टीकडे शासनाने लक्ष केंद्रीत करुन तशी व्यवस्था निर्माण केली तर या प्रोफेशनल व्यक्ती सार्वजनिक व्यवस्थेचा निश्चितपणे उपभोग घेऊ शकतील. मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्था कशी सुखकर होईल, वाहने रस्त्यावरुन वेगाने कशी जातील याबाबतीत शासनाने व्यवस्थितपणे नियोजन करणे गरजेचे आहे. मुंबई शहराला इंटरनॅशनल फायनान्स सेंटर बनवावयाचे आपण स्वप्न पहात आहोत. जर वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व्यवस्थित केले नाही तर ते स्वप्न कधीही पूर्ण होऊ शकत नाही. मुंबई शहरात इन्फ्रास्ट्रक्चरचा अभाव असेल, मोठया प्रमाणात वाहतुकीची        होत असेल, मोठया प्रमाणात प्रदुषण असेल तर परदेशातील कंपन्या मुंबईत येण्यास धजावणार नाहीत. आपण वाहतुकीचे व्यवस्थापन वेळीच केले नाही तर आपले इंटरनॅशनल फायनान्स सेंटरचे स्वप्न उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही असे मी नम्रपणे सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य        श्री. जयंत प्र.पाटील यांनी मुंबई बंदराची आवश्यकता नाही असा ओझरता उल्लेख केला. मुंबई पोर्ट ट्रस्ट बंद करावा अशी त्यांनी या ठिकाणी मागणी केली आहे. पोर्ट ट्रस्ट बंद करुन चालणार नाही. त्या बंदरावर 50 हजार भूमिपुत्र काम करीत आहेत. मुंबई पोर्ट ट्रस्ट हे जागतिक किर्तीचे बंदर आहे...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मुंबई पोर्ट ट्रस्ट बंद करावे अशी मागणी केलेली नाही. सदर टर्मिनल नवीन मुंबईतील वाशी येथे निर्माण केले तर मोठया प्रमाणात ट्रकची वाहतूक तिकडे वळती होईल. पर्यायाने मुंबईतील वाहतुकीचा ताण कमी होईल अशा प्रकारचा उल्लेख मी माझ्या भाषणात केला आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई पोर्ट ट्रस्ट येथून माहूल मार्गे मानखूर्दपर्यंत नवीन रस्ता तयार केला तर मुंबई पोर्ट येथील ट्रॅफीक परस्पर वळती होऊ शकते. हा रस्ता शासनाच्या विचाराधीन आहे. तो रस्ता शासन दरबारी कागदावरच धूळ खात आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या प्रशासनाशी चर्चा करुन सदर रस्ता शासनाने अंमलात आणला तर मुंबईकराची या ट्रस्टच्या ट्रॅफीक पासून सुटका होईल असे मत या ठिकाणी व्यक्त करतो. या रस्त्याच्या बाबतीत शासनाने प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 11:25

श्री. प्रकाश शेंडगे ....

सभापती महोदय, सागरी महामार्गाविषयी प्रत्येक वर्षी सदनामध्ये चर्चा होते. परंतु यादृष्टीने ठोस पावले उचलली जात नाहीत. हा महामार्ग होणार किंवा नाही हे मला माहीत नाही. निविदा झालेल्या आहेत, एमओयू केलेला आहे असे सांगितले जाते. परंतु हा मार्ग प्रत्यक्षात कधी होणार हे माहीत नाही. हा महामार्ग झाल्याशिवाय या मुंबईतील वाहतूक व्यवस्थेला पर्याय मिळणार नाही. म्हणून लवकरात लवकर महामार्ग सुरु करावा अशी मी विनंती करतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी याविषयावर बोलताना चांगल्या सूचना केलेल्या असल्यामुळे मी अधिक न बोलता माझे भाषण येथेच संपवितो. धन्यवाद.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (परिवहन राज्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, नियम 260 अन्वये विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी वाहतुकीच्या प्रश्नाविषयीचा प्रस्ताव सदनात मांडलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी केली आणि त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, जयंत प्र.पाटील, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री अरविंद सावंत, संजय केळकर, श्रीमती कमल देसाई, आणि श्री. प्रकाश शेंडगे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हे खरे आहे की, मुंबई, ठाणे आणि एमएमआरडीएच्या कार्यक्षेत्रामध्ये वाहतुकीमध्ये बेसुमार वाढ झालेली आहे. वाहतुकीच्या कोंडीचा फटका सर्वसामान्य माणसापासून ते मोठया उद्योगपतींना सुध्दा बसतो आहे. कधी कधी विमानतळावर जायचे असेल तर वेळेवर पोहोचू किंवा नाही असा प्रश्न पडतो. त्यातच जर पाऊस असेल तर सगळे वेळापत्रकच कोलमडून पडते. आपण 2-3-4 तास वाहतुकीच्या कोंडीमध्ये अडकून पडतो आणि आपल्या सर्वांचाच बेसुमार वेळ वाया जातो. ही गोष्ट खरी आहे की, मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून आपल्याला मुंबई आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवायचे आहे. परंतु हे शक्य आहे किंवा नाही आणि त्याचे नियोजन कसे करणार आणि मुंबईचे काय होणार असा प्रश्न पडतो. वाहनांचे प्रदूषण आणि त्यायोगे येणाऱ्या असंख्य समस्या ही खरी समस्या आपल्यासमोर आहे असे सन्माननीय सदस्यांनी यावर आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले. आज मुंबई शहराची लोकसंख्या जवळजवळ 1 कोटी 20 लाखांच्या घरात पोहोचली आहे. ठाणे आणि नवी मुंबईची लोकसंख्या सुध्दा वेगाने वाढते आहे. मुंबई शहरामध्ये वाहनांची संख्या जवळपास 15 लाखाच्यावर गेली आहे. रोज मुंबई शहरामध्ये 15 हजार वाहनांची भर पडत आहे. वाहतूक व्यवस्थेची समस्या सोडविण्याकरिता मुंबईमध्ये त्यासाठी असलेल्या पोलिसांची संख्या पाहिली तर ती फक्त 2600 इतकी आहे. अशा परिस्थितीत ही वाहतुकीची कोंडी फोडायची कशी असा प्रश्न पडतो. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी यासंदर्भात वेगवेगळया अहवालांचा उल्लेख केला. वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी व त्यावर उपाय सुचविण्यासाठी अनेक समित्या नेमल्या. त्यांचे अहवाल आले. यावर काय उपाय करता येऊ शकतात याचा विचार झाला. डिझेलचे दर वाढवायचे काय ? शहरामध्ये नवीन वाहनांना बंदी घालता येईल काय ? नॅनाकारवर बंदी घालता येईल काय ? एक फॅमिली आणि एक कार अशी व्यवस्था निर्माण करता येईल काय ? सम आणि विषम दिवशी गाडया बाहेर काढणे अशा अनेक उपायांवर विचार झाला. यासाठी केंद्र आणि राज्य

....3



SSK/ MMP/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

शासनाचे कायदे आहेत. त्यामध्ये सुधारणा करावी लागेल. सध्या असलेली वाहतूक व्यवस्था बळकट कशी करता येईल आणि वाहतुकीची कोंडी कशी फुटेल याचा विचार झाला. आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार 1 कि.मी. अंतरामध्ये 300 वाहने उभी राहातात परंतु मुंबईमध्ये 500 ते 600 वाहने 1 कि.मी.अंतरामध्ये उभी राहतात. म्हणजे जवळजवळ दुप्पट वाहने उभी राहतात आणि त्यात नॅनोसारख्या कारची भर पडली तर वाहने पुढे-मागे सुध्दा होणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण होईल. म्हणून एमएमआरडीए तसेच एमयुटीपी या यंत्रणांनी अनेक प्रकल्प हातामध्ये घेतले आहेत. यासाठी निधी कसा देता येईल याचाही विचार केला आहे. त्याचप्रमाणे मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली एक यूएमएमटीए नावाचे प्राधिकरण स्थापन केलेले आहे. मुंबईत येणाऱ्या वाहनांसाठी पुढे काय करता येईल आणि हे प्रदुषण हटविण्यासाठी काय करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी जवळजवळ 23-24 तज्ज्ञ लोकांची समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल लवकर अपेक्षित आहे. आज एमएमआरडीएमार्फत वेगवेगळे प्रकल्प हातामध्ये घेतलेले आहेत. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रोचे काम सुरु झालेले आहे. 11.7 कि.मी.चे हे काम आहे. मेट्रो रेल्वेचे काम पूर्ण झाल्यावर पूर्वी अंधेरीला जाण्यासाठी 71 मिनिटे लागत होती ती वेळ 21 मिनिटांवर येईल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 11:30

श्री.हसन मुश्रीफ...........

हे काम बीओटी तत्वावर दिले गेले आहे. या कामासाठी 2356 कोटी रुपये खर्च येणार आहे. फेब्रुवारी, 2008 ला काम सुरु केले असून 2011 मध्ये हे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे थोडा ताण या वाहतुकीच्या दृष्टीने कमी होईल असा कयास एमएमआरडीएचा आहे. नुकताच बांद्रा येथे स्कायवॉक पूर्ण केला असून आणखी 40 स्कायवॉक प्रस्तावित आहेत. त्यासाठी एका सल्लागाराची नियुक्ती केली आहे. महानगरामध्ये 50 ठिकाणी मोनोरेल उभारण्यासाठी देखील एका सल्लागाराची नियुक्ती करण्याचे काम सुरु आहे. चारकोप-वांद्रे-माहीम व कुलाबा-माहीम-वांद्रे असे दोन मार्ग असणार आहेत. यासाठी केंद्र सरकारबरोबर चर्चा सुरु आहे. या कामाची टेंडर प्रक्रिया देखील सुरु आहे. सागरी महामार्गाचा उल्लेख करण्यात आला आहे. एमएसआरडीसीच्या माध्यमातून सागरी महामार्ग म्हणून वरळी-वांद्रे या पुलाचे काम सुरु असून हे अंतर 5-6 कि.मी.चे आहे. पुढील 5-6 महिन्यात या मार्गाला सुरुवात होईल. जल वाहतूक जास्तीत जास्त पध्दतीने तयार करणे आणि ते काम लवकरात लवकर कसे पूर्ण होईल यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. स्कायवॉक, एलिव्हेटेड रस्ते, फ्लायओव्हर्स, भुयारी मार्ग या माध्यमातून वाहतुकीवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा प्रश्न म्हणजे या मुंबई शहरामध्ये अधिकाधिक पार्किंगची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. आज पार्किंगच्या दृष्टीने गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. मोठमोठे टॉवर्स उभारताना त्याठिकाणी पार्किंगची व्यवस्था झालीच पाहिजे यादृष्टीने महानगरपालिकेकडून इमारतीच्या कामाला परवानगी देत असताना अटी घातल्या जात आहेत. नव्याने जागा उपलब्ध करुन देऊन त्याठिकाणी पार्किंगची व्यवस्था केली जाणे, पार्किंगसाठी जादा फी आकारणे अशा अनेक उपाययोजना महानगरपालिका आणि एमएमआरडीए यांच्याकडून केल्या जात आहेत. या समस्येबाबत समिती नेमली आहे त्यांनी किंवा राज्य मंत्रिमंडळामध्ये काम करणारी मंडळी यांनी देखील या प्रश्नाबाबत अधिक गांभीर्याने याबाबत लक्ष देण्याची वेळ आली आहे. त्याशिवाय ही कोंडी सुटणार नाही. यासाठी जे जे करणे अत्यावश्यक आहे ते करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी म्हटल्याप्रमाणे ही चर्चा वांझोटी होता कामा नये. चर्चा करणार आणि निघून जाणार असे होऊ नये म्हणून या समस्येबाबत जे जे करता येणे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न करीत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...........

सभापती महोदय, पाच दिवसापूर्वीच माझ्याकडे या खात्याचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. या प्रश्नामध्ये लक्ष घालून समोर असणाऱ्या समस्यांबाबत काय उपाययोजना त्वरेने करता येतील व वहातुकीची कोंडी कशी फुटेल यासाठी शासन प्रयत्न करील हे मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, हे खरे आहे की, आज मुंबई शहरातील टॅक्सींची अवस्था चांगली नाही. रिक्षांची अवस्था चांगली नाही. टॅक्सीमध्ये बसल्यानंतर काचा नीट बंद होत नाहीत. त्यामुळे रस्त्यावरील धूळ आत येते, वाहनांचा धूर आत येतो, पावसाचे पाणी आत येते अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाने टॅक्सी युनियनच्या प्रतिनिधींना सिंगापूर या देशात नेले होते. तेथील टॅक्सीची व्यवस्था कशी आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. तेथील टॅक्सीना इलेक्ट्रॉनिक मीटर असतात, सोबत प्रिंटर असतो, दूरध्वनीच्या माध्यमातून तात्काळ टॅक्सी सेवा उपलब्ध होते. त्यादृष्टीने आपण फ्लिट योजना सुरु केली. टॅक्सीची व्यवस्था चांगली असावी म्हणून प्रयत्न केला आहे. 1997 पासून नवीन परमिट देणे बंद केले आहे. परंतु ज्यांचे पूर्वीचे परमिट आहे त्या परमिटच्या आधारे कंपन्यांना 500 किंवा 1000 टॅक्सीचे फ्लिट असलेल्या मेरु, गोल्ड कॅब यासारख्या योजनेस शासनाने परवानगी दिली आहे. योजनेच्या माध्यमातून प्रवाशांना अधिक सुखसुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न केलेला आहे. परदेशामध्ये ज्याप्रमाणे टॅक्सी योजना आहे तशा प्रकारची सुविधा या मुंबई शहरात कशी देता येईल, प्रदुषण कसे रोखता येईल यादृष्टीने प्रयत्न केला जात आहे. 8 वर्षापूर्वीच्या टॅक्सीना सीएनजी किट बसविणे सक्तीचे केले असून आतापर्यंत 90 टक्के वाहनांना सीएनजी किट बसविण्यात आले आहे. आज आवश्यक तेवढी सीएनजी गॅस भरणा करणारी केंद्रे आहेत. पुढील काळात आवश्यकता भासल्यास केंद्रांची संख्या देखील वाढविणार आहोत.

(नंतर श्री.भारवि.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/ भोगले... 11:35

श्री.हसन मुश्रीफ....

रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती देसाई मॅडम यांनी विचार व्यक्त केला आहे. इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यासाठी श्री.शरद राव यांचा विरोध आहे. यासाठी श्री.शरद राव यांच्याशी देखील चर्चा करावी लागेल. प्रवाशांकडून भाडे आकारताना पारदर्शीपणा आला पाहिजे. प्रवाशांकडून जादा पैसे घेणे, त्यांना त्रास देणे, हया गोष्टी घडता कामा नयेत. यासाठी टॅक्सी व रिक्षा युनियनशी चर्चा करून मार्ग काढता येईल. तसेच आमच्या अधिकाऱ्यांना देखील टॅक्सी-रिक्षा तपासताना, परमिट देताना नीट काम केले पाहिजे. यात भ्रष्टाचार होणार नाही याकडे देखील लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आकाश फाटले आहे, तिथे माझ्या सारखा गरीब माणूस ठिगळ लावू शकत नाही. परंतु, जास्तीत जास्त ठिगळं कशी बुजवता येतील, भ्रष्टाचार कसा कमी करता येऊ शकेल यासाठी प्रामाणिकपणाने, निष्ठेने प्रयत्न करू एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी पाच दिवसापूर्वी खात्याचा चार्ज घेतला आहे, असे सांगितले आहे. आकाश फाटले आहे, हे त्यांनी मान्य केले आहे. याचा अर्थ ते ठिगळ लावणार आहे. त्यामुळे सर्वांनी त्यांच्यावर आता हल्लाबोल करू नका. आपल्या सगळ्यांच्या अडचणी त्यांना समजल्या आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, येथे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 2-3 प्रश्न उपस्थित केले आहेत. आता गाड्यांचे लायसेन्स देण्यासाठी स्मार्ट कार्ड योजना सुरू केली आहे. यासाठी आपण निविदा मागविली होती. त्यानुसार युनायटेड टेलिकॉम लि.बंगळुरू यांना मार्च 2006 पासून लायसेन्स स्मार्ट कार्डचे काम दिलेले आहे. यासाठी 200 रूपये फी आहे. ही फी केंद्र शासनाने ठरविली आहे. नोंदणीसाठी देखील स्मार्ट कार्ड योजना सुरू केली आहे. यासाठी शॉंक इंटरनॅशनल टेक्नॉलॉजी यांना सन 2006 पासून 15 वर्षाकरिता स्मार्ड कार्ड योजनेचे काम दिले आहे. यासाठी 350 रूपये फी आहे. दिवसेंदिवस तंत्रज्ञान बदलते आहे, हे खरे आहे. सदर कंपनी कोणाची आहे, याची माहिती मी घेतलेली नाही. ती माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल. पाच वर्षाने याचा आपण पुन्हा फेरविचार करू शकतो. आठ महिन्यांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

लायसेन्स दिले असे सांगण्यात आले आहे. त्याची देखील आम्ही निश्चितपणाने चौकशी करू. अशाप्रकारे ग्राहकांवर अन्याय होणार असेल तर तो देखील बरोबर नाही. तेव्हा जो कंत्राटदार आहे, त्याला बोलावून कशा पद्धतीने काम केले जाते आहे, याची विचारणा केली जाईल. आपला पाच वर्षाचा नियमच आहे. ड्रायव्हींग लायसेन्सची मुदत 20 वर्ष किंवा वयाची 50 वर्षे यापैकी जे आधी येईल त्या तारखेपर्यंत, वयाच्या 50 वर्षानंतर दर 5 वर्षांनी लायसेन्सचे नूतनीकरण केले पाहिजे आणि ट्रान्सपोर्ट वाहनांच्या लायसेन्सची मुदत तीन वर्षांची आहे. दर तीन वर्षानी ट्रान्सपोर्ट लायसेन्सचे नूतनीकरण केले पाहिजे. अशा प्रकारे कायदा आहे. ज्याला आपण कंत्राट दिले आहे, तो या पद्धतीने काम करीत नसेल तर त्याची देखील चौकशी करून त्याप्रमाणे काम करायला त्याला भाग पाडण्यात येईल. आता आपण फ्लीट टॅक्सी स्कीम सुरू केली आहे. 1988 मधील 74 नुसार कंत्राटी परवाने घेतलेल्या मोटार कॅबचा समावेश फ्लीट टॅक्सी स्कीममध्ये केला आहे. यामध्ये मोटर कॅब व्यवस्था व जीपीएस-जीपीआरएस व्यवस्था असणे आवश्यक आहे. यासाठी परमिटधारकारने कंपनीशी करार करणे आवश्यक आहे. त्याने जर अटींचा भंग केला तर दहा हजार रूपये दंड करणे अशी तरतूद कायद्यामध्ये आहे. टॅक्सीची सेवा प्रवाशांना चांगली कशी देता येईल, परदेशाप्रमाणे प्रवाशांची वाहतूक कशी करता येईल यासाठी देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे. आमची परिवहन विभागात वर्ग-3 मधील 2770 पदे आहेत. प्रादेशिक परिवहन गट-अ मध्ये 15, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्ग-1 ची 54 पदे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी वर्ग-2 ची 97 एवढीच मंजूर पदे आहेत. आमच्या विभागातील काही पदे रिक्त आहेत. एमपीएससीकडून ही स्ट्रेन्थ वाढविणे आवश्यक आहे. येथे श्री.गुजराथी साहेबांनी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. जोपर्यंत सार्वजनिक वाहतुकीचा वापर जास्त होणार नाही तो पर्यंत काहीही करता येणार नाही. खाजगी वाहतूक आणि सार्वजनिक वाहतूक यात बराच फरक आहे. सार्वजनिक वाहनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आपण लोकांना उद्युक्त केले पाहिजे. आपली सार्वजनिक वाहने ही वेळेत व गतीने पोहोचली तरच लोक त्याकडे आकृष्ट होतील. त्याशिवाय वाहतुकीची कोंडी सुटणार नाही. प्रदूषण कमी होणार नाही. 15 वर्षानंतर वाहने कंडम केली



BGO/ MMP/ SBT/ भोगले... 11:35

श्री.हसन मुश्रीफ....

पाहिजेत. अशा प्रकारचा कायदा करून वाहनांवर बंधने आणणे आवश्यक आहे. यासाठी अनेक योजना आखल्या आहेत. यासाठी आपण समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर शासन निश्चितपणाने वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी प्रयत्न करील आणि मुंबईतील वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करील असा विश्वास मी या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला देत आहे.

यानंतर पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : महोदय, सभागृहात वाहतुकीच्या संदर्भात झालेल्या चर्चेत सर्वसाधारण धोरणात्मक दृष्टीने व व्यापक प्रमाणात चर्चा झाली परंतु ज्याला आपण स्पेसिफिक ॲक्शन प्लॅनसंबंधी काही मुद्दे जर या चर्चेतून घेता आले तर त्याचा शासनाला उपयोग होऊ शकेल. या चर्चेमध्ये प्रदुषणासंबंधीचा महत्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. तो म्हणजे वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी एमपीसीबीकडून काढून ती आता गृह विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे, याचा विचार केला तर गृह खात्याकडे प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक ती यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे कुठल्या तरी एजन्सीच्या माध्यमातून पीयुसी सर्टिफिकेट्स देणे वगैरे प्रकार होतात, त्यामुळे नियंत्रण नाही. हे प्रदूषण रोखण्यासाठी एमपीसीबीचे नियम आणि ॲक्ट आहेत. तेच कायदे व ॲक्ट गृह खात्यात असले तरी त्यासाठी वेगळी यंत्रणाही उभारण्याची गरज आहे, याबाबत शासन गांभीर्याने विचार करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

**उपसभापती** : सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागत असतात त्या अनुषंगाने मी सन्माननीय सदस्यांनी आपले प्रश्न एकत्रितपणे विचारावेत व त्या सर्वांना मिळून माननीय मंत्री महोदय एकदाच उत्तर देतील.

श्री. भास्कर जाधव : महोदय, शासनाने स्मार्ट कार्ड योजना सुरु केली, त्याचबरोबर आपल्याला अपेक्षित असा वाहनाचा नंबर पाहिजे असल्यास त्यासाठी ठराविक जादा रक्कम आकारली जाते आणि अपेक्षित नंबर दिला जातो. नंतर ज्यावेळी गाडी रजिस्टर्ड होते त्यावेळी त्याला खरे तर तो नंबर दिला पाहिजे. परंतु ज्यावेळी गाडीचे पासिंग होते, रजिस्ट्रेशन होते त्यावेळी आपल्या हातात स्मार्ट कार्ड दिले जाते त्यावेळी मात्र नंबर वेगळाच दिला जातो, असे प्रकार आरटीओ कार्यालयात घडतात. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, स्मार्ट कार्डात स्पेलिंग मिस्टेक वगैरे अशा अनेक चुका असतात. त्यासंदर्भात आरटीओकडे गेल्यानंतर त्यांच्या निदर्शनास आणून या कार्डातील मिस्टेक्स दुरुस्त करण्याबाबत सांगितले असता त्यावेळेस असे सांगण्यात येते की, हेस्मार्ट कार्ड आता कंप्युटराईज्ड झालेले आहे, त्यामुळे त्यात चेंजेस करता येणार नाहीत. मग जर यात चेंजेस करता येत नसतील तर ज्यांनी ह्या चुका केलेल्या आहेत त्या दुरुस्त कोणी करावयाच्या ?

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जामा : सभापति महोदय, मैं यह जानना चाहता हूं कि टॅक्नीकल एक्सपर्टस् की जो हाई पावर कमेटी बनाई गई है, यह कमेटी केवल मुंबई की ट्रांसपोर्ट व्यवस्था का अभ्यास करेगी या पूरे महाराष्ट्र की ट्रांसपोर्ट व्यवस्था का अभ्यास करेगी, जैसे पुणे, नाशिक, नागपुर ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि नागपुर में आर.टी.ओ. के विकेन्द्रीयकरण का जो प्रोजेक्ट पेंडिंग है और इस विभाग में अधिकारियों की जो कमी है, इसके बारे में सरकार क्या व्यवस्था करेगी ?

श्री. विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी ठाणे आणि मुंबईच्या सीमेवर रिक्षा चालकांची चालत असलेली दादागिरी यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. त्याचा सामान्य माणसाला त्रास होतो, त्या मुद्याला मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात हात सुध्दा लावलेला नाही. आपण देखील ठाण्याचे प्रतिनिधीत्व करीत आहात, असे असताना देखील न्याय मिळाला नाही तर या चर्चेला काय अर्थ आहे ? त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, हवालदार सिग्नलवर उभा राहतो, कारण त्याला टार्गेट दिलेले असते की प्रत्येक दिवसाला अमुक इतके चॅलान काढले पाहिजे. म्हणून याच ठिकाणी उभे राहण्यासंबंधीचा निर्णय अमूक इतक्या दिवसात घेण्यात येईल असे सांगितले असते तर बरे झाले असते.

डॉ.दीपक सावंत : महोदय, गाड्यांना मराठी नंबर प्लेट्स देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? तसेच दोन दिवसांपूर्वी क्रॉफर्ड मार्केटसमोर लोकमान्य टिळक मार्ग, पोलीस कमिशनर कार्यालयासमोर असलेले 80 गाड्यांचे पार्किंग बंद केले आहे. ते बंद करण्याचे कारण कमिशनर कार्यालयाच्या सुरक्षिततेला धोका असल्याचे सांगितले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

क्रॉफर्ड मार्केटला येणा-या सर्व लोकांची त्यामुळे गैरसोय होते या ठिकाणचे पार्कींग जे बंद करण्यात आलेले आहे ते पुन्हा सुरु करण्यात येईल काय?

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, एमएमआरडीएच्या हद्दीच्या संदर्भात शासनाने परिपत्रक काढून सहा महिने उलटून गेलेले आहे, अजूनही त्या ठिकाणी रिक्षांना बंदी घालण्यात आलेली आहे त्यामुळे यासंदर्भातील अंमलबजावणी आपण कधी करणार आहात? आपल्याला जर अंमलबजावणी करावयाची नसेल तर आपण काढलेले परिपत्रक मागे घेणार आहात काय? तसेच सीएनजीच्या सेंटरच्या संदर्भात आपण कोणते प्रयत्न केलेले आहेत? सीएनजी भरण्यासाठी शेकडो रिक्षांच्या रांगा लागलेल्या असतात. रिक्षामध्ये सीएनजी भरण्यासाठी एका गाडीला चार ते पाच तास लागतात व पर्यायाने वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे दोन्ही प्रश्नांच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, जोगेश्वरी-विक्रोळी-लिंक रोड या ठिकाणच्या रेल्वेच्या ब्रीजचे आणि कुर्ला येथील रेल्वेच्या ब्रीजचे काम केव्हापर्यंत पूर्ण केले जाणार आहे?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबई शहरातील वाढलेल्या ट्रॅफिकच्या संदर्भात दर अधिवेशनात चर्चा होत असते. या प्रश्नासंदर्भात सन्माननीय सदस्य गांभीर्याने चर्चा करीत असतात. परिवहन विभागाचे नवे राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी या चर्चेच्या संदर्भात जी उत्तरे दिलेली आहेत ती उत्तरे आधीच्या उत्तरासारखीच दिलेली आहेत. आज मुंबईमध्ये गेल्या 20-25 वर्षापूर्वीच्या जुन्या टॅक्सीज वापरल्या जात आहेत. फियाट कंपनी बंद होऊन 15-20 वर्षे होऊन गेली आहेत. 15-20 वर्षापूर्वी बंद झालेल्या फियाट कंपनीच्या टॅक्सीज वापरण्याजोग्या राहिलेल्या नसतांना सुध्दा त्या आज वापरल्या जात आहेत. मागील अधिवेशनामध्ये मी सूचना केली होती की, दिल्ली आणि कलकत्ता येथील वाहनांच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाच्या आदेशा प्रमाणे नवीन गाडया घेण्यासाठी शासनाने जशी मदत केली तशी मदत महाराष्ट्र शासनाने सुध्दा करावी. परंतु मी अशा प्रकारची सूचना करुन सुध्दा काहीही कार्यवाही झालेली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. गरीब टॅक्सीवाल्यांना रस्त्यावरुन बाहेर काढा असे मी म्हणत नाही परंतु ज्या टॅक्सीज गंजलेल्या आहेत, ज्या टॅक्सीत आपण बसू शकत नाही त्यांच्या ऐवजी चांगल्या नवीन टॅक्सीज असणे आवश्यक आहे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

परंतु कोणी तरी पुढारी येतो आणि या टॅक्सीज चालल्या पाहिजे असे सांगतो त्यामुळे हे प्रकार आता तरी थांबले पाहिजे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. त्याच बरोबर मला असे सांगावयाचे आहे की, टॅक्सींना 1972 मध्ये मिटर लावण्यात आलेले आहेत त्या मिटरमध्ये आजतागायत काहीही बदल झालेले नाहीत. त्यामुळे मिटरच्या संदर्भात सुध्दा शासनाने लक्ष घालावे अशी माझी सूचना आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी ठराविक नंबरसाठी जादा पैसे घेऊन, रजिस्ट्रेशन केले जाते त्यावेळी वेगळा नंबर दिला जातो. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी स्पेसिफिक तक्रार केली तर त्या बाबत चौकशी करुन निर्णय घेतला जाईल. नंबर देण्याच्या संदर्भात शासनाने ज्या कंपनीला कंत्राट दिलेले आहे त्या कंपनीला बोलावून या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या संदर्भात कंपनीला सूचना दिल्या जातील.

तसेच सन्माननीय सदस्य श्री. जामा साहेबांनी हायपॉवर कमिटीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. हायपॉवर कमिटी ही फक्त मुंबई, मुंबई उपनगरे, मुंबई परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालना देणे, वाहतूक विषयी विविध समस्या सोडविण्याकरिता एकिकृत मुंबई महानगर प्राधिकरणाची "कुमठा" नावाची हायपॉवर कमिटी नेमलेली आहे. यामध्ये अजून नागपूरचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. जामा साहेबांनी नागपूरला विकेंद्रीकरण करण्याच्या संदर्भात काय झाले अशी विचारणा केलेली आहे. त्यामुळे नागरपूर विभागाचे विकेंद्रीकरण करुन नागपूर शहर व नागपूर ग्रामिण हे दोन प्रादेशिक विभाग ऑक्टोबर 2003 पासून सुरु करण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी रिक्षा ड्रायव्हरांच्या दादागिरीचा विषय उपस्थित केलेला आहे. सगळयाच विषयावर बोलणे मला शक्य नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, एम.एम.आर.डी.ए.ने रिक्षाच्या वाहतूकीच्या संदर्भात एक जी.आर. काढला होता त्याची ताबडतोबीने अंमलबजावणी करावी किंवा जो जी.आर. काढण्यात आला आहे तो तरी मागे घ्यावा तेव्हा याबाबतीत मी विभागाचे सचिव आणि आयुक्तांना निश्चितपणे कल्पना देईन तसेच त्या ठिकाणी रिक्षावाल्यांकडून जी दादागिरी सुरु आहे ती होणार नाही याबाबतीत पोलीस अधिका-यांबरोबर चर्चा करुन निश्चितपणे योग्य ती काळजी घेतली जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी असे सांगितले आहे की, वाहनांवर मराठी नंबर प्लेटस लावण्यास परवानगी दिली जावी याबाबत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केन्द्र सरकारचा या सबंधीचा कायदा असून सर्वांना समजावे म्हणून मराठीतून नंबर प्लेटस न लावता इंग्रजीतून नंबर प्लेटस लावल्या जात आहेत. मराठीतून नंबर प्लेटस लावण्यास परवानगी मिळावी याकरिता केन्द्र सरकार बरोबर चर्चा करण्यात येईल आणि त्यांनी जर परवानगी दिली तर आपण देखील मराठीतून नंबर प्लेटस लावण्यास सांगू. सभापती महोदय, आयुक्त कार्यालयाजवळील पार्कीगला बंदी घालण्यात आली असल्यामुळे वाहनांची कोडी होते व वाहन धारकांची अडचण होत आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे.त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, विभागाच्या सचिवांना आयुक्तांशी चर्चा करण्यास सांगण्यात येईल आणि पार्कीगसाठी बंदी घालण्यात आल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत असेल तसेच वाहनधारकांना गैरसोय सहन करावी लागते तेव्हा पार्कीगला बंदी घालण्याची कारणे काय आहेत याबाबतीत माहिती घेऊन ती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल. सी.एन.जी. ची सेन्टर्स वाढविण्यात यावीत असा देखील एक मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला आहे. सी.एन.जी. भरण्यासाठी वाहनांची मोठी रांग लागते त्यामुळे विभागाच्या प्रधान सचिवांना संबंधित सी.एन.जी. कंपनीबरोबर चर्चा करण्यास सांगण्यात येईल. जास्तीत जास्त सी.एन.जी.ची सेन्टर्स वाढवून लवकरात लवकर सी.एन.जी.चा पुरवठा करुन वाहन धारकांचा सी.एन.जी.भरण्यासाठी अधिक वेळ जाणार नाही.या संबंधी दक्षता घेण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी कुर्ला व विक्रोळी ब्रीज येथील काम झालेले नाही असे सांगितले आहे तेव्हा त्या संदर्भात आमच्या विभागाचे अधिकारी रेल्वेच्या अधिका-याशी निश्चितपणे लवकरात लवकर चर्चा करतील. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले की फियाट कंपनी बंद होऊन अनेक वर्षे झालेली असतांना अजूनही त्या कंपनीच्या टॅक्सीज मुंबई शहरामध्ये आहेत. त्या टॅक्सीजचे स्पेअर पार्टसदेखील मिळत नसतील. तेव्हा या संदर्भात सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येईल. एखादी कंपनी बंद झाल्यानंतरसुध्दा त्या कंपनीच्या टॅक्सीज किती वर्षे चालवावयाच्या या संदर्भात विचार करण्यात येईल 20-25 वर्षापूर्वी एखादी कंपनी बंद झाल्यानंतरसुध्दा त्या कंपनीच्या टॅक्सीज अजूनही शहरामध्ये वाहतूक करतात तेव्हा यातून ताबडतोबीने मार्ग काढण्यासाठी प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल त्याचप्रमाणे 10-15 वर्षा पूर्वीची जी जुनी वाहने आहेत ती कंडम करण्याच्या बाबतीत कायदा करण्यासंबंधी सुप्रीम कोर्टाने सांगितले होते तेव्हा त्याप्रमाणे आपण निश्चितपणे करु या.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : ही समिती केव्हा नेमण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली आजच समिती नेमण्यात येईल आणि सहा महिन्यात समितीचा अहवाल येईल.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होऊन नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 11.52 ते 12.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

---------------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यासंबंधी प्रस्ताव दिलेला आहे. खरे म्हणजे हा प्रस्ताव मी दालनामध्येच नाकारला असता, परंतु माननीय सदस्य मला स्वत: भेटले असल्यामुळे मी त्यांना दोन मिनिटे बोलण्याकरिता परवानगी देतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यातील सुदर्शन केमिकल या कंपनीचे ठेकेदार श्री.उपाध्ये यांनी त्यांच्याकडे काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना तडकाफडकी कामावरुन काढून टाकल्यामुळे कर्मचारी संघटनेचे नेते श्री. सूर्यकांत महाडीक आणि त्यांचे सहकारी कंपनीच्या व्यवस्थापनाकडे जाब विचारण्यासाठी गेले असता त्याठिकाणी संघर्ष निर्माण झाल्यामुळे पोलिसांनी गोळीबार केला असता त्यामध्ये पाच कामगार आणि पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण रोहा शहरामध्ये बंद पाळण्यात आला आहे. रोहा औद्योगिक क्षेत्रामध्ये वातावरण तंग आहे. त्यादृष्टीने आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा करावी अशी मी विनंती करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेला विषय अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. आपल्या मूलभूत हक्कासाठी न्याय मागणाऱ्या कामगारांना पोलिसी बळाचा वापर करुन झोडपून काढण्याचा हा प्रकार आहे. मोर्चा घेऊन जाणाऱ्या कामगारांना हाकलून लावणे. आणि त्यांना शिवीगाळ करुन त्यांच्यावर दगडफेक करणे. हे सर्व प्रकार झाल्यानंतर पोलिसांनी त्याठिकाणी नियंत्रण करण्याऐवजी कामगार संघटनेच्या नेत्यांनाच झोडपण्यास सुरुवात केली, व त्यांच्यावर गोळीबार केला. त्यामध्ये दोन कामगार जखमी झाले असून त्यापैकी एका कामगाराची प्रकृती अतिशय गंभीर आहे. त्यादृष्टीने या विषयावर चर्चा करण्याकरिता माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेला प्रस्तावाला मी पाठिंबा देतो. या संदर्भात आपण निर्णय घेऊन या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी मी आपणास विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना कामगारांच्या प्रश्नासंबंधी एखादे आंदोलन होत असतांना शासनाच्या पोलीस खात्याकडून त्यांच्यावर गोळीबार होणे ही अतिशय गंभीर बाब आहे. आणि म्हणून या सभागृहाने या घटनेची दखल घेतली पाहिजे. अधिवेशन काळात कामगारांवर होणाऱ्या अन्यायाची आपल्या सभागृहाने दखल घेण्याची आवश्यकता असल्यामुळे माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये मांडलेला प्रस्ताव प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याच्या मर्यादेपर्यंत आहे. आजच्या सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित हा विषय नसल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास तहकूब करता येणार नाही. याठिकाणी कामगारांवर झालेल्या गोळीबाराची घटना पाहिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना आपले म्हणणे मांडण्यास दोन-तीन मिनिटांची परवानगी देईन असे मी सांगितले. तसेच, माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, विनोद तावडे यांनी सुध्दा यासंबंधी आपल्या भावना व्यक्त केल्या.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:05

**सभापती** . . . .

एक म्हणजे या विषयाच्या संबंधात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सुध्दा चर्चा करणे शक्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे याबाबतीत एक तासाची अल्पकालीन चर्चा देण्यात आली, तरी सुध्दा त्याव्दारे चर्चा करता येणे शक्य आहे. त्यामुळे याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, त्याला मी अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयाच्या संबंधात कोणत्या पध्दतीने चर्चा घडवून आणता येईल याबाबत मी नंतर निर्णय घेईन.

-----

. . . .2 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी. / मु. शी : तोंडी उत्तरे**

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाढते अपघात**

**(1) * 42899 श्री.मोहन जोशी, श्री. संजय दत्त , श्री सुभाष चव्हाण , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील,श्री.मधुकर चव्हाण,श्री.विनोद तावडे, श्री. संजय केळकर , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. किरण पावसकर , श्री. दिवाकर रावते, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.अरुण गुजराथी, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्रीमती उषाताई दराडे , श्री जयप्रकाश छाजेड , श्री. गोविंदराव आदिक , श्री. यशवंतराव गडाख , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. रामनाथमोते , श्री. प्रतापराव सोनवणे, श्री.प्रकाश शेंडगे** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर दिनांक 4 मे, 2008 रोजी कळंबोली येथील शेडुग फाटयाजवळ ट्रेलर व ट्रॅक्सच्या झालेल्या अपघातात सुमारे 16 जणांचा मृत्यू होऊन अनेक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, तसेच वरसोली या गावात दिनांक 20 मे, 2008 रोजी अपघात होऊन दोन मुलींचा मृत्यू झाल्याची घटना घडली, या महामार्गावर अपघातांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असून एप्रिल, 2005 पासून सुमारे 3938 वाहनांचे अपघात झाल्याची नोंद आहे, 2006 मध्ये 576 तर 2007 मध्ये 515 अपघात झाले असून या महामार्गावर अतिवेगाने वाहने चालविण्याप्रकरणी वाहन चालकांविरुध्द 2007 मध्ये 1025 खटले दाखल करण्यात आले आहेत, दिनांक 1 जानेवारी 2008 ते मे,2008 या कालावधीत सुमारे 145 विविध अपघातांमध्ये 80 व्यक्ती मृत्यू तर 250 प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(2) तसेच या महामार्गावरील वाढत्या अपघातामुळे वाहतुकीस होत असलेला विलंब रोखण्यासाठी आयआरबी कंपनीने रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून नादुरुस्त व अवजड वाहनांना द्रुतगती महामार्गावर "प्रवेश बंदी" अट लागू करण्याची मागणी केल्याचे दिनांक 4 मे, 2008 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(3) तसेच या द्रुतगती महामार्गावरील प्रवासी सुरक्षितता व देखभाल करण्यासाठी शासनाने हे काम आय.आर.बी.च्या डेल्टा फोर्स या कंपनीकडे सोपविले असून सदर कंपनीने आपले जवान तैनात ठेवले असून, त्यांना नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनाने दिलेले नाहीत, हे खरे आहे काय, असल्यास या महामार्गावरील डेल्टा फोर्स अथवा महामार्ग वाहतूक पोलीस याबाबत नेमकी सुरक्षा व्यवस्था कोणाकडे आहे,

(4) या महामार्गावरील मोठया प्रमाणात अपघात होत असल्याने "अपघातांची विशेष चौकशी समितीची स्थापना दिनांक 15 मे, 2008 रोजी वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे देखील खरे आहे काय, असल्यास, समितीने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने सदर महामार्गावरील वाढत असलेले अपघात टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय.

(2) नाही.

(3) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मालमत्तेचे रक्षण करणे व वाहतूक सुरळित ठेवण्यासाठी महामार्ग पालिसांना मदत करणे व अपघात प्रसंगी द्रुतगती मार्गावरील प्रवाशांना मदत करणे इत्यादी कामे मे.आय.आर.बी.प्रा.लि. या कंपनीने नेमलेल्या डेल्टा फोर्सद्वारे करण्यात येतात.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

द्रुतगती मार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरक्षा व व्यवस्था करण्याचे काम महामार्ग वाहतूक पोलीसद्वारे करण्यात येते.
(4) नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर गेल्या सहा महिन्यामध्ये अपघातांचे प्रमाण अतिशय मोठया प्रमाणात वाढलेले आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यामध्ये या द्रुतगती महामार्गावर 80 लोक मृत्युमुखी पडलेले आहेत आणि 250 हून अधिक जण जखमी झालेले आहेत. तसेच 2006-2007 या वर्षामध्ये या रस्त्यावरील अपघातांची संख्या पाहिली तर असे दिसून येईल की, जवळपास 108 लोक मृत्यूमुखी पडलेले असून 400 च्या अधिक लोक जबर जखमी झालेले आहेत. या महामार्गावर शासनाचे स्टेट ट्रॅफीकचे पोलीस असतील किंवा आर.टी.ओ.लोक असतील, यांच्याकडून ज्या पध्दतीने नियमांची अंमलबजावणी व्हावयास हवी होती, ती केलेली नसल्यामुळे या महामार्गावरील अपघात वाढत आहेत. या महामार्गावर जास्त वेगाने वाहने चालविणे, लेन कट करणे, चुकीच्या पध्दतीने ओव्हर टेक करणे आणि रात्रीच्या वेळेला टेल लॅम्प किंवा रेंडिएटर नसलेल्या वाहनांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध न करणे इ.अपघात होण्यामागील अनेक कारणे आहेत. विशेषत: . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एप्रिल महिन्यामध्ये झालेल्या अपघातामुळे या महामार्गावरील वाहतूक 20 तास खंडीत झाली होती, हे खरे आहे काय ? अशा परिस्थितीमध्ये तळेगाव आणि खालापूर येथे जे टोलनाके आहेत, त्याठिकाणी वाहतूक का थांबविण्यात आली नाही ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या द्रुतगती महामार्गावरील अपघातांच्या बाबतीत शासन आपत्ती व्यवस्थापन समिती किंवा प्राधिकरण स्थापन करणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मोठया प्रमाणात अपघात होत आहेत ही गोष्ट खरी आहे. हा महामार्ग 2002 मध्ये सुरु झाला, तेव्हा याठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक होत नव्हती. पण आता या महामार्गावरील वाहतूक तीन ते चार पटीने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

वाढलेली आहे. खास करुन अति वेगाने वाहने चालविणे, ड्रायव्हरने दारु पिऊन गाडी चालविणे. दारु पिऊन गाडी चालविणारे अनेक ड्रायव्हर आढळून आलेले आहेत. ओव्हर डायमेन्शन व्हेईकल, लेन कट करणे इ.कारणांचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. पण अति वेगाने वाहन चालविणे हे महत्वाचे कारण आहे. या महामार्गावरील परमिसल लिमिट 80 कि.मी.इतकी आहे.पण महामार्ग अतिशय चांगल्या स्थितीमध्ये असल्यामुळे अति वेगाने गाडया चालविल्या जातात. अशा परिस्थितीत महामंडळाच्या माध्यमातून, आर.टी.ओ.च्या माध्यमातून आणि हायवे पोलिसच्या माध्यमातून या सर्व बाबतीत आपल्याला कशा प्रकारे प्रतिबंध घालता येईल आणि अपघातांचे प्रमाण कशा प्रकारे कमी करता येईल यादृष्टीने महामंडळ काम करीत आहे. खास करुन जे लोक अति वेगाने गाडी चालवितात, त्यासाठी स्पीड गन ज्याला रडार गन असेही म्हणतात, त्याच्या माध्यमातून किती वेगाने गाडी जात आहे हे लक्षात येते. त्या अनुषंगाने चालान करण्याचे प्रमाण दोन महिन्या-मध्ये वाढलेले आहे. आम्ही रडार गनच्या माध्यमातून मोठया प्रमाणात मोहीम हाती घेतली असून जर अति वेगाने गाडया चालविल्या जात असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी. तसेच जे दारु पिऊन गाडी चालवितात, त्यांच्या बाबतीत सुध्दा आम्ही मोहीम हाती घेतलेली आहे. त्याच बरोबर सन्माननीय सदस्यांनी ओव्हर डायमेन्शल व्हेईकल बाबत प्रश्न उपस्थित केला होता. या महामार्गावर तीन ॲक्सेलच्या वर परवानगी नाही. पण मधल्या काळामध्ये काही ओव्हर डायमेन्शल व्हेईकल या रस्त्यावरुन गेल्यामुळे एक अपघात झाला होता आणि मोठया प्रमाणात ट्रॅफीकचा खोळंबा झाला होता. या बाबतीत सुध्दा आम्ही आर.टी.ओ.च्या माध्यमातून, हायवे पोलिसच्या माध्यमातून आणि एम.एस.आर.डी.सी.च्या माध्यमातून योग्य ती काळजी घेत आहोत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42899.......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या ठिकाणी स्पीड गन बसविलेल्या आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर एकंदर किती स्पीड गन बसविलेल्या आहेत. जर स्पीड गन बसविलेल्या असतील तर युरोपीयन देशामध्ये ज्या पध्दतीने अमुक स्पीडच्या वर गेले की, त्या गाडीचा नंबर नोंद केला जातो, तसे या ठिकाणी करणार काय ? अनेक अपघात होतात त्यामध्ये लोक मरतात. काही जखमी लोक ट्रान्स्पोर्टेशनमध्ये मरतात. म्हणून ट्रॉमा केअर ॲम्ब्युलंसची व्यवस्था करणार काय जणेकरुन त्यांना प्रथमोपचार देऊ शकू. कोणाला नेक फ्रॅक्चर झ ाले असेल तर त्याला विशिष्ट पध्दतीने ट्रान्स्पोर्ट करावे लागते. त्यामुळे त्या ठिकाणी अशा प्रकारची सिस्टिम डेव्हलप करणार काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्यावर 5 रडार गनची व्यवस्था केलेली आहे आणि या रडार गनच्या माध्यमातून जे वेगाने गाडी चालविणारे आहेत त्यांच्या गाडीच्या नंबरची नोंद घेण्यात येते आणि कारवाई करण्यात येते. त्या ठिकाणी पाच गनची व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ट्रॉमा केअर ॲम्ब्युलंसच्या बाबतीत सांगितले. त्या ठिकाणी चार ॲम्ब्युलंस आहेत. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी आताच मधल्या काळामध्ये त्या ठिकाणी उद्घाटन केले आहे. अपघात झाल्याबरोबर सरासरी 11 मिनिटात ती ॲम्ब्युलंस डॉक्टरसह त्या ठिकाणी पोहोचते. त्या ठिकाणी मुंबई-पुणे बाजूला 4 आणि पुणे-मुंबई बाजूला 4 अशा 8 ॲम्ब्युलंसची व्यवस्था आहे. त्या ठिकाणी रडार गनचा उपयोग चालू केलेला आहे. जे दारु पिऊन गाडी चालविणारे आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे त्याचे प्रमाण कमी झाले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा रस्ता निश्चितपणे जनसामान्यांसाठी वरदान ठरलेला आहे. मात्र त्या ठिकाणी अपघातांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. यामध्ये अपघात होऊ नये म्हणून प्रिव्हेंटिव ॲक्शन घेणे आणि अपघात झाल्यावर पोस्ट ॲक्सिडेंट मेडिकल एड पोहोचणे या दोन बाबी आहेत. या रस्त्याने जाताना सकृतदर्शनी असे चित्र दिसते की, ॲम्ब्युलंसचे प्रमाण खूप कमी आहे. जो अपघातप्रवण विभाग आहे त्या ठिकाणी अशा ॲम्ब्युलंस आणि फर्स्ट एडची सुविधा वाढविण्याबाबत शासन काय भूमिका घेणार आहे ? त्या ठिकाणी दारु पिऊन गाडी चालविणे थांबावे तसेच जास्त गतीने गाडी चालविणे थांबावे यासाठी शासन ठोस पावले उचलणार आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

ता. प्र. क्र. 42899.....

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे रस्त्यावर जे अपघात होतात त्याचा मधल्या काळामध्ये अभ्यास केला. त्या अभ्यासावरुन असे लक्षात आले की, वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे 83 टक्के अपघात होतात. पादचाऱ्यांमुळे 6 टक्के अपघात होतात. रस्ता खूप खराब असल्यामुळे 4 टक्के अपघात होतात आणि वाहनाच्या तांत्रिक दोषामुळे 3.6 टक्के अपघात होतात. जवळजवळ 83 टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे होतात. जास्त गतीने गाडी चालविणे तसेच लाईन मोडणे अशा अनेक कारणांमुळे अपघात होतात. मी सांगितले की, अपघात झाल्यानंतर त्यांना लवकरात लवकर पूर्ण वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी यादृष्टीने ॲम्ब्युलंसची व्यवस्था केलेली आहे. रडार गनच्या माध्यमातून स्पीड मर्यादित कसा ठेवता येईल यादृष्टीने प्रयत्न चालू आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, रडार यंत्रणेच्या माध्यमातून जास्त गतीने चालणाऱ्या गाड्यांची नोंद केली जाते. इतर देशांमध्ये एक्स्प्रेस हायवेवर ताबडतोब खटले भरले जातात त्यामुळे त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण होते की, आपले लायसन्स जाईल. त्यामुळे त्या भीतीपोटी त्या ठिकाणी गुन्हे करण्याचे प्रमाण कमी आहे. आपण रडारची व्यवस्था केलेली आहे. त्या व्यवस्थेच्या माध्यमातून किती खटले भरण्यात आले आणि किती लोकांवर कारवाई करण्यात आली ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, अती वेगाने गाड्या चालविणारे जे लोक रडारच्या माध्यमातून सापडले त्याच्यावर या महिन्यामध्ये 78 खटले भरलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42899....

श्री.अरविंद सावंत : या एक्प्रेसवेवर जड वाहनांची वाहतूक जास्त आहे. ही जड वाहने एकमेकांना ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नामध्ये 3 लेन व्यापून टाकतात. त्यामुळे बाकीच्या लेनवरील वाहनांना जागा मिळत नाही. काही दिवसांपूर्वी एक अवजड ट्रेलर उलटून या रस्त्यावरील वाहतूक 5-6 तास खोळंबली होती. त्यामुळे अशा जड वाहनांवर एकाच लेनचा वापर करण्याचे बंधन घातले जाईल काय ? त्याचप्रमाणे अनेक अवजड वाहनांवर टेल लॅम्प लावलेला नसतो. त्यामुळे समोरुन येणा-या गाडीच्या प्रकाशामुळे आणि या जड वाहनाला टेल लॅम्प नसल्यामुळे जड वाहनाच्या मागे गाडी येऊन धडकते. म्हणून ज्या जड गाडया टेल लॅम्प लावणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या राज्यामध्ये हायवे, नॅशनल हायवे असे रस्ते आहेत. या रस्त्यांवर जे अपघात होतात त्यांचा अभ्यास करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी सचिव श्री.श.रा.तांबे यांच्या अध्यक्षतेखाली सेंट्रल रोड रिसर्च कमिटी स्थापन केली होती. त्या समितीने खास करुन मुंबई-पुणे एक्सप्रेसवेबाबत अभ्यास करुन काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने आतापर्यंत 60 कोटी रुपये खर्च केले आहेत. अहवालाच्या शिफारशींची अंमलबजावणी शासनाने केलेली आहे. त्याचप्रमाणे ओव्हर साईज गाडयांनी टेल लॅम्प लावल्याशिवाय त्यांना रस्त्यावर येण्याची परवानगी देऊ नये अशा सूचना आर.टी.ओ.ला दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांनी कारवाई चालू केलेली आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, यह देखा गया है कि अपघात का प्रमाण रात के समय और क्रॉस करते समय ज्यादा होता है और उस समय डिप्पर में लाइट नहीं डालते हैं. कुछ दिन पहले सोलापुर के एक स्कूल में बच्चों की साइंस प्रदर्शनी में पहला पुरस्कार मिलने वाले बच्चे ने एक ऐसी डिवाइस बनाई थी कि जब गाड़ी क्रॉस हो रही है, तब डिप्पर में ऑटोमेटिक लाइट आ जाती है और इसकी कॉस्ट केवल 50 रुपए है. मेरा प्रश्न यह है कि इस तरह की डिवाइस कंपनी को कम्पलसरी करने के लिए क्या शासन कुछ कदम उठा सकता है ?

. . .GG 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

ता.प्र.क्र.42899....

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अनेक अपघात होतात ते सकाळी 6 ते 7 आणि मध्यरात्री 2 ते 3 यावेळी होतात असे आढळून आले आहे. सन्माननीय सदस्यांनी नवीन डिव्हाईस सांगितले आहे त्याची माहिती घेऊन अभ्यास करता येईल. टेल लॅम्पबाबत आर.टी.ओ.कडून कडक कारवाई केली जात आहे. मुंबई-पुणे एक्प्रेसवेवर अतिशय जलद गतीने गाडया जात असतात हे खरे आहे. त्याबाबत बाकीच्या गोष्टी तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल. श्री.विनोद तावडे : सध्या अनेक रस्त्यांचा दर्जा सुधारला आहे, अनेक रस्त्यांचे चौपदरीकरण झालेले आहे. ऑटोमोबाईल इंडस्ट्री देखील वेगाने वाढत आहे. या कंपन्यांनी प्रचंड गतीने जाणा-या गाडयांची निर्मिती करण्याची सुरुवात केली आहे, या गाडयांना पीकअप् चांगले आहे, रस्ते चांगले झाले आहेत. पण यासाठी जो प्रशिक्षित कर्मचारी पाहिजे त्याची कमतरता भासत आहे. सध्याच्या कर्मचा-यांचे प्रशिक्षण झालेले नाही. त्यामुळे हे सर्व प्रश्न निर्माण होतात. मागील काही काळात मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर जे 8-10 अपघात झाले त्याची मी चौकशी केली आहे.

नंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MMP. श्री. खंदारे नंतर --- 12:20

श्री. तावडे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 42899 ....

तेव्हा नुसता त्यांनी सीटबेल्ट लावला असता तर बऱ्याच जणांचा मृत्यू थोपविता आला असता. तेव्हा अशा प्रकारचे प्रशिक्षण, जेथे चार लेनचा रस्ता झालेला आहे अशा ठिकाणी विशेष करून जे काही फलक लावून लोकांचे रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत होण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण होईल, असे फलक लावणे या सारख्या गोष्टींची सक्ती असणे असे एका बाजूने चालकांना प्रशिक्षण देण्याचा विचार या तांबे समितीने सुचविला आहे काय ? तसे पाहिले तर या एक्स्प्रेस हायवे पूर्वीची ही समिती आहे. तेव्हा असे काही वाहनचालक आणि प्रवासी यांच्यासाठी प्रशिक्षणाचेदृष्टीने फलक लावणे किंवा अन्य बाकीचे काही मार्ग आहेत त्यांचा विचार केला आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, तांबे समितीची स्थापन 1997 मध्ये झालेली होती. परंतु त्या समितीने तसेच नॅशनल रोड रिसर्च इंस्टिट्यूट या संस्थेने सुचविल्याप्रमाणे आतापर्यंत आपण 60 कोटीची कामे केली आहेत. परंतु आता सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे ऑटोमोबाईल क्षेत्रात ॲडव्हान्स टेक्नॉलाजी येत असल्याने अतिशय गतीमान अशी वाहने रस्त्यांवर येत आहेत आणि अशा वेळी अशा वाहनांवर नियंत्रण कसे ठेवता येईल या दृष्टीने ज्या ज्या सूचना येतील त्यांचा जरूर विचार केला जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मघाशी एक अत्यंत सुस्पष्ट असा प्रश्न विचारला होता की, एप्रिल महिन्यामध्ये नासिक येथे झालेल्या अपघातामुळे तेथे चार तास वाहतूक कोंडी झाली होती हे खरे आहे काय ? आणि त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन समिती आपण नेमणार आहात काय ? तसेच हे अपघात होण्याची वेळ ही सर्वसाधारणपणे सायंकाळी 6 ते सकाळी 9 वाजेपर्यंतची असते त्यामुळे अशा ठिकाणी 24 चाकी वाहनांवर आपण बंदी घालणार आहात काय ? या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी दिली नाहीत. तरी आता ते याबाबत उत्तर देखील काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, तो जो अपघात झाला होता तेव्हा 16 एक्सेलचे वाहन रस्त्यावर आल होते. खरे तर त्या रस्त्यावर आरटीआने 3 एक्सेलच्या वरच्या वाहनाला परवानगी द्यायला नको होती. कारण मुंबई-पुणे रस्त्यावर अशाच प्रकारे अपघातामुळे कोंडी झाली होती त्यामध्येदेखील 16 एक्सेचे वाहन अमृतांजन वळणावर अडले होते कारण इतके मोठे वाहन तेथे वळू शकत नव्हते. त्यामुळेच ते वाहन तेथे वळण घेताना कलंडले आणि ते अशा जागी कलंडले होते की त्यासाठी बाहेरून देखील आपण मदत तेथे देऊ शकत नव्हतो. त्यामुळे अतिशय

...... एचएच 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 42899 ....

अडचण झाली होती. म्हणूनच या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यासमवेत एक बैठक घेऊन आम्ही सर्व आरटीओंना सूचना दिल्या आहेत की, अशा ठिकाणी मल्टी-एक्सेल वाहनांना, 3 एक्सलपेक्षा अधिक एक्सलच्या वाहनांना वाहतुकीसाठी परवानगी देऊ नये. मध्यंतरी तेथे जो मल्टीएक्सेल वाहनाला अपघात झाला होता, ती गाडी वळणावर कलंडली होती आणि ती तेथून लवकर हलविता न आल्याने ती गाडी तेथेच घाटामध्ये जवळपास 9 महिने पडून होती. म्हणूनच अशा ठिकाणी तीन एक्सेलपेक्षा अधिकच्या वाहनांना यापुढे परवानगी दिली जाणार नाही याची मी ग्वाही देतो.

****

....... एचएच 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक जिल्ह्यात द्वारका सर्कलजवळील एका व्यावसायिकास बनावट कुरिअरद्वारे बनावट रेव्हेन्यू स्टॅम्पचे पार्सल आल्याबाबत**

**(2) *42564 श्री.प्रतापराव सोनवणे, श्री.विनोदतावडे, श्री.गुरुमुख जगवानी** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक जिल्ह्यात द्वारका सर्कलजवळील एका व्यावसायिकास बनावट कुरिअरद्वारे एक लाख 480 रुपयांचे बनावट रेव्हेन्यू स्टॅम्पचे पार्सल आले असून पोलीसांनी ते हस्तगत केल्याची बाब माहे मे, 2008 च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नागपूर येथील डीडीडीसी या कुरिअर कंपनीने हे पार्सल पाठविले असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकरणी तपास करण्यात आला आहे काय व त्यानुसार संबंधित बनावट कुरिअर करणाऱ्या व्यक्ती अथवा टोळीविरुध्द कोणती कारवाई शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सिद्धाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) व (2) होय.
(3) व (4) या प्रकरणी भद्रकाली पोलीस स्टेशन येथे डायरीनोंद क्र. 36/08 अन्वये नोंद घेण्यात आली आहे. स्टँप प्रकरणी संबंधित व्यावसायिकांच्या घराची झडती घेतली असता संशयीत वस्तू मिळाल्या नाहीत. जप्त करण्यात आलेले रेव्हेन्यु स्टँप तपासणीसाठी महाप्रबंधक, इंडिया सिक्युरिटी प्रेस नाशिक येथे पाठविण्यात आले आहेत. त्यांचेकडून अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, हे प्रकरण शासनाने येथे दिलेल्या उत्तराइतके सोपे नाही. या प्रकराचे बनावट आर्थिक घोटाळ्याचे प्रकरण राज्याच्या अर्थव्यवस्थेला कर्करोग लागण्यासारखे आहे. यापूर्वी घडलेला तेलगी घोटाळा देखील अशाच प्रकारे सुरूवातीला छोट्या प्रमाणात सुरू झाला होता पण नंतर खात्याने हे प्रकरण सुरूवातीस गांभीर्याने न घेतल्याने त्याचे स्वरूप प्रचंड मोठे झाले. आज हे प्रकरण वरवर छोटे दिसत असले तरी गृह खात्याने याचे स्वरूप महाघोटाळा होईपर्यंत वाट पाहू नये. यासाठी शासन या बाबत उच्च स्तरीय चौकशी करील काय आणि याबाबतची माहिती हे अधिवेशन संपण्यापूर्वी सदनाला देईल काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पार्सलमध्ये बनावट रेव्हेन्यू स्टॅम्पस् हे नागपूर येथून श्री.अग्रवाल या नावाने नासिक येथे आले होते आणि ते श्री.रामदास कचरू लोखंडे याच्या नावे आले होते. याबाबत पोलिसांना एक निनावी फोन आला होता की, डीटीडीसी या कुरिअर मार्फत असे असे पार्सल येणार आहे. ...

( यानंतर श्री.मा.शिगम .... आयआय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. सुंबरे 12:25

(ता.प्र.क्र. 42564.... श्री. सिध्दाराम म्हेत्रे :

पोलिसांना निनावी फोन आला की भयंकर अशा प्रकारचे पार्सल येणार आहे. त्यामुळे पोलिसांनी ते पार्सल ताब्यात घेतले. ते पार्सल लोखंडे यांच्याकडे पोहोचले नव्हते. त्यानंतर श्री. लोखंडे यांच्या कार्यालयाची झडती घेतली. त्यामध्ये आक्षेपार्ह असे काही आढळून आले नाही. ही बाब पोलिसांनी गांभीर्याने घेतलेली नाही असे नाही. पोलिसांनी ती गांभीर्यानेच घेतलेली आहे.

श्री. विनोद तावडे : खोटे रेव्हेन्यू स्टॅम्प ज्याच्या पत्यावर मागविलेले आहेत त्या इसमाची चौकशी पोलिसांनी केलेली असेल. दर तीन महिन्यांनी वेगवेगळया प्रकारे हे रेव्हेन्यू स्टॅम्प निघत असतात आणि अकौण्टण्ट त्यांचा वापर करीत असतात. अशा प्रकारे खोटे स्टॅम्प सप्लाय करणारी टोळी असू शकते. म्हणून यासंबंधात सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित माणसाला अटक करुन त्याची चौकशी केलेली आहे काय ? चौकशीत काय आढळून आले ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ज्यावेळी हे पार्सल नागपूर येथील कुरियर ऑफिसमधून पाठविण्यात आले त्यावेळी पोलिसांना निनावी फोन आला की, नागपूर येथील कुरियर मधून भयंकर असे पार्सल जात आहे. अशा प्रकारे फोन आल्यानंतर पोलिसांनी तातडीने हालचाल करुन ते पार्सल ताब्यात घेतले. ज्याच्या नावे हे पार्सल पाठविण्यात आले होते त्याच्यापर्यन्त ते पोहोचले नव्हते. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी हे पार्सल मागविलेले नाही. अग्रवाल नावाच्या ज्या इसमाने हे पार्सल पाठविले त्या बाबत देखील चौकशी करण्यात आली. त्या व्यक्तीने खोटा पत्ता दिला असून त्या पत्त्यावर अग्रवाल नावाची कुणी व्यक्ती राहात नाही. श्री. लोखंडे यांना अडचणीत आणण्यासाठी कुणी तरी हे कृत्य केले असावे. हे स्टॅम्प बनावट आहेत की नाहीत याची तपासणी करण्यासाठी ते स्टॅम्प इंडियन सेक्युरिटी प्रेस, नाशिक यांच्याकडे पाठविलेले आहेत.

श्री. जयप्रकाश छाजेड : ज्या व्यक्तिने कुरियद्वारे हे पार्सल पाठविले त्या व्यक्तिची चौकशी पोलिसांनी केलेली आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : नागपूर येथील कुरियरच्या ऑफिसमध्ये पोलिसांनी चौकशी केली. त्यांनी सांगितले की, "आमच्याकडे अग्रवाल नावाची अशी कोणी व्यक्ती आलेली नाही, कार्यालयामध्ये खूप गर्दी असते, त्यामुळे पार्सल पाठविणा-याचे आम्ही नाव आणि पत्ता घेतो, आम्ही जास्त चौकशी करीत नाही.

..2..

(ता.प्र.क्र. 42564....

श्री दिवाकर रावते : पोलिसांची कामगिरी हास्यास्पद आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कारण पोलिसांना फोन आल्यानंतर ते पार्सल कुणाचे आहे, ते कुणाकडे जाते हे पाहून मग ते पार्सल आणि त्या व्यक्तिला पोलिसांनी ताब्यात घ्यायला पाहिजे होते. त्यानंतर चौकशी करुन पोलिसांना अधिक खोलात जाऊन तपास करता आला असता. परंतु तसे न करता पोलिसांनी मधल्या मध्येच ते पार्सल हस्तगत केले. त्यामुळे पोलिसांची ही कामगिरी हास्यास्पद आहे असे मंत्री महोदयांना वाटते काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : नागपूर येथील कुरियर ऑफिसमधून काही तरी भयंकर असे पार्सल येत असल्याचा निनावी फोन पोलिसांना आल्यामुळे त्या पार्सलमध्ये आरडीएक्स सारखे स्फोटक पदार्थ असू शकतील म्हणून पोलिसांनी ताबडतोबीने हालचाल करुन ते पार्सल ताब्यात घेतले.

श्री. विनोद तावडे : एक लाख 480 रुपयांचे बनावट रेव्हेन्यू स्टॅम्पचे पार्सल आल्याची घटना उघडकीस आली आहे काय ? असा प्रश्न विचारलेला असून त्यास "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. मग ते पार्सल भयंकर होते की, बनावट रेव्हेन्यू स्टॅम्पचे होते ? उत्तरामध्ये सुधारणा करावयास पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42564....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी उत्तर दुरुस्त करु इच्छितो की, बनावट नावाने पार्सल आलेले आहे.

**सभापती** : अशा पध्दतीचे रेव्हेन्यू स्टॅम्पचे पार्सल येत आहे असा दूरध्वनी कोणीतरी पोलिसांना केला. पोलीस तेथे गेल्यानंतर ते पार्सल ताब्यात घेतात, ते ताब्यात घेतल्यानंतर ते बनावट आहे असे प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे. त्या उत्तरात दुरुस्ती केली पाहिजे असे मला वाटते. जास्त गांभीर्याची बाब अशी आहे की, नागपूर येथील अग्रवाल कोण आहेत याची देखील आम्हाला माहिती नाही असे या ठिकाणी सांगितले गेले आहे. येथे असेही सांगितले गेले की, पार्सलच्या बाबतीत चौकशी केली असता संबंधितानी सांगितले की, अशा प्रकारचे पार्सल आमचे नाही. त्यामुळे ही फार मोठी संशयीत बाब आहे. त्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यासंदर्भात आपण काही चौकशी करणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांना निनावी दूरध्वनी आला होता. ज्या क्रमांकाचा दूरध्वनी आला होता, त्या दूरध्वनी क्रमांकाचे स्टेटमेंट पोलिसांनी घेतलेले आहे. त्या स्टेटमेंटच्या दृष्टीने चौकशी चालू आहे. तरी देखील या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, या उत्तरामध्ये बनावट रेव्हेन्यू नव्हे तर बनावट कुरिअर म्हटले आहे. कुरिअर कंपनी बनावट आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : कुरिअर कंपनी बनावट नसून ती खरी आहे. उत्तरात दुरुस्ती होती, ती दुरुस्ती करण्याचे राहून गेले आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्हयात पंतप्रधान पॅकेजअंतर्गत सामुहिक विवाहासाठी जाहिर केलेल्या खर्चाच्या आकडेवारीत विसंगती असल्याबाबत**

**(३) * ४२२७३ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्हयात पंतप्रधान पॅकेजअंतर्गत सामुहिक विवाहासाठी ६ कोटी रुपयांची तरतूद दाखविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामुहिक विवाहासाठी झालेल्या खर्चाची आकडेवारी सादर करतांना वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन या संस्थेने या योजनेसाठी ९.२२ कोटी, महिला बालकल्याण आयुक्त पुणे, यांनी १२.७८ कोटी तर सहा जिल्हयातील महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी महालेखापालांना सादर केलेली एकत्रित आकडेवारी ११.५८ कोटी एवढी होती,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी केल्या गेलेल्या खर्चात शासनाच्या विविध यंत्रणात अशा प्रकारे विसंगती असण्याची कारणे काय आहेत व त्याबाबत कोणते स्पष्टीकरण देण्यात आले आहे ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात सुधारीत अंदाज पत्रकामध्ये रु.१२.७८ कोटीची तरतूद प्राप्त झाली. सदर तरतूद कोषागारातून आहरित करुन ६ जिल्ह्यांना वितरीत करण्यात आली. यामुळे सन २००६-२००७ चा खर्च रु.१२.७८ कोटी एवढा करण्यात आला. आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आलेला खर्च हा कोषागारातून प्रत्यक्ष आहरित केलेल्या रकमेच्या आधारे देण्यात आलेला आहे. जिल्हा कार्यालयाकडून देण्यात आलेला खर्च हा जिल्ह्यामध्ये झालेल्या विवाहाच्या आधारे देण्यात आलेला आहे. त्यामुळे आकडेवारीमध्ये विसंगती दिसून येते.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी तीन आकडयांबद्दलचा प्रश्न विचारला होता. शासनाकडून दोन आकडयांचा खुलासा शासनाने उत्तरात केलेला आहे. मी १२.७८ कोटी रुपयांबद्दलची आणि ११.५८ कोटी रुपयांबद्दलची माहिती विचारली होती. शासनाने फक्त १२.७८

३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटी रुपयांचा खुलासा केलेला आहे. यासंदर्भात महालोखापालांनी या योजनेबाबत ऑब्जेक्शन्स घेतलेली आहेत. सदर पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी गेल्या दोन वर्षापासून प्रश्न उपस्थित होत आहेत. परंतु या पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधीचा खुलासा शासनाकडून येत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, या पॅकेजमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे त्यासंदर्भात शासन श्वेतपत्रिका काढणार आहे काय ? या पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ही योजना पंतप्रधान पॅकेजमधील नाही. राज्य शासनाने स्वत:च्या निधीतून सामुहिक विवाह योजना सुरु केलेली आहे. ही योजना पंतप्रधान पॅकेजमधील नाही.

श्री. दिवाकर रावते : उप प्रश्न २ ला "होय" असे उत्तर शासनाने दिलेले आहे. जर ही पॅकेजमधील योजना नसेल तर "होय" उत्तर कसे काय देण्यात आले ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्यांनी या योजनेसाठी ६ कोटी रुपये उपलब्ध दिले होते त्यासंबंधी प्रश्न विचारला आहे. ६ कोटी रुपये ३१ मार्चला जे पैसे विड्रॉ करण्यात आले होते. कृपया सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाचा मजकूरवाचून पहावा. ही राज्य शासनाची सामुदायिक विवाह योजना आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयांना आपण ही योजना लागू केलेली आहे. त्यामध्ये तीन महत्वाचे अधिकारी या योजनेच्या खर्चाच्या संदर्भात वेगवेगळी आकडेवारी देत आहेत. ती आकडेवारी सुध्दा महालेखापालांना दिली आहे ही गोष्ट भूषणावह नाही. तीन अधिका-यांनी या योजनेच्या खर्चाचा आकडा वेगवेगळा दिलेला असल्यामुळे निश्चित कोणता आकडा खरा आहे याचा खुलासा आम्हाला होत नाही. त्यामुळे या उत्तरामध्ये दुरुस्ती करण्याची शासनास गरज वाटत नाही काय ? महालेखापाल हे घटनात्मक पद आहे, त्यांना या तीन अधिका-यांनी वेगवेगळी आकडेवारी दिली आहे त्याबाबतचा खुलासा शासनाने आजपर्यंत केलेला नाही. वेगवेगळी आकडेवारी ज्या अधिका-यांनी दिली आहे, त्यांच्यावर काय ॲक्शन घेतली आहे वा घेण्यात येणार आहे ?

यानंतर श्री. कानडे.....

अ सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42273 ...पुढे सुरु

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी वेगवेगळी माहिती दिलेली आहे त्यांच्यावर निश्चितपणाने कारवाई केली जाईल. जे उत्तर दिलेले आहे त्यानुसार 2006-07 मध्ये 12.78 एवढा खर्च करण्यात आलेला आहे. ऑडीट झाल्यानंतर या सगळयाच प्रकरणाची चौकशी करेण्यात आली. वेगवेगळया स्तरावर माहिती दिली गेली. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनची माहिती आयुक्तांमार्फत दिली गेली. त्याचपमाणे जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी यांच्यामार्फत माहिती दिली गेली. माहितीमध्ये विसंगती झाली ही गोष्ट खरी आहे. त्याची चौकशी करण्यात येईल. योजना एक आणि माहिती तीन वेगवेगळया विभागातून आली ही गोष्ट खरी आहे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, वेगवेगळया विभागातून वेगवेगळी माहिती आलेली आहे. ऑडीट चालू असताना एकत्रित माहिती देण्याची पध्दत आहे की जेथून पैसा आला त्या त्या ठिकाणची माहिती देण्याची पध्दत आहे याचा खुलासा करावा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे ऑडीट झाले. ही योजना या जिल्हयांकरिता राज्य शासनाने सुरु केलेली योजना आहे. मिशनची योजना पंतप्रधान पॅकेजमधील आहे. त्यामध्ये विसंगती झाली. 31 मार्चला जे पैसे ट्रेझरीतून काढले गेले त्यामध्ये जिल्हयाचे पैसे अखर्चित राहिले ही गोष्ट खरी आहे. याबाबतीत तीन विभागांची माहिती आली त्यासंदर्भात खुलासा झालेला आहे. शासनाने आता शुभमंगल नावाची नवीन योजना सुरु केली आहे.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, या तीनही संस्थांची कंट्रोलिंग ॲथॉरिटी कोण आहे ? 6 जिल्हे पॅकेजमध्ये अंतर्भूत आहेत त्यांच्याबाबतीत ऑडीटरचा अहवाल काय आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सामुदायिक विवाहाची योजना महिला आणि बालविकास विभागामार्फत राबविली जाते. याचे संपूर्ण नियंत्रण महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांच्या स्तरावर आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, टोटल मॅकॅनिझम फेल्युअर आहे असे म्हणावे लागेल. महालेखापालांच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे कबूल केले आहे की, वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनसाठी 9.22 कोटी रुपये खर्च झालेले आहेत ही गोष्ट खरी आहे काय याला होय असे उत्तर

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिले आहे. महिला आणि बालविकास आयुक्तालयाने 12.78 कोटींचा खर्च दाखविला ही गोष्ट खरी आहे काय याला होय असे उत्तर दिले आहे. जिल्हा महिला बालविकास अधिकाऱ्यांनी 11.58 कोटी रुपये खर्च केले हे खरे आहे काय याचेही उत्तर होय असे दिलेले आहे. जी वेगवेगळी आकडेवारी ज्या अधिकाऱ्यांनी दिली त्यांच्यावर तर कारवाई कराच. परंतु शासनाची मॅनेजमेंट कुठे आहे ? महालेखापालांकडे 3-3 आकडे पोहोचतात हे कसे ? अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे उत्तर दिले हे योग्य नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी सदनाला माहिती देऊ इच्छितो की, आयुक्तांनी 12.78 कोटी रुपये कोषागारातून वर्ग केले.त्यानंतर वसंतराव नाईक मिशनमार्फत 31 मार्च रोजी 9.22 कोटी रुपये जिल्हा महिला बालविकास अधिकाऱ्यांमार्फत ट्रेझरीमधून काढले. तीन आयुक्तांमार्फत महालेखापालांकडे जी आकडेवारी सादर करावयाला पाहिजे होती त्यामध्ये विसंगती आलेली आहे. याबाबतीत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42273........... श्री.हर्षवर्धन पाटील.......

मात्र या संदर्भात जी रक्कम ट्रेझरीमधून काढली ती सामुहिक विवाहाच्या संदर्भात जे काही पात्र लाभार्थी आहेत त्यांना ती रक्कम देण्याबाबतची सुध्दा कार्यवाही केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सामुहिक विवाहाच्या संदर्भात दोन घटना स्पष्टपणे उघडकीस आलेल्या आहेत. एक म्हणजे काही मंडळी अनुदान लाटण्यासाठी बोगस विवाह दाखवितात, हे सिध्द झाले आहे. काही ठिकाणी पितळेची मंगळसूत्रे वाटण्यात आली, पुढे ती जप्त केली गेली. या संदर्भात वृत्तपत्रात बातमी आली होती. संबंधित तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. त्या संदर्भात कोणती भूमिका घेतली व काय कारवाई केली? ज्यांनी बोगसपणा केला त्या संस्था चालकांना अटक केली का?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही अतिशय चांगली योजना सुरु केली आहे. आता ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू केली आहे. 'शुभमंगल' नावाची विवाह योजना लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सुरु केली होती. त्या आधारे राज्य शासनाने ही योजना सुरु केली आहे. जी तक्रार आली ती प्रामुख्याने गडचिरोली जिल्हयातील होती. ती योजना आदिवासी विकास विभागाची होती. महिला व बालविकास विभागाने त्या विभागाला देखील कळविले आहे. यापुढे लाभार्थ्यांना 10 हजार रुपये चेकने दिले जाणार आहेत. गैरव्यवहार झाला त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. काही संस्था, विशेषत: अकोला आणि यवतमाळ जिल्हयामध्ये काही संस्थांनी सामुहिक विवाहामध्ये बोगसपणा केला. त्यांच्याविरुध्द पोलीस केस दाखल केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची सुध्दा चौकशी सुरु केली आहे.

श्री.दिवाकर रावते : पोलीस गुन्हा दाखल केला का?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मणी, मंगळसूत्र घेण्याची योजना नसून चेकद्वारे लाभार्थ्यांना रक्कम दिली जाते. ज्या संस्था सामुहिक विवाहाचे आयोजन करतील अशा संस्थांना प्रती विवाह 2000 रुपये अनुदान देण्याचा सुध्दा निर्णय केला आहे. त्या दोन संस्थांबाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येत असून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42273...........

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सहा जिल्हयांची योजना राज्यभर लागू केली ही चांगली गोष्ट झाली. अशा तऱ्हेने संपूर्ण राज्यात या योजनेची अंमलबजावणी केली जाईल याची काळजी मंत्रीमहोदय घेतील काय?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही योजना नव्याने सुरु झाली आहे. काही तक्रारी आल्या, काही अडचणी होत्या त्या दूर करुन या संदर्भात नवीन जी.आर. काढला आहे. हा जी.आर. सुस्पष्ट आहे. अंमलबजावणी कशाप्रकारे करावयाची याच्या मेकॅनिझमच्या संदर्भातील धोरण स्वीकारले आहे. शुभमंगल नावाच्या योजनेंतर्गत 30 हजार लोकांना आतापर्यंत फायदा झाला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदय कशासाठी लपवाछपवी करीत आहेत? ज्यांनी अनुदान लाटण्याकरीता बोगस लग्ने लावली त्यांच्यासहित संबंधित जोडप्यांवर देखील कारवाई करणे भाग आहे. सरकारचा पैसा लाटण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर कारवाई केलेली नाही असा माझा आक्षेप आहे. अशी हजारो जोडपी आहेत, ज्यांनी शासनाची फसवणूक केली आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे तक्रार आल्यानंतर त्यांना अनुदान दिलेले नाही. तक्रार आल्यामुळे संबंधित जिल्हयाचे महिला बालविकास अधिकारी व सीडीपीओ यांची ती जबाबदारी असल्यामुळे त्या संदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल कोणत्या तारखेला सरकारकडे आला? हा अहवाल कॅबिनेटपुढे नेण्याचे संकेत आहेत. त्याप्रमाणे तो मंजूर करुन घेतला होता का? तो अहवाल विधानसभेसमोर सादर करण्याची गरज होती. त्याप्रमाणे विधानसभेला सादर केला होता का?

श्री.हर्षवर्धन पाटील : कोणत्या तारखेला अहवाल प्राप्त झाला याची माहिती उपलब्ध नाही. आवश्यकता असल्यास पटलावर ठेवण्यात येईल. या संदर्भात कोणती कारवाई झाली नसेल तर ती देखील केली जाईल.

(नंतर श्री.भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42273.....

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, शासनाकडे अहवाल आला आहे. तो दाबून ठेवण्यात आला आहे. संकेत असा आहे की, हा अहवाल कॅबिनेट पुढे माहितीसाठी सादर करावा लागतो. पण तो सादर करण्यात आला नाही. एवढेच नव्हे तर तो विधिमंडळाकडे देखील सादर करण्यात आला नाही. हे गंभीर मॅटर आहे. विधिमंडळाच्या समितीसमोर साक्ष झाली. त्यानंतर मी यासंबंधी श्री.दाढे, ए.जी.,नागपूर यांच्याकडे विचारणा केली आहे. नियम असा आहे की, हा अहवाल दिला पाहिजे. हा अहवाल देण्याची जबाबदारी त्यांची नाही. सदर अहवाल देण्याची जबाबदारी ही कॅबिनेटवर आहे. शासनाने आपल्याला विधिमंडळामध्ये हा अहवाल द्यायला पाहिजे होता. तेव्हा शासन यासंबंधातील माहिती लपवून का ठेवत आहेत ? सदर माहिती आम्हाला शासन का देत नाही ? भ्रष्टाचाराचे सर्व धंदे शासन का दाबू पहात आहे ? शासन नियमबाह्य वर्तन का करीत आहे ? माझ्याकडे ए.जी.यांचा अहवाल आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा अहवाल शासनाने दाबून ठेवला असता, तर तो सन्माननीय सदस्यांना मिळालाच नसता. डॉक्युमेंट जनतेसाठी ओपन असल्यामुळे तो अहवाल सन्माननीय सदस्यांकडे आला असेल आणि सन्माननीय सदस्य सांगत आहेत की शासनाने तो अहवाल दाबून ठेवला आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय अशा पद्धतीचे अहवाल हे वित्त विभागाच्या माध्यमातून विधिमंडळामध्ये येतात. त्याच बरोबर आपल्याकडे देखील त्याची प्रत येते अशी पद्धत आहे. माननीय मंत्री महोदय, आपल्याकडे ती प्रत नसेल तर ती वित्त विभागाकडून मागवून घेण्याची व्यवस्था करावी आणि सदनाला सादर करावी

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी पुराव्यानिशी बोलत आहे. मी ए.जी.यांच्याशी चर्चा केली. माझी अशी माहिती आहे की, यासंबंधी कॅबिनेटला देखील माहिती दिली गेली नाही. हा अहवाल आमच्यासमोर देखील आला नाही. असे अनेक अहवाल आहेत की जे धूळ खात मंत्रालयात पडले आहेत. दाबून ठेवण्यात आले आहेत. खरे म्हणजे हे नियमबाह्य, घटनाबाह्य वर्तन आहे. शेतकऱ्यांच्या पॅकेजसंबंधी देखील आम्हाला बाहेरून माहिती मिळाली. तेव्हा मंत्रिमहोदयांना याची चौकशी करून उत्तर देण्यास सांगावे. हे आवश्यक आहे. कारण विधिमंडळाचा हा अवमान आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42273.....

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय, वित्तीय अहवाल सदनासमोर ठेवण्याची प्रक्रिया असते. असे अहवाल वित्त विभागाच्या माध्यमातून सभागृहापुढे येत असतात. सदर अहवाल सदना समोर का आला नाही, याची आपण चौकशी करावी. हा अहवाल आधी आला असेल व तो सभागृहापुढे सादर करण्याबाबत प्रलंबित राहिला असेल तर तो का राहिला याची देखील माहिती घ्यावी व ती सदनाला सादर करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

......

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) येथील भारतीय कापूस निगमच्या गोदामाला आग लागल्याबाबत**

**(४) * ४३४११ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) येथील भारतीय कापूस निगमच्या गोदामाला दिनांक ६ मे, २००८ रोजी वा त्या सुमारास २ वाजताच्या सुमारास भीषण आग लागून सुमारे एक कोटी रुपयांचा कापूस जळून खाक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सुरु केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.जयप्रकाश दांडेगावकर श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता :** (१) सी.सी.आय.ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारित येते. धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) येथील भारतीय कापूस निगमच्या गोदामाला दिनांक ५ मे, २००८ रोजी दुपारी ३ ते ४ च्या सुमारास भीषण आग लागून रु. ४९,७५,००० चे नुकसान झाले आहे, हे खरे आहे.

(२) धामणगांव रेल्वे येथील पोलीस विभागाकडून चौकशी झाली असून आगीचे कारण समजू शकले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकरणी पोलीस विभागाकडून केलेल्या तपासात कोणत्या बाबी आढळून आलेल्या आहेत ? हा माझा पहिला प्रश्न आहे. चौकशी केल्यानंतर देखील आगीचे कारण समजू शकले नाही, असे उत्तर देण्यात आले आहे. ते का समजून आले नाही ? त्याबाबत अधिक चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावंकर : सभापती महोदय, पोलीस चौकशीत आगीचे कारण समजू शकले नाही, हे खरे आहे. पोलिसांनी चौकशी केली आहे, पण कारणांचा तपास लागलेला नाही. सीसीआयने एका खाजगी कंपनीचे गोदाम भाड्याने घेतले होते. तीन शेडचे गोदाम होते. अजूनही आगीचे कारण समजू शकलेले नाही. आगीच्या कारणांचा तपास सुरू आहे. पण अजून पर्यंत आगीचे कारण समजू शकलेले नाही.

......

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे पोलीसांनी लातूर येथील सुवर्णड्राप्स कंपनीवर केलेली कारवाई**

**(५) * ४२०७९ डॉ. दिपक सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४२६ ला दिनांक ७ एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स ग्रुप प्रिव्हेंटीव्ह ॲण्ड सोशल हेल्थ केअर सर्व्हिसेस संस्था यांनी पुण्यामध्ये घेतलेल्या शिबीराच्या वेळी पोलीसांनी ताब्यात घेऊन अन्न व औषध प्रशासन, पुणे यांच्याकडे तपासणीसाठी पाठविलेल्या औषधांचा अहवाल प्राप्त होऊन त्याअनुषंगाने चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिद्धाराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय, मात्र रिलायबल ग्रुप प्रिव्हेंटीव्ह ॲड सोशल हेल्थ केअर सर्व्हिसेस संस्था लातूर असे संस्थेचे नाव आहे.

(२) व (३) सदर प्रकरणात अन्न व औषध विभागाकडून अहवाल प्राप्त झाला असून तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये बुध्दीवर्धक आयुर्वेदिक औषधांचा समावेश असल्याचे अहवालात नमूद केले असल्याने कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यापूर्वी देखील दिनांक 7 एप्रिल रोजी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यानी हा प्रश्न उपस्थित केला होता. मला दुर्दैवाने येथे सांगावेसे वाटते की, येथे जे लेखी उत्तर देण्यात आले आहे ते चुकीच आहे. ते आपण तपासून घ्यावे. उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर प्रकरणात अन्न व औषध विभागाकडून अहवाल प्राप्त झाला असून तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये बुद्धीवर्धक आयुर्वेदिक औषधांचा समावेश असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे." त्यामुळे माझ्या ज्ञानात मंत्रिमहोदय भर घालू शकतील काय ? आयुर्वेद औषधाने बुद्धी वाढते असे कुठे तरी मेडिकल जर्नलमध्ये लिहिले आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.नितीन गडकरी (बसून) : असे असेल तर ते मंत्र्यांना का देता येत नाही ?

यानंतर श्री.पी.खर्चे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42079.......

श्री. सिध्दाराम म्हेत्रे: महोदय, अन्न व औषध प्रशासनाकडून जो अहवाल मिळाला आहे त्याचे टेस्टिंग झाले असून त्यात त्यांनी सांगितले आहे की, यामध्ये सुवर्णाचे प्रमाण 0.084 आणि दुसऱ्या नमुन्यात हे प्रमाण 0.089 असे नमूद केले आहे. अशा प्रकारे दोन्ही नमुन्यांमध्ये शंख पुष्पी आणि बुध्दीवर्धक औषध असून आयुर्वेद शास्त्रात त्यासंबंधीचा उल्लेख आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, अशा प्रकारे कुठल्याही औषधाने बुध्दी वाढते किंवा बुध्द्यांक वाढतो असे कोठेही प्रुव्ह केलेले नाही. आयुर्वेदामध्ये जर असा उल्लेख असेल तर ते आपण तपासून घ्यावे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, आयुर्वेदामध्ये आवळा आणि चरकसंहितेमध्ये अशा अनेक गोष्टींचा उल्लेख आहे, तसेच आयुर्वेदातील कोणत्या औषधामुळे कोणता फायदा होतो यासंबंधीचा उल्लेख मला येथे करता येत नाही. सन्माननीय सदस्य हे ॲलोपेथी डॉक्टर आहेत, त्यांना हवे असल्यास मी त्यांना सांगू शकतो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, विनोदाचा भाग ठीक आहे पण अशा प्रकारच्या औषधामुळे बुध्दी वाढते असे शास्त्रीयदृष्ट्या कुठेही प्रुव्ह केलेले नाही तर हे केवळ हायपोथेसिस आहे. म्हणून याबाबतची तपासणी पुन्हा एफडीए कडून शासन करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय.

-----------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/

आदिवासी भागातील बालके व माता संगोपन योजनेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) प्रवाशांवर अधिभार लावल्याबाबत

(6) * 42399 श्री. अरविंद सावंत, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. अनिल परब, श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. सुरेश जेथलिया, श्री. किसनचंद तनवाणी, श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय महिला व बालविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आदिवासी भागातील बालके व माता संगोपन योजनेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) प्रवाशांवर अधिभार शासनाने बसविलेला आहे, तसेच या योजनेसाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर निधी मिळतो, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर अधिभाराची रक्कम शासनाने दुप्पट केली आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, आजपावेतो परिवहन सेवा चालविणाऱ्या 11 महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडून पोषण आहारापोटी सुमारे 433 कोटी रुपये शासनाला मिळाले असून त्याचा विनियोग आदिवासी बालके व माता यांच्या पोषणासाठी करण्यात आला आहे काय ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (1) होय.

(2) नाही.

(3) होय. सदर तरतूद राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांच्या पोषणासाठी खर्च करण्यात आली आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, राज्यात जवळपास 85 लाख आदिवासी आहेत, त्यांच्या विकासासाठी लोकसंख्येच्या तुलनेत तरतूद करण्याबाबत सुखटणकर समितीने केलेल्या शिफारशी सन 1994 पासून अंमलात आलेल्या आहेत. त्याचा विचार करता आजपर्यंत आदिवासींचा 6500 कोटीचा अनुशेष शिल्लक आहे, हे खरे आहे काय ? तसेच यासाठी राज्यातील महापालिका परिवहन सेवा व एस.टी. वर अधिभार लावत आलो आहोत असाच अधिभार खाजगी बस वाहतूकदारांवर देखील लावणार काय ?

.......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/

ता. प्र. क्र. 42399.....

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, यासंदर्भात सुखटणकर समितीने आदिवासींच्या अनुशेषाबाबतची माहिती दिली ती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. कारण हा अहवाल सन 1994 पासूनचा आहे. तसेच यासंदर्भात अधिनियम 1958 च्या कलम (3) नुसार दिनांक 1.4.1974 पासून हा अधिभार लावण्याची प्रक्रिया बेस्ट मध्ये सुरु केली आहे. राज्यातील कुपोषित बालकांसाठी हा अभिभार आपण लावला आहे आणि जवळपास 433 कोटी रुपये दरवर्षी आपल्याला यातून मिळतात. परवा सभागृहात राखीव निधी रद्द करण्यासंबंधीचे विधेयक आपण मंजूर करुन घेतले आणि या माध्यमातून दरवर्षी आपण 2100 कोटी रुपये आपण खर्च करु,असे मला वाटते. हा अधिभार खाजगी बस सेवेला लागू करण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांची सूचना आहे. परंतु याबाबतीत कायदेशीर बाबी तपासून पुढील निर्णय घेतला जाईल, असे मी सांगू इच्छितो.

श्री. अरविंद सावंत : महोदय, बेस्ट व्यवस्थापन आणि एस.टी. महामंडळाच्या गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून आपण अभिभार घेतो आणि खाजगी बस सेवेकडून असा अधिभार घेत नाही. शेवटी यातून कुपोषित मुलांसाठीच हा पैसा खर्च करीत आहोत. तसेच यासाठी केंद्राकडूनही पैसे मिळतात. सुखटणकर समितीने सांगितल्याप्रमाणे आजपर्यंत आपण 7500 कोटी रुपये राज्य शासनाने द्यायला पाहिजे होते पण शासनाने ती रक्कम दिलेली नाही, याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, याबाबतची तपासणी करुन घेण्यात येईल आणि वित्त विभागाला सुध्दा अशी शिफारस करण्यात येईल. कारण हा अधिभार कुपोषित आणि दुर्गम भागातील बालकांसाठी खर्च करण्यात येत असून .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42399....

श्री. हर्षवर्धन पाटील .....

कुपोषणाच्या संदर्भात उच्च न्यायालयाची एक समिती गठीत करण्यात आलेली असून या समितीमध्ये हायकोर्टचे रिटायर्ड जजेसचा समावेश करण्यात आलेला आहे. आदिवासी विकास विभागाला ही बाब सांगण्यात आलेली आहे तसेच वेळोवेळी महिला व बालविकास विभाग हा निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करीत असतो. खाजगी बसला कर लावण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, खाजगी बस वाहतुकीला कर लावण्याची शिफारस करण्यात येईल.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात बेवारशी मृतदेहांच्या अंत्यसंस्काराचा खर्च पोलिसांना करावा लागत असल्याबाबत**

**(७) * ४३०७१ श्रीमती अलका देसाई , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.अरुण गुजराथी , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.विक्रम काळे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेवारशी मृतदेहांच्या अंत्यसंस्कारासाठी फक्त ८ रुपयांची तरतूद असून, ती किमान ५०० रुपयांपर्यंत करण्याचा प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) विशेषत: मुंबईतील कॉरोनर कोर्ट येथील बेवारशी मृतदेहाच्या नातेवाईकांची १५ दिवस वाट पाहिल्यानंतर बेवारस मृतदेहांवर शासकीय खर्चाने अंत्यसंस्कार करण्याची तरतूद नसल्याने स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना ७०० रुपयांपर्यत स्वखर्चाने अंत्यसंस्कार करावे लागत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिनांक ०७.०९.२००६ रोजी व पोलीस महासंचालक यांनी दिनांक ३०.०९.२००६ रोजी प्रस्ताव पाठविला असून दोन्ही प्रस्तावात विसंगती असल्यामुळे अधिक माहिती संबंधितांकडून मागविण्यात आली आहे. सदरहू माहिती अद्याप प्रलंबित असल्याने प्रस्ताव प्रलंबित आहे.

(२) तातडीच्या खर्चासाठी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना स्वत: खर्च करावा लागला तर आवश्यक कागदपत्रांसह मागणी केल्यास खर्चाची प्रतिपूर्ती करुन देण्याची तरतूद आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : राज्यात बेवारशी मृतदेहांच्या अंत्यसंस्कारासाठी फक्त 8 रुपयांची तरतूद करण्यात येते. अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. 8 रुपयांमध्ये अंत्यसंस्कार होत नाही, त्यामुळे बेवारस मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी शासन 500 रुपयांची तरतूद करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बेवारस मृतदेहाचा अंत्यसंस्कार करण्यासाठी 8 रुपये खर्चाची तरतूद आहे. बेवारस मृतदेहाचा संस्कार करण्यासाठी अधिकारी पैसे देत असतात परंतु नंतर हे पैसे त्यांना दिले जातात.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, बेवारस मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी 8 रुपयांची तरतूद आहे. परंतु मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, अधिकारी बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्काराचा खर्च पालीस अधिकारी करतात व त्यांना नंतर हे पैसे दिले जातात. परंतु यासंदर्भात कार्यालयीन खर्चाची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी शासन 800 रुपयांची तरतूद करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी मुंबई सीपी यांनी 500 रुपयांची मागणी केली असून डीजी यांनी 1500 ते 2000 रुपयांची मागणी केलेली आहे. मुंबईमध्ये मुंबई पोलिसांची शव वाहिनी असल्यामुळे त्यांना खर्च कमी येतो परंतु ग्रामीण भागात शव वाहिनीची सोय नसल्यामुळे त्यांना जास्त खर्च येतो त्यामुळे बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्काराच्या तरतुदीच्या संदर्भात 8 दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाने समिती गठीत केली नाही हे आमचे नशीब. बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्काराच्या तरतुदीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. त्यामुळे शासनाने बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्काराची तरतूद 500 ते 800 रुपये करावी अशी आमची विनंती आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : बेवारशी मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी आज पासून 800 रुपये देण्याचे जाहीर करण्यात येत आहे.

-----------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनांची बहुतांशी मंजूर प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(८) * ४२९२१ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनांची बहुतांशी मंजूर प्रकरणे चार वर्षे होऊनही प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २००८ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरची प्रकरणी तातडीने निकालात काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.00

ता.प्र.क्र.42921...

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयातील दारव्हा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनांची बहुतांशी मंजूर प्रकरणे प्रलंबित आहेत काय ? या संदर्भात जो पहिला प्रश्न विचारण्यात आला आहे त्या प्रश्नाला उत्तर देत असतांना माननीय मंत्रिमहोदयांनी " हे खरे नाही " असे म्हटलेले आहे. त्याच बरोबर प्रश्न क्रमांक दोन, तीन , चारला उत्तर देत असतांना " प्रश्न उद्भवत नाही " असे उत्तर दिलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे यवतमाळ जिल्हयाचे उपजिल्हाधिकारी श्री.आर.पी धुरजड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती व या समितीने दिलेली माहिती अशी आहे की, लाभार्थ्यांनी संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर चार वर्षानंतर देखील अनुदान मिळालेले नाही .अशी घटना प्रत्यक्षात दारव्हा येथे घडली असतांना या प्रश्नाला मात्र विसंगत लेखी उत्तर दिलेले आहे. तेव्हा हे खरे आहे काय ? त्यानंतर मला दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, या समितीचा अहवाल जिल्हाधिकारी यवतमाळ यांना दिनांक 20 फेब्रुवारी 2007 रोजी वा त्या सुमारास सादर केला होता हे खरे आहे काय, असल्यास त्या अहवालात कोणत्या गोष्टी नमूद केल्या आहेत याची माहिती देण्यात येईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयातील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अशा प्रकारची कोणतीही चौकशी समिती स्थापन केलेली नव्हती किंवा त्या संदर्भात आतापर्यंत एकही तक्रार करण्यात आलेली नव्हती. स्थानिक आमदार सन्माननीय सदस्य श्री.संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली होती आणि या तालुक्यात दोन महिन्यापूर्वी दोन स्पेशल ड्राईव्हज घेण्यात येऊन 1910 लाभधारकांचा त्या योजनेत समावेश करण्यात आला होता. सात आठ लाभधारक क्रायटेरियात बसत नसल्यामुळे त्यांचा समावेश या योजनेत करण्यात आला नव्हता. सन्माननीय सदस्यांनी जर काही स्पेसिफिक केसेस दिल्या तर त्या तपासून पाहण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सबंधित मतदारसंघातील आमदार श्री.संजय राठोड त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली असून ते आणि त्या समितीचे सदस्य याच्यामध्ये पक्षीय वादातून संजय गांधी निराधार योजनाची मंजूर प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत हे खरे आहे काय ? नसल्यास, ही प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42921...

श्री.सुरेश शेट्टी सभापती महोदय, त्या ठिकाणी अशा प्रकारचा कोणताही वाद नसून सन्माननीय सदस्य श्री.संजय राठोड यांनी नुकतीच बैठक घेतली आहे. दर तीन महिन्यातून एकदा या समितीची बैठक सर्व आमदारांनी घेतली पाहिजे असा आम्ही नियम केलेला आहे ...

श्री.दिवाकर रावते : त्यांनी बैठक घेतलेली आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : त्यांनी बैठक घेतली असून याबाबतीत मी मघाशी संगितले आहे .

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

**सभापती** :एका वेळी एकाच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, स्थानिक आमदार श्री.संजय राठोड यांनी गेल्या चार वर्षात किती बैठका घेतल्या होत्या, किती बैठकामध्ये निर्णय घेण्यात आला नव्हता,निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत ? पूर्वीच्या दोन बैठकामध्ये निर्णय घेण्यात आला होता एवढेच मंत्री महोदयांनी न सांगता मी विचारलेल्या सर्व प्रश्नांची त्यांनी उत्तरे द्यावीत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 13.8.2004 रोजी एक बैठक घेण्यात आली होती त्यानंतर दिनांक 17.12.2005 रोजी, दिनांक 21.9.2006 रोजी, दिनांक 8.5.2007 रोजी आणि दिनांक 17.12.2007 रोजी बैठका घेण्यात आल्या होत्या. या बैठकीमध्ये किती लाभधारकांच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला होता याची माहिती मी सन्माननीय सदस्यांना देऊ इच्छितो दिनांक 13.8.2004 रोजीच्या बैठकीत 258 लाभधारकांची , दिनांक 17.12.2005 रोजीच्या बैठकीत 676 लाभधारकांची , दिनांक 21.9.6 रोजीच्या बैठकीत 304 लाभधारकाची आणि दिनांक 8.5.2007 रोजीच्या बैठकीत 191 लाभाधारकाची आणि त्यानंतरच्या बैठकीत 200 लाभधारकांची प्रकरणे समितीने मंजूर केली होती.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तालुका व जिल्हा पातळीवरील शासकीय समित्यांमध्ये विधान परिषदेच्या सदस्यांना प्रतिनिधित्व मिळण्याबाबत</u>**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे...

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

**सभापती** : एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्यानी न बोलता एका वेळी फक्त एकाच सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील प्रश्न विचारत नाहीत. सभापती महोदय, तालुका स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर ज्या विविध समित्या असतात त्या समित्यावर विधान परिषद सदस्यांना स्थान दिले जात नाही. मागच्या वेळी मी सभागृहात सांगितले होते की, माझ्या मतदारसंधातील एका ठिकाणी मला फूट ब्रीज बांधण्यास परवानगी दिली नाही. तेव्हा या समित्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना एक दोन मिनिटे बोलण्यास परवानगी द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तीन वर्षापूर्वी हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता.त्यावेळी शासनाकडून असे आश्वासन देण्यात आले होते की खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य त्या समितीचे अध्यक्ष असतील आणि या सभागृहाचे सन्माननीय सदस्य हे त्या समितीचे सदस्य असतील व त्यांना प्रत्येक बैठकीच्या वेळी बोलाविण्यात येईल. खालच्या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी जर ही बैठक बोलावली नाही तर वरच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य बैठक बोलावू शकतात. अशा प्रकारचे आश्वासन सभागृहात दिले होते. त्या आश्वासनाचे काय झाले आहे व त्या आश्वासनाची पूर्तता केव्हा करण्यात येणार आहे?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. या सभागृहामध्ये तीन वर्षापूर्वी आणि नंतरच्या काळात सुध्दा यासंबंधी चर्चा झाली आहे. विधानसभेचे सन्माननीय सदस्य हे तालुका स्तरावरील शासकीय समितीचे अध्यक्ष असतात त्या समितीवर पूर्वीच्या काळात विधानपरिषदेचे सदस्य हे सहअध्यक्ष असावयाचे. पुष्कळ दिवसापर्यंत ते सहअध्यक्ष होते. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी विनंती केली आहे की, किमान त्या समितीवर सदस्य म्हणून आमची नियुक्ती केली पाहिजे. तसेच, त्या समितीची ज्यावेळी बैठक होईल त्या बैठकीचे निमंत्रण कोणत्याही परिस्थितीत आम्हा विधानपरिषद सदस्यांना पोहोचलेच पाहिजे. माझे याबाबतीत असे म्हणणे आहे की, संसदीय कामकाज मंत्र्यांनी याबाबतीत स्वत: पुढाकार घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. अशाप्रकारे शासकीय समितीचे अध्यक्ष हे त्या मतदारसंघाचे सन्माननीय विधानसभा सदस्य आहेत, त्या समितीवर विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना सदस्य म्हणून घेण्यात यावे. तसेच, विधानपरिषद सदस्यांना पूर्वी सहअध्यक्ष करण्यात येत होते, को-चेअरमन करण्यात येत होते. तसे जर पुन्हा करता आले तर पहावे, किंवा त्यांना उपाध्यक्ष करावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यामधून मार्ग काढण्याबाबत निश्चितपणे माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. परंतु काही शासकीय समित्या या तालुका स्तरावरील असतात याची आपणास पूर्णपणे कल्पना आहे. त्यामुळे तालुका स्तरावरील शासकीय समित्यांचे अध्यक्ष हे त्या मतदारसंघाचे आमदार असतात. उदा.तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष हे त्या तालुक्याचे आमदार असतात. त्यासंबंधी सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढले आहे. तसेच, पालक मंत्र्यांच्या स्तरावरील समितीमध्ये विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना घेतले पाहिजे यासंबंधी आपले देखील स्थायी आदेश आहेत. सभापती महोदय, आपण सूचित केलेली बाब तपासून घेण्यात येईल व त्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल.

**सभापती** : मंत्रिमहोदय, आपण ही बाब तपासून घ्यावी. मी देखील पुष्कळ दिवस संसदीय कामकाज मंत्री होतो. त्याचप्रमाणे विधानसभेचा सदस्य म्हणून अनेक वर्षे होतो. विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना सहअध्यक्ष नेमण्याची पूर्वी पध्दत होती म्हणून माझी तशी इच्छा आहे. यामध्ये प्रश्न असा आहे की, विधानपरिषद सदस्यांचा मतदारसंघ हा चार-पाच तालुक्यांचा मिळून जरी असला तरीही ते ज्या तालुक्यामध्ये रहातात, ज्याठिकाणी त्यांचा कायम वास्तव्याचा पत्ता

**सभापती**....

दिलेला आहे, त्या तालुक्यातील समित्यांमध्ये त्यांचा सहभाग असावा असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबतीत आपण स्वत: लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, जवाहर विहिरी मंजूर करण्यासंबंधीची जी समिती आहे त्या समितीवर विधानपरिषदेच्या सदस्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. तेव्हा तो समावेश करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो, आपले आभार मानतो.

**सभापती** : सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी या विषयासंबंधी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तेव्हा आपण पाठपुरावा करुन सन्माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, जिल्हा पातळीवर आणि स्थानिक पातळीवर जे शासकीय कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यासाठी छापण्यात येत असलेल्या निमंत्रण पत्रिकेवर विधानपरिषद सदस्यांचे नाव छापणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक ठिकाणी अशाप्रकारे छापण्यात येत असलेल्या निमंत्रण पत्रिकेवर विधानपरिषद सदस्यांचे नाव मुद्रित केले जात नाही. याची सुध्दा आपण गांभीर्याने दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या सर्वच प्रश्नांच्या अनुषंगाने मी सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना बोलावून घेतो आणि सन्माननीय मुख्यमंत्र्यांना देखील याबाबत विनंती करतो. या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा त्यांच्या विभागात रहाणे गरजेचे आहे. ज्या शासकीय कार्यक्रमांना विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना ज्या प्रतिष्ठेने बोलाविले जाते त्याच प्रतिष्ठेने विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना देखील बोलाविणे गरजेचे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:10

**सभापती** . . . .

पण काही ठिकाणी असे दिसून आलेले आहे की, दुर्दैवाने अशा प्रकारच्या निमंत्रण पत्रिकेवर विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांची नावे नाहीत. यासंदर्भातील बैठकीसाठी मी मुख्य सचिवांना देखील बोलविणार आहे. तसेच मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना देखील विनंती करणार आहे की, याबाबतीत आपण सर्वांनी एकत्रितपणे चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

----

. . . .2 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-2

**पृ.शी.**: तोंडी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाने सहकारी संस्थांना दीड कोटी रुपयांचे काम नियमबाह्यरित्या दिल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री जगदीश गुप्ता, प्रतापराव सोनवणे, गुरुमुख जागवानी, नितीन गडकरी, वि.प.स. व श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स.यांच्या दिनांक 21 एप्रिल 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 39576 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

. . . .2 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





<u>कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे</u>

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2006-2007 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगाव) यांचा सन 2006-2007 चा 18 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

. . . .2 आर-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री अनिल परब, दीपक सावंत, अरविंद सावंत यांनी "दिनांक 18-7-2008 रोजीच्या सुमारास विधिमंडळ परिसरात एका संतप्त बेरोजगार बी.एड.धारक विद्यार्थ्याने आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न, त्याचप्रमाणे कर्नाटकाच्या सीमा भागातील 865 गावातील विद्यार्थ्यांना राज्यात शिक्षक सेवक म्हणून भरती करण्यासंदर्भात निर्णय घेऊन सुध्दा सदर विद्यार्थ्यांना नोकऱ्या न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी "शिरनेर ता.अंबड, जि.जालना येथील पाझर तलावासाठी अलिकडेच शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणे, सदर पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने तो फुटून वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, जालना जिल्हयात मंगू जळगाव, बोलेगांव, जामसमर्थ, राहेरा, पराडा, म्हसळा, पाडेपाखरी इ.पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून ते रोजगार हमीच्या मजुराव्दारे न होता मशिनच्या सहाय्याने करण्यात येणे व त्यात लाखो रुपयांचा अपहार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे यांनी "कोकणातील नद्यांमधील गाळाची समस्या दिवसेंदिवस जटील बनत असून सदर नद्यांमधील गाळ काढण्यासाठी तेथील जनतेने वारंवार मागणी करुनही अंदाजपत्रक तयार करण्याव्यतिरिक्त कुठलीही कार्यवाही करण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "राज्यातील शेतकऱ्यांना तसेच उद्योजकांना विद्युत जोडण्या देण्यासाठी येत असलेला खर्च वीज वितरण कंपनीने न देण्यासंदर्भात दि.16 फेब्रुवारी, 2008 रोजी आदेश जारी केला असल्यामुळे शेतकरी व उद्योजकात पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



**सभापती** . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "रायगड जिल्ह्यातील धारा औद्योगिक वसाहतीतील सुदर्शन केमिकल्स कारखान्यातील कंत्राटी कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरु केले असता सदर आंदोलकांवर पोलिसांनी गोळीबार व लाठीमार केल्याने पोलिसांच्या लाठीमारात अनेक कामगार जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर यांनी "सर्वशिक्षा अभियानांतर्गत राज्यात जवळपास 10 हजार पदवीधर काम करीत असणे, शासनाने निवडणूक विभागात तसेच रोजंदारी व कार्यव्ययी आस्थापनेवर काम करणाऱ्या अनुक्रमे 4 व 11 हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा घेतलेला निर्णय, याच धर्तीवर सर्वशिक्षा अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना देखील शासन सेवेत सामावून घेण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " दिनांक 5 जुलै, 2008 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग किल्ल्याचे बुरुज ढासळल्याची घडलेली घटना, सदरहू किल्ला जतन करण्याची जबाबदारी पुरातत्व विभागाकडे असूनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माहूर येथे रेणुका मातेच्या पायथ्याशी छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांनी बेकायदेशीरपणे दुकाने उघडून मंदिर परिसरात केलेले अतिक्रमण, सदर दुकानदार हे भाविकांची सेवा करीत असल्याने त्यांना व्यवसायासाठी मंदिर परिसरात जमीन देण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करुनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "दिनांक 18.7.2008 रोजी वा त्यासुमारास चिपळूण येथील वशिष्ठी नदीतील गाळाचे चित्रीकरणास गेलेल्या तीन पत्रकारांचे तेथील हातभट्टीवाल्या दारु विक्रेत्यांनी अपहरण करुन त्यांना जबर मारहाण करण्यात येणे, पत्रकारांवरील जीवघेणे हल्ले करणाऱ्यांना तात्काळ अटक करुन तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई महानगरपालिकेच्या अंधेरी के पूर्व व इतर परिसरातील सफाईचे काम हैद्राबाद येथील 'रामके' या खाजगी कंपनीला 110 कोटी रुपयात दिले असून सदर काम देताना महापालिकेच्या सफाई कामगारांचा विचार करण्यात आलेला नसल्यामुळे सफाई कामगार संघटनेने आंदोलन करण्याचा दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील अनुशेष भरुन काढण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये नियुक्त अप्रशिक्षित शिक्षकांना फक्त 1500 रुपयात राबविले जात असून सदर शिक्षक 3-3 वर्षे राबूनही त्यांना अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्यात न आल्याने तसेच त्यांना सेवांतर्गत डी.एड. करण्याची संधी न दिल्याने त्यांनी सदर मागण्यांसाठी सुरु केलेले आंदोलन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

**पृ. शी.** : पेण (जि.रायगड) तालुक्यातील खरोशी-दुरशेत रस्त्यावर साकुच्या दुरुस्तीचे काम चालू असताना लोखंडी अँगलमधून वीज प्रवाह प्रवाहित झाल्यामुळे विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

**मु. शी.** : पेण (जि.रायगड) तालुक्यातील खरोशी-दुरशेत रस्त्यावर साकुच्या दुरुस्तीचे काम चालू असताना लोखंडी अँगलमधून वीज प्रवाह प्रवाहित झाल्यामुळे विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रविशेठ पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "पेण (जि.रायगड) तालुक्यातील खरोशी-दुरशेत रस्त्यावर साकुच्या दुरुस्तीचे काम चालू असताना लोखंडी अँगलमधून वीज प्रवाह प्रवाहित झाल्यामुळे विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मयत कु. अजय महादेव घरत यांच्या कुटुंबियांना तसेच जखमी कु. प्रतिक हरिभाऊ पाटील यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय ? असल्यास किती व केव्हा देण्यात आली ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, त्या कंत्राटदारानें 1 लाख 90 हजार रुपयांची मदत मयत अजय महादेव घरत यांच्या कुटुंबियांना दिलेली आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात जात पडताळणीची दीड लाख प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी

**मु. शी.** : राज्यात जात पडताळणीची दीड लाख प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी याबाबत सर्वश्री प्रतापराव सोनवणे, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री प्रतापराव सोनवणे, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी "राज्यात जात पडताळणीची दीड लाख प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, राज्यामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणीची सुमारे दीड लाख प्रकरणे प्रलंबित आहेत आणि त्यामुळे अनेक विद्यार्थी, अनेक शासकीय कर्मचारी आणि अनेक लोकप्रतिनिधी यांच्यापुढे भविष्यातील योजनांबद्दल अनंत अडचणी निर्माण झालेल्या आहेत हे सर्वश्रुत आहे. या अडचणी उभ्या राहण्यामागे शासनाने यासंदर्भात गंभीर नसणे, बहुतांशी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांची नकारात्मक मानसिकता आणि जात पडताळणी कार्यालयांमध्ये पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नसणे ही प्रमुख कारणे आहेत. जात प्रमाणपत्र वेळेवर न मिळणे ही बाब अनेक विद्यार्थी, शासकीय कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यावर अन्याय करणारी व त्यांच्या भवितव्याशी खेळ खेळणारी आहे. तेव्हा यासंदर्भातील सर्व अडचणी तातडीने दूर करण्यासाठी या एकंदर प्रकरणात आवश्यक त्या कोणत्या सुधारणा तातडीने शासनातर्फे करण्यात येतील याची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ? तसेच रिक्त असलेली 105 पदे किती दिवसात भरली जातील ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, राज्यामध्ये जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत हे खरे आहे. या प्रकरणांचा वेळेवर निपटारा व्हावा म्हणून शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार शासनाने महसूल आयुक्त, अतिरिक्त महसूल आयुक्त, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या 15 समित्या नियुक्त केल्या आहेत. त्याचप्रमाणे 14 जुलै रोजी महसूल विभागाकडून 7 अतिरिक्त जिल्हाधिका-यांची पदे मंजूर करुन घेतली आहेत. या प्रकरणांचा निपटारा तात्काळ करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. या कामासाठी 279 पदे मंजूर झाली होती, त्यापैकी 178 पदे भरलेली आहेत, उर्वरित 105 पदांपैकी आणखी 4 पदे भरली आहेत. राहिलेली पदे लवकरच भरुन जात पडताळणीच्या प्रकरणांचा निपटारा तात्काळ करण्याचा प्रयत्न केला जाईल.

------

## नियम 93 वरील निवेदन क्रमांक 3 पुढे ढकलण्याबाबत

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नियम 93 च्या सूचनेवरील क्र.3 चे निवेदन उद्या घेण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ.शी.**: मासेमारी करणा-या बोटींना परवाने देताना झालेल्या गैरव्यवहाराची अखिल भारतीय मच्छिमार कृती समितीने केलेली चौकशीची मागणी.

**मु.शी.**: मासेमारी करणा-या बोटींना परवाने देताना झालेल्या गैरव्यवहाराची अखिल भारतीय मच्छिमार कृती समितीने केलेल्या चौकशीच्या मागणीसंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ.शी.**: पंतप्रधान पॅकेज अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांसाठी आलेले जिप्सम खत व्यापा-यांना विकून उपविभागीय कृषी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार.

**मु.शी.**: पंतप्रधान पॅकेज अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांसाठी आलेले जिप्सम खत व्यापा-यांना विकून उपविभागीय कृषी अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) :सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "पंतप्रधान पॅकेज अंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांसाठी आलेले जिप्सम खत व्यापा-यांना विकून उपविभागीय कृषी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये श्री.लहाळे नावाचे उपविभागीय कृषी अधिकारी आहेत. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे शेतक-यांना खत मिळत नाही. खताच्या मागणीसाठी त्यांच्याकडे वारंवार जाऊन सुध्दा त्यांनी शेतक-यांना दिलेली वागणूक संतापजनक आहे. त्याबद्दल शासन या अधिका-यांची चौकशी करणार आहे काय आणि त्यांनी अवैध संपत्ती जमा केलेली आहे असेही लोकांनी तक्रारीत नमूद केले आहे त्यासंबंधी लाचलुचपत खात्यातर्फे चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : 4 जुलै रोजी भारतीय जनता पक्षाचे बुलढाणा जिल्हयाचे अध्यक्ष श्री.दत्ता पाटील आणि आणखी 11 लोकांनी बुलढाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांकडे तक्रार दाखल केली होती. संबंधित तक्रारकर्त्यांकडून तक्रार अर्जामध्ये काही गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही त्यामुळे जिल्हाधिका-यांनी अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांना अर्जदारांकडून सविस्तर माहिती घेऊन 15 दिवसामध्ये अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

------

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर 5 लक्षवेधी सूचना, सन 2008-09 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि दोन अर्धा तासाच्या दाखविलेल्या आहेत. केंद्र सरकारने लोकसभेमध्ये मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावावर आज संध्याकाळी 6 वाजता निर्णय होणार असल्यामुळे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना त्याबाबत उत्सुकता आहे. फार तर आजच्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलता येतील. पुरवणी मागण्यांवरील चर्चा त्या त्या दिवशीच पूर्ण करण्याचे संकेत आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आजच्या लक्षवेधी सूचना संपल्यानंतर आजचे कामकाज थांबवावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज 4 वाजेपर्यंत जेवढे कामकाज होईल तेवढे पूर्ण करण्यास हरकत नाही.

**सभापती** : लक्षवेधी सूचना पुढे ढकलता येतील. पण आज सभागृहाची बैठक सकाळी 9.30 पासून सुरु झालेली आहे. त्यामुळे दुपारी 2 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी बैठक स्थगित करु या असे माझे मत आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सन्माननीय सदस्य : नाही नाही.

**सभापती** : ठीक आहे. मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना विचारू इच्छितो की, आता या ठिकाणी दोन्ही बाजुंच्या काही सन्माननीय सदस्यांकडून अशी सूचना आली आहे की, सायंकाळी लोकसभेमध्ये होणाऱ्या विश्वासदर्शक ठरावावरील प्रोसिडींग प्रत्यक्ष पाहण्यासाठी सदनाची बैठक लवकर आटोपती घ्यावी. त्यासाठी आजचे कामकाज उद्यावर ढकलावे. त्यासाठी उद्या सभागृहाची विशेष बैठक सकाळी लवकर घेण्यात यावी. परंतु आज आपल्या कार्यक्रम पत्रिकेवर पुरवणी मागण्या चर्चेसाठी दाखविल्या आहेत. तर आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपल्याला उद्या घेता येईल काय ? त्याबद्दल आपला सल्ला काय राहील ?

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दोन्ही बाजुंचे सदस्य उद्या अधिक वेळ बसून कामकाज पूर्ण करावयाचे म्हणत आहेत यावरून आजच्या दिवसाचे महत्त्व काय आणि किती आहे हे आपण लक्षात घ्यावे. शेवटी सभागृह एकमताने एखादा मुद्दा आपल्यासमोर मांडते तेव्हा सामान्यत: आपण त्याचाच आधार घेतो. तेव्हा आपण सांगितले त्याप्रमाणे दोन्ही बाजुंच्या सदस्यांचे याबाबत एकमत दिसते आहे तरी आपण त्यादृष्टीनेच विचार करावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या संबंधात आपण जे काही ठरवाल ते आम्हाला मान्य राहल. मात्र माझी एक सूचना आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला मंत्र्यांकडून जी उत्तरे दिली जातात ती जणू काही चटावरचे श्राद्ध उरकायचे या पद्धतीने दिली जाऊ नयेत. आम्ही या ठिकाणी या चर्चेच्या माध्यमातून जे जे मुद्दे उपस्थित करतो त्यावर व्यवस्थित उत्तरे मिळाली पाहिजेत. तसेच पुरवणी मागण्यांवरील चर्चेलाआपण वेळेचेही बंधन घालू नये. वाटल्यास, उद्या, परवा, सकाळी 9 वाजता .. केव्हाही ही चर्चा ठेवा आमची त्याला हरकत राहणार नाही. ....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, 'चटावरचे श्राद्ध उरकणे' असा जो वाक्प्रयोग त्यांनी केला आहे तो येथे करणे योग्य नाही. तरी आपण ते शब्द मागे घ्यावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी ते शब्द मागे घेतो. पण तरीही मी पुन्हा एकदा आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणी पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊन सन्माननीय सदस्य पोटतिडकीने बोलत काही प्रश्न उपस्थित करतात, मुद्दे मांडतात पण त्या एकाही प्रश्नाला वा मुद्याला मंत्र्यांकडून उत्तर मिळत नाही. त्याबाबत नंतर कारवाई देखील होत नाही. या

..... यूय 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

निमित्ताने आणखी एक बाब आपल्या मी निदर्शनास आणून देईन की, 'विशेष उल्लेख' संबंधात आपण 'सभापती' म्हणून स्वत:च्या सहीने मंत्र्यांना पत्रे दिली की, सदस्य येथे जो विशेष उल्लेख करतील त्या संबंधात एका वर्षात त्यांना उत्तर वा खुलासा दिला गेला पाहिजे. पण प्रत्यक्षात त्याबाबत काहीही होत नाही. वर्षानुवर्षे आम्हाला त्याबाबत उत्तर मंत्र्यांकडून येत नाही. म्हणूनच माझ ी आपल्याला नम्र व आग्रही विनंती आहे की, आपण या संबंधात जे काही ठरवाल, निर्णय द्याल तो आम्हाला मान्य आहे मात्र पुरवणी मागण्यांवरील चर्चा ही व्यवस्थित व्हावी इतकेच आमचे म्हणणे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आता पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यापेक्षा आपण लक्षवेधी सुचनांचे कामकाज घेऊन नंतर उद्या सकाळी 9.30 ते 11.30 या काळात आजच्या दिवसाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा घ्यावी.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, आपल्याला आमची विनंती आहे की, या संबंधात आपण जे निदेश द्याल ते आम्हाला मान्य राहतील. तरीही सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे करावयास हरकत नाही.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, उद्या सकाळी आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेण्याचे ठरविले तरी सकाळच्या दोन तासात ती चर्चा पूर्ण होईल असे नाही. मग आपल्याला असे करावे लागेल की, सकाळी 2 तासाच्या विशेष बैठकीत जेवढ्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण होईल तेवढी आपण घेऊ आणि राहिलेली चर्चा नियमित बैठकीमध्ये प्रथमत: घेऊन नंतर उद्याच्या दिवसाच्या कार्यक्रम पत्रिकेवरील दुसऱ्या दिवसाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपल्याला घ्यावी लागेल आणि ती चर्चा उशीरा बसून आपल्याला पूर्ण करावीच लागेल.

काही सन्माननीय सदस्य : आमची त्याला हरकत नाही. आम्हाला हे मान्य आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, सदस्यांना एकाच दिवशी दोन्ही दिवसांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलता येईल काय ?

**सभापती** : पहिल्या दिवशी ज्या मंत्र्यांच्या खात्याच्या पुरवणी मागण्या चर्चेला असतील तेवढ्या बाबत आपल्याला त्यासाठी दिलेल्या वेळेत बोलता येईल आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी

..... यूयू 3 ...



KBS/MMP/KGS. श्री. खंदारे नंतर --- 13:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

साठीच्या ज्या मंत्र्यांच्या खात्याच्या पुरवणी मागण्या चर्चेला असतील त्यावर पुन्हा त्याच दिवशी देखील आपल्याला पुन्हा बोलता येईल. तेव्हा आता आपण ठरविल्यानुसार आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा उद्या घेण्यात येईल.

आता आपण लक्षवेधी सुचना चर्चेला घेऊ. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, तीन मंत्र्यांकडून माझ्याकडे विनंती आलेली आहे की, त्यांच्या खात्याशी संबंधित असणारी लक्षवेधी सूचना आज न घेता पुढे ढकलावी. त्यांची ती विनंती मी मान्य केली आहे. त्यामुळे आता आपल्याला चर्चेसाठी दोनच लक्षवेधी सूचना घ्यावयाच्या आहेत. त्यावरील चर्चा आपण आता सुरू करून पूर्ण करू आणि नंतर मग सुटी घ्यायची की नाही हे ठरवू. तरी आता आपण लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ या.

( यानंतर श्री. मा.शिगम .... व्हीव्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील शासकीय व महानगरपालिकेच्या रुग्णालयात विविध रोगांवरील लसींचा साठा उपलब्ध नसणे

**मु. शी.** : मुंबईतील शासकीय व महानगरपालिकेच्या रुग्णालयात विविध रोगांवरील लसींचा साठा उपलब्ध नसणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गो-हे, श्री अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, व किसनचंद तनवाणी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विशेषत: मुंबईतील बहुतांश शासकीय रुग्णालयात व महानगरपालिकेच्या रुग्णालयात आरोग्य व उप आरोग्य केंद्रात डिपटेरिया, डीपीटी, हुपींग, कफ, ओरल पोलिओ व्हॅक्सिन, हिपॅटायटीस-बी सिरप व ॲण्टिटिटानस लसींचा साठा उपलब्ध नसणे, उपरोक्त लसींचा मुलांना होणाऱ्या आजारापाई विशेषत: या आजाराने बाधित झालेल्या मुलांना शासकीय रुग्णालयात आरोग्य व उप आरोग्य केंद्रात लसींचे डोस देण्यासाठी आणले असता सदर लसींचे डोस शिल्लक नसणे, बालकांना होणाऱ्या साथीच्या आजारापासून त्यांचे रक्षण करण्यासाठी राज्यातील राष्ट्रीय रोग निर्मूलन योजनेतंर्गत बालरोग प्रतिबंधक लसीकरण ही राष्ट्रीय योजना असणे, त्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनाला मिळणारा कोट्यवधी रुपयांचा निधी असताना उपरोक्त डोस राज्यातील शासकीय व महानगरपालिकांच्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नसल्याने बाल रुग्णांना साथीपासून वाचविणे अशक्य होणे, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : नवजात बालकांना आणि बालकांना लसीकरण करण्याची आवश्यकता असते. केन्द्र सरकारने लसीकरणाचा कार्यक्रम ठरवून दिलेला असून त्यानुसार विविध लसी त्या त्या वेळी उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असते. परंतु दुर्दैवाने गेल्या 6 महिन्यापासून शासकीय आणि महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अशा प्रकारच्या कोणत्याही लसी उपलब्ध नसल्याची ओरड सर्वत्र होत आहे. काही लसी तीन महिने, सहा महिन्यांच्या अंतराने द्यावयाच्या असतात. लसी उपलब्ध नसल्यामुळे ठरलेल्या वेळेमध्ये लसी देता येत नाहीत. लसी देण्याचा कार्यक्रम डिस्टर्ब होतो. लक्षवेधीच्या निवेदनामधील पहिल्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "डी.पी.टी., डी.टी., टी.टी. वगळता बाकीच्या लसींचा पुरेसा साठा उपलब्ध आहे." म्हणजे धनुर्वात, क्षय, गोवर, हिपॅटायटीस-बी या लसींचा साठा उपलब्ध आहे. निवेदनाच्या दुस-या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "डीपीटी, डीटी व बीसीजी या लसींचा तुटवडा मागील तीन महिन्यापासून भासत आहे." तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी वितरित केलेले निवेदन नीट वाचले तर निवेदनातील दोन परिच्छेदांमधील विसंगती त्यांना दिसून येईल. माझा प्रश्न असा आहे की, केन्द्र सरकारकडून उपलब्ध होणारा साठा आपणास अनेक प्रयत्न करुन देखील उपलब्ध झाला नाही. तेव्हा याबाबतीत राज्य शासनामार्फत कोणती वेगळी व्यवस्था करण्यात आली होती ?

डॉ. विमल मुंदडा : धनुर्वात प्रतिबंध, डीपीटी, डीटी, पोलीओ, क्षय, गोवर, हिपॅटायटीस-बी ह्या सर्व लसींचा 100 टक्के पुरवठा केंद्र शासनाकडून केला जातो असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. महाराष्ट्रामध्ये बीसीजी आणि अन्य लसींचा साठा अगदीच कमी नाही. परंतु आपली लसीची जी मागणी आहे त्याप्रमाणात पुवरठा कमी प्रमाणात झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत आपण सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. राज्याची आणि मुंबई महापालिकेची मागणी आणि त्यानुसार झालेला पुरवठा याबाबतची संपूर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. पहिल्यांदा राज्याची डी.पी.टी. आणि डी.टी ची मागणी 109 लाख मात्राच्या आसपास होती. दिनांक 1.4.2008 च्या मागणी नुसार डी.पी.टी.ची 9.20 लाख आणि डी.टी.ची 32.35 लाख अशी वार्षिक मागणी होती. 1.4.2008 च्या मागणी नुसार डी.टी. चा पुरवठा झाला नाही. केन्द्र सरकारकडून 17.7 लाख इतका पुरवठा होणार होता, परंतु तो कमी म्हणजे 0.56 इतका झाला.गोवरच्या लसीची आपली

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. विमल मुंदडा....)

मागणी 27ची असताना 60.63 इतका साठा उपलब्ध झाला. सन 2008-09 या वर्षासाठी डीपीटीचा 23.20 आणि डी.टी.चा 0.56 साठा उपलब्ध होता. जुलै महिन्यामध्ये मागणीनुसार साठा उपलब्ध झाला नाही. जुलै अखेर डी.पी.टी चा 36.36 आणि टी.टी.चा 10.78, डी.टी.चा 29.14, बी.सी.जी.चा 24, हिपॅटायटीस-बीचा 13 या प्रमाणे पुरवठा झाला. म्हणजे लसींची उपलब्धता कमी नाही. डी.टी.ची राज्यस्तरावर कमतरता भासू नये म्हणून ती लस बाजारातून खरेदी करुन उपलब्ध करुन दिलेली आहे. ऑगस्ट महिन्यापर्यन्त लागणारा साठा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन केन्द्र शासनाने दिलेले आहे. या बाबतीत मुख्य सचिव, सचिव, संचालक, आरोग्य सेवा, अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण व उपसंचालक (वि.ल.टो.) यांनी लसी उपलब्ध होण्याबाबत पाठपुरावा केलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा....

मी वस्तुस्थिती नाकारीत नाही. बी.एम.सी.ची मागणी असेल, राज्यस्तरीय मागणी असेल त्या प्रमाणे पुरवठा जरी कमी असला तरी उपलब्ध असलेला साठा आपण त्या त्या पध्दतीने हा पुरवठा करतो. मग त्यात शुन्य ते सहा वयोगटातील मुलांसाठी असलेले लसीकरणे असो, ते पुरवून ॲडजेस्टमेंट करण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. कारण या लसी तयार करणा-या देशात ज्या संस्था आहेत त्या जवळपास नऊ आहेत. आपल्याकडील औषध निर्माण करणारी हाफकिन संस्था गेल्या दीड वर्षापासून पूर्णपणे बंद झाली आहे. सेंट्रल रिसर्च इन्स्टीटयूट कसोली येथे कार्यरत आहे, बायोलॉजिकल इन्स्टिटयूट हैद्राबाद किंवा श्रीराम इन्स्टीटयूट,पुणे,शांता बायोटेक, हैद्राबाद, इत्यादी संस्थांना लसीच्या संदर्भात ऑलरेडी ऑर्डर दिलेली आहे. या संस्थांकडून ऑर्डरप्रमाणे तीन महिन्यात व्हॅक्सीन्स उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. आपण आज जरी व्हॅक्सीन्सची ऑर्डर दिली तरी त्यांच्याकडून तीन महिन्यात ते पुरविण्यात येईल. इम्युनेशनचे संपूर्ण व्हॅक्सीन त्यांच्याकडे तयार नसते. त्या संस्था ऑर्डर दिल्यानंतरच अशा व्हॅक्सीन तयार करतात. अशा लसी आपण मार्केटमधून उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत. म्हणून व्हॅक्सीनच्या बाबतीत नेहमी प्रश्न निर्माण होतो. सदरहू व्हॅक्सीन ऑगस्ट महिन्यात येईल त्यात कोणताही लाभार्थी सदरहू डोसपासून वंचित राहणार नाही याची पूर्णपणे केंद्र शासन आणि राज्य शासन काळजी घेईल.

श्री. कपिल पाटील : गेल्या वर्षभरात मुंबई, भिवंडी आणि राज्यात अनेकदा डोस देऊनही पोलिओचे रुग्ण सापडले आहेत. पोलिओचे रुग्ण सापडण्याची कारणे काय आहेत ? लस निर्मितीमध्ये हाफकीन संस्थेचा मोठा वाटा होता. खाजगी कंपन्यांसाठी त्या संस्थेचे जाणीवपूर्वक खच्चीकरण करण्यात आले. या संस्थेच्या बाबतीत शासन निश्चित कोणती पाऊले उचलणार आहे ?

डॉ. विमल मुंदडा : हाफकीन संस्था पुनरुज्जिवीत करण्याबाबतची सूचना वैद्यकीय शिक्षण विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल, व तशा सूचना देण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : मंत्री महोदयांच्या सूचनेने हाफकीन संस्था सुरु होईल काय ? तसेच या संस्थेत पूर्वीप्रमाणे औषध निर्मिती केली जाईल काय ? हाफकीन संस्था का बंद करण्यात आली याचा खुलासा माननीय मंत्री महोदय करतील काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : हाफकीन संस्था बंद झाल्यामुळे व्हॅक्सीनची अडचण निर्माण होत आहे ही वस्तुस्थिती मंत्री महोदया मान्य करतील काय ?

डॉ. विमल मुंदडा : मी मान्य करणे अथवा न करणे याच्याशी आरोग्य विभागाचा काहीही संबंध येत नाही. हाफकीन संस्थेमधून गेल्या दीड वर्षापासून कोणत्याही व्हॅक्सीनचे उत्पादन होत नाही, ही वस्तुस्थिती आहे आणि ती वस्तुस्थिती मी पूर्वीच मान्य केली आहे. हाफकीन संस्थेचे पुनरुज्जीवन करण्यामध्ये संबंधित विभागास योग्य त्या सूचना दिल्या जातील.

डॉ.दीपक सावंत : केंद्र शासनाने राज्य शासनास व्हॅक्सीनचा साठा उपलब्ध करुन दिला नाही असे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले. व्हॅक्सीनच्या बाबतीत वर्षाचे शेडयूल ठरलेले असते. पहिल्या तीन महिन्यात कोणत्या व्हॅक्सीन लागणार आहेत, पुढील तीन महिन्यात कोणत्या व्हॅक्सीन लागणार आहेत आणि शेवटच्या तीन महिन्यात कोणत्या व्हॅक्सीन लागणार आहेत यासंबंधीचे नियोजन पूर्वीपासून केले जाते व त्यासंबंधीची मागणी राज्यशासन केंद्र शासनाच्या संबंधित विभागाच्या संस्थांकडे नोंदवित असते. तर नियोजनाप्रमाणे व्हॅक्सीनची मागणी केंद्राकडे करण्यात आली होती काय ? मुंबई महानगरपालिका स्वत: व्हॅक्सीन विकत घेण्यास तयार होती. असे स्टेटमेंट श्री.जयराज ठाणेकरांनी केलेले आहे. महानगरपालिकेस मोठया प्रमाणात व्हॅक्सीनची आवश्यकता असताना त्यांना फक्त 50 हजार व्हॅक्सीन्स उपलब्ध करुन दिल्या. राज्य शासन आणि मुंबई महानगरपालिका या स्वयंपूर्ण संस्था आहेत. त्या संस्था स्वत:ला लागणारे व्हॅक्सीन विकत घेऊ शकतात. असे असताना व्हॅक्सीनच्या बाबतीत राज्य शासन केंद्र शासनावर का अवलंबून राहते ? लसीकरण हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. अशा प्रकारे व्हॅक्सीनची अडचण आल्यानंतर मुंबई महानगरपालिकेस राज्य शासन स्वत: प्रोक्यूरमेंट करणार काय ?

डॉ. विमल मुंदडा : वर्षभरात लागणारी रिक्वायरमेंट नोंदविलेली असते. सदर संस्थांनी दर तीन महिन्यात व्हॅक्सीन्स उपलब्ध दिल्या पाहिजेत. आपल्याकडे व्हॅक्सीनच्या उपलब्ध साठयाप्रमाणे त्याचे वितरण करीत असतो. टी.टी.चे व्हॅक्सीन आपण स्वत: खरेदी करीत असतो. राज्य शासनाच्या रुग्णालयांतील रुग्णांना सदर व्हॅक्सीन विकत आणण्यास सांगू नये अशा प्रकारच्या सक्त सूचना दिलेल्या होत्या. टी.टी.च्या बाबतीत दोन ते तीन टक्के इम्युनेशन झालेले आहे. बी.एम.सी. सदर व्हॅक्सीन्स स्वत: खरेदी करीत असतील तर त्यास आमची काही हरकत

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा......

नाही. सन्माननीय सदस्यांनी श्री. ठाणेकर यांच्या नावाचा उल्लेख केला. त्यांच्याशी आम्ही चर्चा केली आहे. महानगरपालिकेच्या आयुक्त आणि उपायुक्त यांच्याबरोबर देखील यासंदर्भात चर्चा झालेली आहे. महानगरपालिकेने स्वत: मागणी केली तरी केंद्र शासनाच्या या संस्थांकडूनच व्हॅक्सीनची मागणी करावी लागणार आहे. त्यामुळे व्हॅक्सीन खरेदी बाबतची सायकल अशीच चालू राहील. व्हॅक्सीनचा कोठेही तुटवडा पडता कामा नये याची दक्षता राज्य शासनाकडून घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

यानंतर श्री. कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे सुरु ...

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, लक्षवेधीच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनामार्फत लसीचा पुरवठा करण्याविषयीच्या सूचना संबंधित संस्थांना दिलेल्या आहेत. परंतु अजून लसींचा पुरवठा झालेला नाही. काही ठिकाणी 30 टक्के, 40 टक्के किंवा 60 टक्केपर्यंतच लसीचा पुरवठा झाला आहे. लसीचा पुरवठा न होण्याचे कारण केंद्र शासनाकडून उशिरा आदेश गेले हे आहे किंवा ज्या नऊ संस्थानी पुरवठा करावयाचा आहे त्यांनीच उशीर केला हे आहे याबाबत मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, केद्र शासनामार्फत राज्य शासनाला सांगण्यात आले आहे की, अमुक ही लस इतक्या दिवसात उपलब्ध होईल. केंद्र शासनाने संस्थांना ऑर्डर्स वेळेवर दिल्या होत्या हे राज्य शासनाने केलेल्या पाठपुराव्यावरुन दिसून येते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबई,भिवंडी आणि राज्यात अन्यत्र पोलिओचे रुग्ण सापडले आहेत. अनेकदा डोस घेऊनही सापडले आहेत त्यामागची कारणे काय याची चौकशी शासनाने केली काय ? डोस दूषित होते काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, डोस दूषित नसतो. पल्स पोलिओ लसीकरण व्यवस्थितपणे करतो. काही परसिस्टंट सॅम्पलमध्ये पी-1 आणि पी-3 हा व्हायरस सापडतो. परंतु मागीलवेळेस म्हणजे 2005 मध्ये राज्य पोलिओमुक्त झाले होते. परंतु आता भिवंडीमध्ये एक केस सापडली आहे. त्या भागामध्ये सर्व्हे केलेला आहे. दरवेळेस सर्व्हे करतो त्यातून रुग्ण शोधून काढतो. 15 वर्षाच्या आतील मुलाला ॲक्युट पॅरालायसिस झाला आहे काय हे तपासून बघतो. त्याचा प्रोग्रेस पाहतो. 5 कि.मी.च्या परिसरात सर्व्हे करतो. देश जोपर्यंत पोलिओमुक्त होणार नाही तोपर्यंत महाराष्ट्रात ही शंका राहू शकते. त्यासाठी शासन दरवर्षी पोलिओ लसीकरण करण्याचा प्रयत्न करीत असते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा प्रश्न विचारतो की, अशा प्रकारे केंद्र शासनाकडून लसीचा तुटवडा झाला. कारण मंत्रीमहोदयांनी सांगितले की केंद्र शासनाकडून लस आली नाही. ही सायकल चालूच राहणार आहे. यासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे असे आपल्याला वाटत नाही काय ? केंद्र शासनाने जर लसीचा पुरवठा केला नाही तर त्यांच्यावर अवलंबून न राहता ही लस राज्य शासन विकत घेणार आहे काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, ज्यागोष्टी आवश्यक आहेत त्या घेत असतो. हा राष्ट्रीय प्रोग्रॅम आहे. त्यामुळे त्याचा प्रोग्रॅम ठरलेला आहे. त्यामुळे केंद्र शासनाची आहे तितकीच राज्य शासनाची जबाबदारी आहे. तसेच महानगरपालिकेची सुध्दा जबाबदारी आहे.केंद्र शासनाकडून लसीचा पुरवठा झाला नाही तर ज्यावेळी ॲक्युट स्टेज येईल त्यावेळी राज्य शासन याबाबतचा विचार करील.

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत.

**सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 2 सन्माननीय मंत्रीमहोदयांनी पुढे ढकलण्याबाबत विनंती केली असल्यामुळे मी ती पुढे ढकलीत आहे. पुढील लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांची आहे ती सुध्दा पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. त्यामुळे ती पुढे ढकलीत आहे. त्यानंतरची सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांची लक्षवेधी सूचना आहे ती सुध्दा पुढे ढकलण्याबाबत विनंती केली असल्यामुळे मी ती पुढे ढकलीत आहे. त्यानंतरची लक्षवेधी सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी आणि श्री. संजय दत्त यांची आहे. वनमंत्री सदनात आहेत परंतु सन्माननीय सदस्य नाहीत त्यामुळे त्यांचीही लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कालही लक्षवेधी सूचना पुढे ढकलल्या आजही ढकलल्या काही कारणे असू शकतील. परंतु रोज अशा लक्षवेधी सूचना पुढे ढकलल्या आणि एकदम साठल्या तर अवघड होईल. त्याबाबत काळजी घेण्यात यावी एवढी विनंती आहे.

**सभापती** : काळजी घेण्यात येईल. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील. पहिली डॉ. नीलम गोऱ्हे यांची आहे पण त्या सदनात नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना आता मांडावी.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : अंबरनाथ नगरपालिकेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना

शैक्षणिक साहित्य व गणवेष मिळण्याबाबत

**मु. शी.** : अंबरनाथ नगरपालिकेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेष मिळणे याबाबत श्री रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती/उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, अंबरनाथ, जि.ठाणे या नगरपरिषदेच्या वतीने शिक्षण मंडळामार्फत सुमारे 19 प्रा.शाळा चालविल्या जात असून इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत सुमारे 4200 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अंबरनाथ हे औद्योगिक शहर असल्यामुळे कामगारांची आणि गोरगरिबांची मुले नगरपालिकांच्या शाळामधून शिक्षण घेत आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:45

श्री.रामनाथ मोते.......

प्रत्यक्ष पाहणी केली असता, बरेच विद्यार्थी फाटक्या-तुटक्या, रंगीबेरंगी कपड्यामध्ये शाळेत येत असल्याचे दिसून आले आहे. या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य मिळणे आवश्यक आहे. गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व शाळेत येणाऱ्या मुलांना टिकवून ठेवण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, अंबरनाथ नगरपरिषदेच्या शाळातील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य उपलब्ध होण्याबाबत आवश्यक ती कारवाई शासनाने करावी.

----------

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) YY.2

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील धामापूर या पुरातन तलावाचे सुशोभिकरण करणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील धामापूर या पुरातन तलावाचे सुशोभिकरण करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला सिंधुदुर्ग जिल्हा देशातील एकमेव पर्यटन जिल्हा आहे. येथील पर्यटन क्षेत्र म्हणून समाविष्ट झालेले मौजे धामापूर गाव, हे नैसर्गिक सौंदर्य लाभलेले असे निसर्गरम्य सुंदर असे गाव आहे. या गावाला सुमारे 114 हेक्टर क्षेत्रफळामध्ये पुरातन काळापासून देशामधील अतिशय सुंदर व रमणीय असा तलाव लाभलेला आहे. सोबत 500 वर्षापूर्वीचे भगवती देवीचे पुरातन मंदिरही या धामापूर तलावाच्या काठाशी वसलेले आहे.

मौजे धामापूरसह काळसे, पेंडूर, मालवण शहर, तारकर्ली इ.गावांना या धामापूर तलावातून पाणीपुरवठा होतो. या तलावाच्या किनारी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातर्फे टुमदार बंगले देखील बांधण्यात आलेले आहेत. धामापूर तलावापासून सुमारे दीड कि.मी.अंतरावर कर्ली खाडी आहे. नेरुरपार-कर्ली खाडीच्या ऊंचावर बांधलेल्या ब्रीजमुळे सुंदर सुंदर हाऊस बोटी, जहाजे, होड्या इत्यादीच्या वाहतुकीत सुलभता झालेली आहे. त्याचप्रमाणे चिपी (वेंगुर्ला) येथील नियोजित विमानतळ धामापूर तलावापासून 15 कि.मी.अंतरावर आहे. त्याचप्रमाणे धामापूर ते गोवा यामधील अंतरही 85 कि.मी. आहे.

पर्यटनाच्या माध्यमातून सर्वांगीण उपयोगी अशा धामापूर तलावाच्या दुरुस्तीची, नुतनीकरणाची, सुशोभिकरणाची तसेच कॅनॉलचे आर.सी.सी.बांधकाम करण्याची नितांत गरज आहे. यादृष्टीने या सार्वजनिक अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

..3..





**पृ. शी.** : सामुहिक विवाह सोहळ्यासाठी असलेली जोडप्यांची मर्यादा

भटक्या व विमुक्त जमातीसाठी शिथील करणे

**मु. शी.** : सामुहिक विवाह सोहळ्यासाठी असलेली जोडप्यांची मर्यादा भटक्या व विमुक्त जमातीसाठी शिथील करण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र शासन सामुहिक विवाह सोहळा करण्यासाठी किमान 20 जोडप्यांचा समावेश असलेल्यांना अनुदान देत आहे. परंतु भटक्या व विमुक्त जमाती (व्हीजेएनटी) या प्रवर्गात 20 जोडपी जमविणे कठीण आहे. कारण व्ही.जे.एन.टी. प्रवर्ग हा विखुरलेला असल्यामुळे या प्रवर्गातील सामुहिक विवाह सोहळ्यासाठी पुरेशी संख्या जमविण्यास प्रचंड त्रास होतो. प्रसंगी विलंब देखील होतो. भटक्या व विमुक्त जमातीसाठी हे प्रमाण 20 ऐवजी 5 करावे आणि त्या जोडप्यांना राज्य शासनाकडून अनुदान द्यावे, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

-----------------

..4..

22-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) YY.4

SGB/ 13:45

**पृ. शी.** : मुंबई शहरामध्ये पॅसेंजर वॉटर ट्रान्सपोर्ट प्रकल्प अंमलात आणणे

**मु. शी.** : मुंबई शहरामध्ये पॅसेंजर वॉटर ट्रान्सपोर्ट प्रकल्प अंमलात आणण्याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

मुंबई व मुंबईजवळ निर्माण होणारी नवी मुंबईसारखे शहर, त्यामुळे प्रवासी वाहतुकीवर पडणारा ताण, यातून मुंबईमध्ये जलवाहतूक सुरु करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मुंबईच्या पूर्व-पश्चिम किनारपट्टीवर प्रवासी जलवाहतूक सुरु करण्याकरीता इनलॅंड पॅसेंजर वॉटर ट्रान्सपोर्ट प्रॉजेक्ट अंतर्गत एप्रिल, 2003 मध्ये या प्रकल्पाला शासनाने मंजुरी दिली होती. त्यावेळी या प्रकल्पासाठी 98 कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज होता. परंतु जुलै, 2008 महिना सुरु झाला तरीही हा प्रकल्प कागदावरच आहे. या प्रकल्पाकरिता मुंबईतील भाऊचा धक्का येथे जेट्टी विकसित करण्याची योजना होती. परंतु मुंबई पोर्ट ट्रस्टने त्याला विरोध केला. त्याला पर्याय म्हणून रेडिओ क्लब येथील शमशेदजी बंदराची निवड करण्यात आली. त्याचबरोबर नवी मुंबईतील बेलापूर येथील विद्यमान जेट्टीच्याच ठिकाणी जेट्टी असेल असे नमूद करण्यात आले. सुमारे पाच वर्षापूर्वी नरिमन पॉईंट ते बोरीवली अशी बोट सेवा सुरु करण्यात आली होती. ती देखील बंद करण्यात आली. मुंबई शहर हे बेटांचे बनलेले असल्याकारणाने येथे पॅसेंजर वॉटर ट्रान्सपोर्टसारखे प्रॉजेक्ट उपयुक्त असून मुंबईच्या नागरिकांना सोयीस्कर ठरणारे आहेत. त्यासाठी शासनाने त्याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे. या प्रश्नाबाबत शासनाने नोंद घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करतो.

-----------

(नंतर श्री.भारवि......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी.

**सभापती** : मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी यांच्याकडून असे कळविण्यात आले आहे की, विधान परिषद सदस्य सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर व रामनाथ मोते यांना दिनांक 21 जुलै 2008 रोजी मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 69 अन्वये 10.05 वाजता रांजनोली नाका, भिवंडी-कल्याण बायपास रोड, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे ताब्यात घेण्यात येऊन त्यांना 10.35 वाजता मुक्त करण्यात आले आहे.

आजचे सभागृहाचे कामकाज सकाळी 9.30 वाजता सुरू झाले. आज आपण जवळ जवळ पाच तास काम केले आहे. म्हणजे आजच्या दिवसाचे कामकाज केलेले आहे. त्यामुळे आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चा उद्या घेण्याचे ठरविले आहे. म्हणून सभागृहाची बैठक आता मी स्थगित करीत आहे. उद्या बुधवार, दिनांक 23 जुलै 2008 रोजी सकाळी 9.30 वाजता बैठक घेण्यात येईल. उद्या सकाळी 9.30 ते 11.30 मध्ये आजच्या कामकाज पत्रिकेवरील पूरक मागण्यांवरील चर्चा तसेच संबंधित मंत्र्यांचे उत्तर होईल व नियमित बैठक 12.00 वाजता घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 23 जुलै 2008 रोजी सकाळी 9.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 9.30 ते 11.30 पर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 51 मिनिटांनी बुधवार, दिनांक 23 जुलै 2008 रोजीच्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही